CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | मंगळवार, १४ जुलै २०२६ । वर्ष ४ थे अंक १२५ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भारतीय संस्कृती निसर्गाचे शोषण स्वार्थाकरिता करणे शिकवत नाही. उलट स्वतःला निसर्गाचे पुत्र मानून निसर्गाचे शोषण न करता त्याचे पोषण करतात. जसे एखादे मूल आईचे दूध पिऊन स्वतःलाही बलवान बनवते आणि आईलाही सुखावते.

**- भारतरत्न**
**स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# काशी-मथुरेचा निर्णय लागणार न्यायालयातच

### । पक्षकारांनी फेटाळला सर्वोच्च न्यायालयाचा प्रस्ताव । ज्ञानवापीचाही समावेश



**लखनौ, १३ जुलै**

वाराणसीतील काशी विश्वनाथ-ज्ञानवापी मशीद, मथुरेतील श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही इदगाह मशीद आणि संभलमधील हरिहर मंदिर-जामा मशीदशी संबंधित प्रलंबित वाद विशेष लोक अदालतीमध्ये मध्यस्थीद्वारे सोडवण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला आहे. संबंधित पक्षांनी हे मुद्दे न्यायालयातच सोडवावेत अशी इच्छा व्यक्त केली. विशेष लोक अदालतीच्या आधी संबंधित पक्षांनी मध्यस्थीद्वारे प्रलंबित प्रकरणांवर सामंजस्यपूर्ण तोडगा काढावा यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने देशव्यापी मध्यस्थीद्वारे न्यायनिवाडा आणि विवादांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय कृती (समाधान समारोह) सुरू केली.

मथुरा वादाप्रकरणी अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश सुरेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित विशेष लोक अदालतीत मुस्लिम पक्षकार उपस्थित राहिले नाहीत. त्यानंतर न्यायालयाने मध्यस्तीचे प्रयत्न अयशस्वी झाल्याचा आदेश पारित केला. हिंदू याचिकाकर्ते मात्र न्यायालयात उपस्थित होते.

संबंधित पक्षांनी हे प्रकरण मध्यस्थीद्वारे सोडवावे, असा निर्देश देण्याची मागणी करणाऱ्या सात याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. न्यायालयाने या उद्देशासाठी त्या याचिका विशेष लोक अदालतींकडे वर्ग केल्या होत्या. त्याचप्रमाणे, काशी विश्वनाथ-ज्ञानवापी मशीद वादातही हिंदू आणि मुस्लिम पक्षांनी हा मुद्दा न्यायालयामार्फतच सोडवला जावा, असा आग्रह धरला. मध्यस्थीसाठी मंगळवारी लोक अदालतीसमोर हजर राहण्यास संबंधित पक्षांना सांगण्यात आले होते. मुस्लिम पक्ष या प्रक्रियेत सहभागी होणार नाही, असे मशिदीचे पदाधिकारी मोहम्मद यासिन यांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

### अधिकृत सूचना मिळाली नाही : हिंदू पक्षकार

हे प्रकरण दोन समुदायांच्या श्रद्धेशी संबंधित असल्याने केवळ न्यायालयीन निकालच योग्य ठरेल, असे संभल येथील मशिदीच्या पदाधिकाऱ्याने सांगितले. या संदर्भात अद्याप कोठूनही कोणतीही अधिकृत सूचना किंवा नोटीस मिळालेली नाही, असे हिंदू बाजूने म्हटले आहे. संबंधित ठिकाणी पूर्वी मंदिरे होती. ती मुस्लिम आक्रमकांनी पाडून मशिदीमध्ये त्यांचे रूपांतर केले होते, असा या सर्व वादांत हिंदू बाजूचा दावा आहे. मात्र, मुस्लिम बाजूने हे सर्व दावे फेटाळले असून, कोणतीही तोडफोड झाली नसल्याचे म्हटले आहे. ■

### उच्च न्यायालयात १८ याचिकांवर सुनावणी

अलाहाबाद उच्च न्यायालयात या वादाशी संबंधित तब्बल १८ याचिकांवर सुनावणी सुरू होती. वादग्रस्त जागा मंदिर की मशीद याचा निर्णय घेणे हे न्यायालयाचे काम आहे, असे संभल येथील जामा मशीद-हरिहर मंदिराशी संबंधित वादात मुस्लिम पक्षकारांनी म्हटले. ■

# ‘एसआयटी’ने स्थिती अहवाल सादर करावा

### सर्वोच्च न्यायालयाचा आदेश; राम मंदिर निधी अनियमितता प्रकरण

**नवी दिल्ली, १३ जुलै**

अयोध्या येथील राम मंदिरासाठी मिळालेल्या देणगीच्या रकमेचा कथित अपहार झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उत्तरप्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाला (एसआयटी) या प्रकरणाचा सद्यस्थिती अहवाल सादर करण्याचा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला.



देणग्यांच्या अपहार प्रकरणात निष्पक्ष आणि कालमर्यादित चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख आणि न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासला नोटीस बजावली.

तीन याचिकांकर्त्यांपैकी एक नरेंद्रकुमार गोस्वामी यांनी या प्रकरणाची सीबीआय चौकशी व्हावी, अशी मागणी करीत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली तसेच राम मंदिराचा कारभार पाहणाऱ्या श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासच्या आर्थिक व्यवहारांचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांकडून (कॅग) लेखापरीक्षण करण्याची मागणी केली. अजय कुमार राय आणि दिनेश कुमार यादव यांनी अशाच प्रकारच्या उपाययोजना करणारी दुसरी याचिका दाखल केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली सीबीआय चौकशीची मागणी करण्याव्यतिरिक्त राजदचे खासदार सुधाकरसिंह यांनी दाखल केलेल्या तिसऱ्या याचिकेत मंदिर न्यासाच्या संपूर्ण आर्थिक व्यवहारांचे न्यायवैद्यक अंकेक्षण करण्याची मागणीही करण्यात आली आहे. यापूर्वी न्या. बी. व्ही. नागरत्ना प्रमुख असलेल्या न्यायासनाने एका याचिकाकर्त्याला या प्रकरणाच्या तातडीच्या सुनावणीसाठी नंतरच्या तारखेला दाखल करण्यास सांगितले होते.

मंदिर ट्रस्टचा कारभार आणि प्रशासनाशी संबंधित कथित आर्थिक अनियमितता व इतर कथित बेकायदेशीर बाबींची चौकशी सीबीआयच्या नेतृत्वाखालील बहू-शाखीय विशेष तपास पथकाने (एसआयटी) करावी, असे सक्रिय वकील अजय कुमार राय आणि दिनेश कुमार यादव यांनी दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे.

उत्तरप्रदेश सरकारने स्थापन केलेल्या एसआयटीने एफआयआर किंवा कोणताही नियमित फौजदारी गुन्हा दाखल न करताच या प्रकरणाची चौकशी सुरू केल्याचे याचिकेत म्हटले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### श्रद्धा, विश्वासावर थेट परिणाम

यात अंतर्भूत असलेले मुद्दे केवळ दखलपात्र गुन्हे घडण्याच्या शक्यतेशी संबंधित नाहीत, तर ते असंख्य भाविक आणि सामान्य जनतेची श्रद्धा, भावना व विश्वासावरही थेट परिणाम करतात, असे याचिकेत म्हटले आहे. न्यासाशी संबंधित निधीत अपहार झाल्याच्या आणि इतर कथित अनियमिततेच्या बातम्या अखेरीस सत्य ठरतील किंवा नाही, हा भाग वेगळा; परंतु अयोध्येचे वैभव पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या पिढ्यांमध्ये अशा बातम्यांमुळे तीव्र चिंता निर्माण झाली आहे, असे याचिकेत म्हटले आहे. ■

## महत्त्वाचे

### सेन्सेक्स, निफ्टीमध्ये सुधारणा

**मुंबई** : सुरुवातीच्या घसरणीनंतर शेअर बाजाराने सोमवारी जोरदार पुनरागमन केले. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील शेअर्समधील खरेदीमुळे एफएमसीजी, मेटल आणि रियल्टी क्षेत्रातील घसरण भरून काढण्यास मदत झाली. यामुळे दोन्ही प्रमुख निर्देशांक किरकोळ वाढीसह बंद झाले. जागतिक बाजारातून मिळालेल्या संमिश्र संकेतांमुळे भारतीय शेअर बाजाराची सुरुवात घसरणीसह झाली होती. यामुळे निफ्टी २४,०००.२० अंकांच्या नीचांकी पातळीवर गेला होता. मात्र, त्यानंतर आयटी, मीडिया आणि कन्झ्युमर ड्युरेबल शेअर्समध्ये खरेदीचा जोर वाढला. या खरेदीमुळे बाजाराने सुरुवातीचे नुकसान भरून काढले आणि दोन्ही निर्देशांक सकारात्मक पातळीवर बंद झाले.

### किरकोळ महागाई ४.३८ टक्क्यांवर

**नवी दिल्ली** : सरकारने सोमवारी जाहीर केलेल्या सरकारी आकडेवारीनुसार अन्नपदार्थांच्या वाढलेल्या किमतींमुळे किरकोळ महागाईत वाढ झाली आहे. मे महिन्यातील ३.९३ टक्क्यांच्या तुलनेत जूनमध्ये महागाई ४.३८ टक्क्यांपर्यंत वाढली आहे.या आकडेवारीनुसार ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित अन्नधान्य महागाई जूनमध्ये ५.३२ टक्के होती, जी मे महिन्यातील ४.७८ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. एकूण महागाई दर दोन्ही बाजूंनी २ टक्क्यांच्या फरकाने ४ टक्क्यांवर राहील याची खात्री करावी, असा आदेश सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेला दिला आहे. ■

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# वारीत घुसला ट्रक

### तीन महिला ठार; सात जखमी



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जखमींची विचारपूस केली

**जेजुरी, १३ जुलै**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा सोमवार १३ जुलै रोजी खंडेरायाच्या जेजुरी नगरीत दाखल होत असताना पालखी सोहळ्यावर दुःखाची छाया पसरली. जेजुरी-सासवड मार्गावरील बेलसर टोलनाक्याजवळ सांगली जिल्ह्यातील वारकऱ्यांच्या दिंडीत भरधाव ट्रक घुसल्याने तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला तर सात जण गंभीर जखमी झाले. हा भीषण अपघात सोमवारी सकाळी साडेआठच्या सुमारास घडला.

या अपघातात राजश्री भोसले (वय ६२), माधवी सरवडे (वय ५५) आणि नंदा पवार (वय ५२, सर्व रा. सांगली) यांचा जागीच मृत्यू झाला. तर शांता अलकोपर (वय ७०), कासाबाई गस्ते (वय ७०), लक्ष्मी गडदे (वय ४५), अक्काताई कोळी (वय ६०), शैलजा जगताप (वय ५८), गीताबाई हंकारे (वय ६५) आणि मंगल पाटील (वय ६५) या सर्व सांगलीच्या वारकरी जखमी झाल्या आहेत. या प्रकरणी ट्रक चालक सुनील साळुंखे (वय ६५, रा. सोलापूर) याला जेजुरी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### शासनातर्फे मदत जाहीर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुर्घटनेत मृत वारकऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारतर्फे प्रत्येकी पाच लाख रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जेजुरी येथे जखमींची विचारपूस आणि मृतांच्या नातेवाईकांचे सांत्वन केले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अपघातग्रस्त वारकऱ्यांची भेट घेतली. ■

# ‘इन्फ्रामॅन’ फडणवीसांचा नवा इतिहास

### मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात शरद पवारांना टाकले मागे

**मुंबई, १३ जुलै**

महाराष्ट्राच्या राजकारणात एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक घटना घडली असून, राज्याचे मुख्यमंत्री’ देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळाबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मागे टाकत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. १२ जुलै २०२६ पर्यंत देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रीपदाचा एकूण कार्यकाळ २४३० दिवसांवर (सुमारे ६ वर्षे ७ महिने) पोहोचला आहे. सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहणाऱ्या नेत्यांच्या यादीत देवेंद्रजी आता तिसऱ्या क्रमांकावर विराजमान झाले आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)




### विकासाचेही अनेक विक्रम नावावर

विकासकामांचे अनेक विक्रम त्यांच्या नावावर आहेत. सर्वाधिक वेळा शेतकऱ्यांना कर्जमाफी देणारे मुख्यमंत्री, बीडीडी चाळीतील रहिवाशांना हक्काचे घर देणारे नेते आणि अटल सेतू, कोस्टल रोड, मेट्रोचे जाळे तसेच राज्याची भाग्यरेषा ठरलेला समृद्धी महामार्ग यांसारखे ऐतिहासिक प्रकल्प मार्गी लावणारे ‘इन्फ्रामॅन’ म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. याच जनहिताच्या निर्णयांची पावती म्हणून जनता त्यांना सातत्याने आशीर्वाद देत आहे. ■

### भट्टी टोळीच्या निधीबाबत चौकशी

**मुंबई, १३ जुलै**

पाकिस्तानातील गुंड आणि आयएसआयचा हस्तक शहजाद भट्टीने समाज माध्यमाचा वापर करून स्थानिक तरुणांना जाळ्यात ओढले आणि त्यांच्याशी आर्थिक व्यवहार केले. या व्यवहारांची महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाकडून चौकशी केली जात आहे, अशी माहिती गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सोमवारी दिली. तपास यंत्रणेने ताब्यात घेतलेल्या अनेक संशयितांचे मोबाईल जप्त केले आहेत. या नेटवर्कची व्याप्ती जाणून घेण्यासाठी त्या उपकरणांमधून डेटा मिळवला जात आहे, असे भोयर यांनी पत्रकारांसोबत चर्चा करताना सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

# खंडणीखोर अमेरिकेचा बुरखा फाटला

### म्हणे, होर्मुझमध्ये २० टक्के टोल आकारणार

**वॉशिंग्टन, १३ जुलै**

खंडणीखोर अमेरिकेचा बुरखा फाटला असून, अमेरिका होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारेल आणि त्याबद्दल मोबदला मिळायला हवा, असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. या महत्त्वपूर्ण सागरी मार्गाच्या सुरक्षेमध्ये अमेरिकेने दीर्घकाळापासून भूमिका बजावली आहे; त्यामुळे या जबाबदारीसाठी मोबदला मिळणे आवश्यक आहे. येथून जाणाऱ्या जहाजांवर २० टक्के टोल आकारला जाईल, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले.

ते खूप वाईट लोक आहेत, असा आरोप ट्रम्प यांनी इराणवर टीका करताना केला. अमेरिका आणि इराण यांच्यात एक करार झाला होता. परंतु इराणने त्याचे उल्लंघन केले. अमेरिकेने अत्यंत महत्त्वाच्या अशा होर्मुझची सुरक्षा सुनिश्चित केली, तर त्यासाठी त्यांना योग्य मोबदला मिळायला हवा, अशी भूमिका ट्रम्प यांनी घेतली. ◂ (वृत्तसंस्था)



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राजनाथसिंह, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांच्या उपस्थितीत लखनौ-कानपूर द्रुतगती महामार्गाचे लोकार्पण करण्यात आले

## अंतरंग


२ दिल्ली दंगल : ताहीर हुसेन दोषी

३ बँकॉकमधील पबला भीषण आग; २७ जणांचा मृत्यू

४ क्षमतासिद्धीचे आव्हान दोन्हीकडे... (अग्रलेख)

६ मेस्सीचे आव्हान मोडून काढू : जो कोल


# आर्थिक स्वावलंबनावर ‘कॅग’चे शिक्कामोर्तब

**मुंबई, १३ जुलै**

महाराष्ट्राची वित्तीय स्थिती आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये अत्यंत मजबूत आणि स्वावलंबी राहिली असून केंद्राच्या अनुदानांवर विसंबून न राहता राज्याने स्वतःच्या हिमतीवर प्रगतीचे नवे शिखर गाठले आहे, या महत्त्वपूर्ण वास्तवावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या (कॅग) ताज्या वित्तीय अहवालाने शिक्कामोर्तब केले आहे.

कॅगच्या अहवालानुसार, महाराष्ट्राच्या एकूण महसुली जमेमध्ये राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाचा वाटा तब्बल ७५ टक्के इतका प्रचंड आहे. राज्याचा हा कर महसूल पाया अतिशय भक्कम आणि शाश्वत असून केंद्राकडून मिळणाऱ्या वित्तीय हस्तांतरणावर महाराष्ट्राची निर्भरता कमालीची कमी झाली आहे. ‘कॅग’ने राज्य सरकारच्या या आर्थिक स्वावलंबनाची विशेष दखल घेतली असून, राज्याची ही कामगिरी देशातील इतर राज्यांसाठी एक ‘चांगला प्रघात’ असल्याचे गौरवोद्गार आपल्या अहवालात काढले आहेत.

अहवालातील आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्राचा स्वतःचा कर महसूल १४.११ टक्क्यांच्या वाढीसह ₹३,४४,९९८.५० कोटींवर पोहोचला आहे, जो मागील आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ₹३,०२,३४३.३७ कोटी इतका होता. राज्य वस्तू व सेवा कर (एसजीएसटी) हा महसुलाचा मुख्य चालक राहिला असून, राज्याने कर संकलन यंत्रणा अधिक गतिमान केल्यामुळे हा महसूल वाढला आहे. तसेच मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्कानेही अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा उत्तम कामगिरी बजावत राज्याच्या तिजोरीत मोलाची भर घातली आहे.

राज्याच्या आर्थिक क्षमतेचा विचार करता, स्थूल राज्य उत्पन्नाच्या (जीएसडीपी) संदर्भात राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाची लवचिकता मागील आर्थिक वर्षातील ०.७८७ वरून लक्षणीयरीत्या सुधारत यंदा १.२०३ वर पोहोचली आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)



### महसूल जमेमध्ये तब्बल ७५ टक्के वाटा स्वतःच्या करांचा

### उत्पन्नवाढीत देशात अव्वल

विरोधकांकडून वारंवार महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीबाबत आवई उठवली जात असताना, ‘कॅग’ने अधिकृत लेखापरीक्षणाच्या आधारे सिद्ध केले आहे की, राज्याने स्वतःचे उत्पन्न वाढवण्यात राष्ट्रीय पातळीवर अव्वल स्थान राखले आहे. आर्थिक प्रगती आणि लोककल्याणकारी योजनांचा ताळमेळ राखण्यासाठी महाराष्ट्र केंद्र सरकारच्या निधीवर अवलंबून नसून स्वतःच्या पायावर उभा असलेला आर्थिक महासत्ता आहे, हेच या अहवालावरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. ■

# महाराष्ट्रासह २१ राज्यांत पुन्हा बरसणार

### २४ तासांत पावसाचा जोर वाढणार

**मुंबई, १३ जुलै**

जुलैच्या सुरुवातीला महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या पावसाने गत पाच दिवसांपासून उसंत घेतल्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. पावसाअभावी पेरलेली पिके कोमजू लागली असून तापमान व उकाड्यात वाढ झाल्याने सामान्याचेही बेहाल होत आहे. दरम्यान, पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढणार आहे. पुढील २४ तासांमध्ये महाराष्ट्रासह २१ राज्यांमध्ये मुसळधार पाऊस कोसळेल, असा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. या काळात प्रति तास ७५ किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागानुसार, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, राजस्थान, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू - काश्मीर, लडाख, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, मध्य प्रदेश, सिक्कीम, छत्तीसगड, आसाम, मेघालय, केरळ आणि कर्नाटक अशा २१ राज्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. या काळात जोरदार वादळाची शक्यता आहे. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### भाजपाच्या तीन उमेदवारांचा अर्ज

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधून राज्यसभेच्या तीन जागांसाठी होणार्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाच्या सुष्मिता देव, सुखेंदू शेखर रॉय आणि प्रकाश चिक बराईक या तीन उमेदवारांनी सोमवारी अर्ज भरला. र्ज भरण्याची १३ जुलै ही शेवटची तारिख होती. १४ जुलैला अर्जांची छाननी होणार आहे. आणखी कोणी उमेदवारी अर्ज न भरल्यामुळे ही निवडणूक अविरोध होण्याची शक्यता आहे. सुष्मिता देव, सुखेंदू शेखर रॉय तसेच प्रकाश चिक बराईक हे तृणमूल कॉंग्रेसचे नेते आणि राज्यसभा सदस्य होते. राज्यसभा सदस्य म्हणून कार्यकाळ शिल्लक असतांनाही या तिघांनी राजीनामे दिले. ९ जुलैला सुष्मिता देव, सुखेंदू शेखर रॉय तसेच प्रकाश चिक बराईक यांनी भाजपात प्रवेश केला आणि काही तासातच या तिघांना भाजपाने राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी दिली.

### नीरज सिन्हा, प्रशांत किशोर यांचा अर्ज दाखल

**नवी दिल्ली :** बिहारमधील बांकीपूर विधानसभा निवडणुकीसाठी शेवटच्या दिवशी भाजपाचे नीरजकुमार सिन्हा, जनसुराज पक्षाचे प्रशांत किशोर आणि तेजप्रताप यादव यांच्या जनशक्ती जनता दलाच्या विणा मानवी यांनी उमेदवारी अर्ज भरला. जपाचे नीरजकुमार सिन्हा मिरवणुकीने उमेदवारी अर्ज भरायला गेले. सिन्हा उमेदवारी अर्ज भरत असतांना त्यांच्यासोबत बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी, प्रदेश भाजपा अध्यक्ष संजय सरावगी, भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकरप्रसाद, जदयुचे प्रदेश अध्यक्ष उमेशसिंह कुशवाह, लोजपा रामविलास पासवान पक्षाचे अध्यक्ष राजू तिवारी, हिंदुस्थान अवाम मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष अनिलकुमार आणि राष्ट्रीय लोकमोर्चाचे प्रदेश अध्यक्ष आलोककुमार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### 'कॉकरोच' आंदोलनाला उद्धव ठाकरेंचा पाठिंबा

**मुंबई :** नीट पेपरफुटीमुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात गेले आहे. विद्यार्थी आत्महत्या करत आहेत, पण सरकारला इतर पक्ष फोडण्यातून वेळ मिळत नाही. जंतरमंतरवर सोनम वांगचुक आणि तरुण करत असलेल्या आंदोलनाला शिवसेने (उबाठा)चे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. सोमवारी 'मातोश्री'वर आयोजित पत्रपरिषदेत त्यांनी केंद्र सरकार व शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर निशाणा साधला. पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या जंतरमंतरवरील आंदोलनाला पाठिंबा देताना उद्धव ठाकरे म्हणाले, सोनम वांगचुक यांचे गत १६ दिवसांपासून प्राणांतिक उपोषण सुरू आहे. त्यांची प्रकृती वेगाने खालावत आहे. चार दिवसांपूर्वी मी खासदार अरविंद सावंत यांना त्यांच्या भेटीसाठी पाठवले होते. मी स्वतः वांगचुक यांच्याशी फोनवर बोलून उपोषण सोडण्याची विनंती केली. पण सरकारला अशा व्यक्ती स्वतःहून संपत असतील, तर तेच हवे आहे, असे नाईलाजाने म्हणावे लागते.

# दिल्ली दंगल : ताहीर हुसेन दोषी

## आयबी अधिकारी अंकित शर्मांच्या हत्येचा रचला होता कट

**नवी दिल्ली, १३ जुलै**

२०२० च्या ईशान्य दिल्ली दंगलीदरम्यान इंटेलिजन्स ब्युरो (आयबी) अधिकारी अंकित शर्मा यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी दिल्लीच्या करकरडूमा न्यायालयाने सोमवारी निकाल दिला. न्यायालयाने आम आदमी पक्षाचा (आप) माजी नगरसेवक ताहीर हुसेनला हत्या आणि गुन्हेगारी कट रचल्याच्या आरोपात दोषी ठरवले आहे. या प्रकरणात ताहीरसह अकरा जण आरोपी होते.

या हाय-प्रोफाईल प्रकरणात निकाल देताना करकरडूमा न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रवीण कुमार यांनी मुख्य आरोपी ताहीर हुसेनला दोषी ठरवत त्याच्यासह ११ आरोपींवर मार्च २०२३ मध्ये भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) गंभीर कलमांखाली आरोप ठेवले होते. या प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रवीण सिंह यांनी सोमवारी सहा आरोपींची



निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश देत ताहीर हुसेनसह नाझिम, कासिम, अनस आणि जावेद या पाच आरोपींना दोषी ठरवले.

**मशिदीजवळील नाल्यात फेकला मृतदेह**

अंकित शर्मा यांचे वडील रवींद्र कुमार यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार अंकित २५ फेब्रुवारी २०२० रोजी कार्यालयातून घरी परतले. परंतु थोड्याच वेळात पुन्हा निघून गेले. बराच वेळ ते परत न आल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. स्थानिकांनी त्यांना माहिती दिली की, अंकितची हत्या करून त्याचा मृतदेह चांद बाग पुलिया भागातील मशिदीजवळच्या खजुरी खास नाल्यात फेकून देण्यात आला होता. नंतर तो मृतदेहही बाहेर काढण्यात आला. (वृत्तसंस्था)

### दंगलीदरम्यान आयबी अधिकारी झाले होते बेपत्ता

**फेब्रुवारी २०२० मध्ये ईशान्य दिल्लीत उसळलेल्या जातीय दंगलीदरम्यान आयबी अधिकारी अंकित शर्मा बेपत्ता झाले. दुसऱ्या दिवशी चांद बाग पुलियाजवळील एका नाल्यातून त्यांचा मृतदेह सापडला. त्यांच्या शरीरावर खोल जखमांच्या खुणा होत्या. अंकित शर्मा यांच्या वडिलांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे दयालपूर पोलिस ठाण्यात ताहिर हुसेन आणि इतरांविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आला. फिर्यादी पक्षानुसार, दंगलखोर जमावाला भडकवण्यात आणि संपूर्ण कट रचण्यात हुसेनने महत्त्वाची भूमिका बजावली होती.**



विद्यापीठातील विद्यार्थिनींसह डॉ. हलामी

# जगातील उत्कृष्ट शास्त्रज्ञांमध्ये डॉ. प्रकाश हलामी

**कुरखेडा, १३ जुलै**

सध्या म्हैसूर येथील वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्था येथे कार्यरत असलेले गडचिरोली जिल्ह्यातील पहिले शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश एम. हलामी यांची ओपनप्लेक्स डेटाबेस-२०२५ च्या साय-रँक ग्लोबल रजिस्ट्रीमध्ये जगातील पाच टक्के सर्वोत्तम शास्त्रज्ञांमध्ये निवड झाली आहे. जागतिक स्तरावर निवड झालेले ते जिल्ह्यातील पहिलेच संशोधक ठरले आहेत.

साय-रँक ग्लोबल इंडेक्स एक वार्षिक डेटा आधारित मानांकन आणि प्रमाणन प्रणाली असून जी ग्रंथमापन डेटा वापरून दरवर्षी जगातील सक्रिय संशोधकाचे मूल्यांकन करते. हे मानांकन वार्षिक डेटा स्नॅपशॉटमधून तयार केले जाते. भारतामध्ये एक मोठा वैज्ञानिक समूह आहे तसेच बरेच संशोधन संस्था व विद्यापीठे देखील आहेत. मात्र, विकसनशील देशाच्या तुलनेत येथील संशोधकांच्या एकूण प्रोफाईलचे प्रमाण केवळ २ टक्केच आहे. डॉ. प्रकाश हलामी यांना तीन दशकांहून अधिक संशोधन क्षेत्राचा अनुभव असून जगातील शीर्षस्थानी असलेल्या संशोधकांपैकी एक म्हणून त्यांच्या वैज्ञानिक योगदानाला मान्यता मिळाली आहे. हा बहुमान त्यांच्या व्यापक मेटाडेटाच्या आधारे देण्यात आला, ज्यामध्ये लाखो संशोधक, प्रकाशने, संस्था, संशोधन विषय यांचा तुलनात्मक आणि सखोल अभ्यास केला गेला आणि त्यामुळे सर्व शैक्षणिक शाखांमधील संशोधनाचा व्यापक आणि पारदर्शक आढावा घेणे शक्य झाले. (तभा वृत्तसेवा)

# संवेदनशील दस्तऐवजांसाठी डिजिटल स्वाक्षरी अनिवार्य

## पारदर्शकता, सुरक्षिततेसाठी राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई, १३ जुलै**

शासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता, गतिमानता आणि दस्तऐवजांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्य शासनाचे सर्व महत्त्वपूर्ण निर्णय, आदेश, अधिसूचना आणि मंजुरीपत्रे यापुढे केवळ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र किंवा 'ई-साइन'द्वारेच निर्गमित करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भातील अधिकृत शासन परिपत्रक माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाकडून आज जारी करण्यात आले आहे.

शासनाच्या विविध विभागांमार्फत जारी केले जाणारे आदेश आणि अधिसूचना थेट नागरिकांचे हक्क, मालमत्ता, आर्थिक दायित्वे आणि वैधानिक निर्णयांशी संबंधित असतात. त्यामुळे अशा संवेदनशील दस्तऐवजांची अखंडता, सत्यता आणि दीर्घकालीन रेकॉर्ड व्यवस्थापन डिजिटल माध्यमातून सुरक्षित करणे आवश्यक होते. माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २ हजार अंतर्गत डिजिटल स्वाक्षरीला आधीच कायदेशीर मान्यता मिळालेली असून, शासकीय कामकाजात 'ई-ऑफिस' प्रणालीचा वापर वाढल्यामुळे आता हा निर्णय अनिवार्य करण्यात आला आहे.

या नव्या धोरणानुसार शासन निर्णय, परिपत्रके, जमिनी भूसंपादन विषयक आदेश, न्यायालयीन आणि निम-न्यायालयीन प्रकरणांचे निर्देश, वित्तीय मंजुरी, बदल्या, पदोन्नती, तसेच निविदा, करारनामे आणि नागरिकांच्या परवान्यांशी संबंधित सर्व संवेदनशील दस्तऐवज केवळ डिजिटल स्वाक्षरीनेच जारी करावे लागणार आहेत. या महत्त्वपूर्ण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या संगणकीय प्रणाली आणि कार्यप्रवाहात आवश्यक ते तांत्रिक बदल करण्यासाठी ३१ जुलै २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर, १ ऑगस्ट २०२६ पासून या सर्व प्रकारच्या दस्तऐवजांवर डिजिटल स्वाक्षरी किंवा 'ई-साइन' असणे पूर्णपणे अनिवार्य राहील. केवळ अत्यंत अपवादात्मक आणि अपरिहार्य परिस्थिती वगळता कोणत्याही कार्यालयात हस्तस्वाक्षरित म्हणजेच भौतिक स्वरूपातील दस्तऐवज स्वीकारले जाणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे. (तभा वृत्तसेवा)



**ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात सुरू असलेल्या मुसळधारेमुळे आसामच्या अनेक भागात पुराचे पाणी शिरले आहे. मोरीगाव येथे पुराचे पाणी घरांमध्ये शिरल्याने पाळीव प्राण्यांना सुरक्षित नेताना महिला**

### नागालँडमध्ये आयईडी स्फोट, एक जवान हुतात्मा

**सुखोई :** नागालँडच्या सुखोई भागात आसाम रायफल्सच्या ताफ्याजवळ एक संशयित स्फोटक उपकरण (आयईडी) फुटल्याचे वृत्त आहे. या स्फोटात एक जवान शहीद झाला असून चार जण जखमी झाले आहेत. हा स्फोट नागालँडच्या चुमौकेदिमा भागात झाला. एका आठवड्यात आसाम रायफल्सच्या ताफ्याजवळ आयईडी फुटल्याची ही दुसरी घटना आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली असून शोधमोहीम सुरू आहे.

आसाम रायफल्सचा ताफा नागालँडच्या चुमौकेदिमा भागात नियमित गस्त घालत असताना रस्त्याच्या कडेला ठेवलेल्या एका शक्तिशाली आयईडीचा स्फोट झाला.

# नितीन गडकरी-योगींनी घेतला महामार्ग प्रकल्पांचा आढावा

**लखनौ, १३ जुलै**

उत्तरप्रदेशात जागतिक दर्जाची रस्ते जोडणी विकसित करणे ही केंद्र सरकारच्या सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक बाब आहे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी सांगितले. राज्यातील विस्तारणारे महामार्ग जाळे गुंतवणूक, उद्योग, पर्यटन आणि रोजगाराला चालना देईल, असे उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ठामपणे सांगितले. राज्यातील प्रमुख राष्ट्रीय महामार्ग आणि रस्ते पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या आढावा बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त वक्तव्य केले.

या बैठकीला रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि उत्तरप्रदेश सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपस्थिती होती, असे एका निवेदनात म्हटले आहे. उत्तरप्रदेशात जागतिक दर्जाचे रस्ते जाळे विकसित करणे हे आमचे प्राधान्य आहे. हे राज्य देशाच्या आर्थिक विकासाचे एक प्रमुख इंजिन म्हणून उदयास आले आहे, असे असे गडकरी म्हणाले. प्रकल्पांची वेळेवर पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी भूसंपादन, वन विभागाच्या परवानग्या, उपयुक्तता सेवांचे स्थलांतर आणि इतर वैधानिक मंजुरींची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करावी, असा निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिला. रस्ते बांधकामासोबतच अपघात कमी करण्याकडेही समान लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पात सुरक्षित रचना, 'ब्लॅक स्पॉट्स'मध्ये (अपघातप्रवण क्षेत्रात) शास्त्रीय सुधारणा, आधुनिक फलक आणि रस्ते सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन यांचा समावेश असायला हवा, असे रस्ते सुरक्षेवर भर देताना त्यांनी सांगितले.

आधुनिक रस्ते पायाभूत सुविधा हाच विकसित उत्तरप्रदेशचा पाया आहे. रस्त्यांची उत्तम जोडणी गुंतवणूक, उद्योग, कृषी, पर्यटन, व्यापार आणि रोजगाराला नवी गती देईल, असे योगी आदित्यनाथ म्हणाले. (वृत्तसंस्था)

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कुरघोडीचे राजकारण

## ब्रिजमोहन श्रीवास्तव यांची निवडणूक आयोगाकडे धाव

**नवी दिल्ली, १३ जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात सर्व काही सुरळीत नसून पक्षांतर्गत कुरघोडीचे राजकारण सुरु असल्याचे समजते. पक्षाचे माजी महासचिव ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी निवडणूक आयोगाकडे धाव घेत पक्षाच्या वतीने पत्रव्यवहार करण्याचा अधिकार पक्षात चौघांनाच असल्याचा दावा केला आहे. यापैकी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार तसेच राष्ट्रीय महासचिव एस. आर. कोहली यांचे निधन झाले असल्यामुळे पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि राष्ट्रीय महासचिव म्हणून मी केलेला पत्रव्यवहारच अधिकृत समजण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

२७ जुलै २०२५ ला पक्षाचे राष्ट्रीय महासचिव कोहली यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची जी यादी जाहीर केली, ती यादीच अधिकृत आहे, त्यामुळे निवडणूक आयोगाला जो काही पत्रव्यवहार करायचा असेल तो त्यांनी या पदाधिकाऱ्यांसोबतच केला पाहिजे, अशी मागणी श्रीवास्तव यांनी या पत्रातून केली आहे.

पक्षाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवडणूक पक्षाच्या संविधानाप्रमाणे झाली नाही, नव्या अध्यक्षाच्या निवडणुकीसाठी पक्षाच्या कार्यकारी समितीने कोणताही प्रस्ताव पारित केला नव्हता, असा आरोप त्यांनी या पत्रातून केला आहे. आपत्कालिन परिस्थितीपक्षाची सर्वोच्च कार्यकारी समिती प्रस्ताव पारित करुनच नव्या अध्यक्षाची निवड करु शकते, अशी तरतूद पक्षाच्या संविधानात असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**कायदेशीर नोटिस पाठवली**

पक्षाचे राष्ट्रीय सचिव सच्चिदानंदसिंह यांनी सुनेत्रा पवार यांना कायदेशीर नोटिस पाठवली आहे. २६ फेब्रुवारी २०२६ ला सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जी निवड करण्यात आली, ही निवड प्रक्रिया पूर्णपणे अवैध असल्याचा आरोप या नोटिसीतून करण्यात आला आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची अध्यक्ष म्हणून झालेली निवडप्रक्रिया रद्द ठरवत पक्षाच्या अध्यक्षाची नव्याने निवड करण्याची मागणी या नोटिसीतून करण्यात आली आहे. सुनेत्रा पवार यांच्याशिवाय पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष अध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि सचिव ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनाही ही नोटिस पाठवण्यात आली आहे. (तभा वृत्तसेवा)

# वर्धेच्या वारकऱ्यांना पुण्यात पुरणपोळीचा पाहुणचार

## सिंधुताई सपकाळ यांच्या जन्मभूमीतील नात्याची ओढ कायम

**वर्धा, १३ जुलै**

अनाथांच्या जीवनात मायेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या पद्मशी सिंधुताई सपकाळ यांनी जपलेली परंपरा आजही त्यांच्या संस्थेत जोपासली जात आहे. त्यांच्या जन्मभूमी असलेल्या वर्धा जिल्ह्यातून आळंदी ते पंढरपूर पायी वारी करणाऱ्या तब्बल ३०० वैदर्भीय वारकऱ्यांचे ममता बाल सदन (बालगृह) येथे पुरणपोळीच्या भोजनाने स्वागत करण्यात आले. माईंच्या विचारांची ही सेवा २७ वर्षांपासून अखंड सुरू आहे.

### २७ वर्षांपासून सुरू आहे परंपरा

**वर्धा जिल्ह्यातील दिंडी क्रमांक २१७ मधील जवळपास ३०० वारकरी मागील २७ वर्षांपासून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होत आहेत. संत ज्ञानेश्वर माउली पायदळ वारकरी दिंडी मंडळ यांच्या वतीने दिंडी मालक कवडू महाराज कठाने आणि दिंडी चालक लक्ष्मण महाराज तराळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही पंढरपूरकडे प्रस्थान करत आहे.**

> माईंनी १९९३ मध्ये ममता बाल सदनची स्थापना केली. तेव्हापासून वर्धा जिल्ह्यातील वारकरी दिंडीचा मुक्काम या संस्थेत असतो. माईंनी सुरू केलेली ही परंपरा अखंड सुरू ठेवणे, हेच आमचे कर्तव्य आहे.
> – **दीपक गायकवाड**, अध्यक्ष, ममता बाल सदन

पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण येथील संस्थेत वारकऱ्यांचा दोन दिवस मुक्काम होता. पद्मशी डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदनचे अध्यक्ष दीपक गायकवाड, ममता सपकाळ, सुजाता गायकवाड, अधीक्षक स्मिता पानसरे यांनी वारकऱ्यांचे स्वागत केले. पुरणपोळी, चपाती, पाटोडीची भाजी, कढी, पालक व कांदा भजी, वरण-भात, सलाद अशा रुचकर भोजनाची व्यवस्था करण्यात आली. रात्री काल्याचे कीर्तन, हरिपाठ रंगला. सोमवारी सकाळी ८ वाजता ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात ही दिंडी जेजुरीमार्गे पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. यावेळी आश्रमातील मुलींनी पावली, फुगडी आणि अभंगांच्या गजरात वारकऱ्यांना निरोप दिला. (तभा वृत्तसेवा)

# गांजा तस्कराला अटक, २४ किलो गांजासह १३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जुलै-**

ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करत एका गांजा तस्कराला रंगेहाथ अटक करुन त्याच्याकडून २४ किलो ९४० ग्रॅम गांजा आणि एक ॲक्टिव्हा स्कूटर असा एकूण १३ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मुन्ना अब्दुल गफूर शेख (वय-४८, रा.पाच्छा पेठ, सोलापूर) असे त्या आरोपीचे नाव आहे.



नळदुर्ग ते सोलापूर म हामार्गावरुन आरोपी मुन्ना शेख हा एम.एच.१३ इ.एच.३७५९ या क्रमांकाच्या ॲक्टिवा दुचाकीवरुन गांजा घेऊन येत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मि ळाली होती. त्यानुसार महामार्गावर सापळा रचून त्या आरोपीस ताब्यात घेण्यात आले. त्याच्या जवळील प्लास्टिक पोत्याची झडती घेतली असता, त्यात १२ लाख ४७ हजार रुपये किंमतीचा २४ किलो ९४० ग्रॅम गांजा आढळला. याप्रकरणी सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय जगताप, तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक कुंदन गावडे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक भीमगोंडा पाटील, पोलिस अंम लदार सलीम बागवान, अजय भोसले, विजय भरले, दीपाली जाधव, सागर ढोरे-पाटील, प्रमोद शिंपाळे, किरण चव्हाण, अनंत चमके, पैगंबर नदाफ आदींनी ही कामगिरी पार पाडली.

# पूर नियंत्रण कामात अडथळा; जमीन मालकाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जुलै-**

पूर परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सोलापूर म हानगरपालिकेतर्फे हाती घेण्यात आलेल्या पर्जन्य जलवाहिनी प्रकल्पाच्या कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी मजरेवाडी येथील गट क्रमांक ७६ चे जमीन मालक नेताजी शकुंभर भोपळे यांच्याविरोधात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत म हानगरपालिकेचे कनिष्ठ अभियंता मनोज कालिदास जाधव यांनी फिर्याद दिली.

भारतीय सर्वेक्षण विभागाच्या १९७८ आणि २००१ च्या टोपोशिटनुसार या भागात नैसर्गिक नाला अस्तित्वात आहे. मात्र, नेताजी भोपळे यांनी वैयक्तिक फायद्यासाठी या नैसर्गिक प्रवाहाची दिशा वळवली होती. त्यामुळे नाल्याची वहन क्षमता कमी होऊन २०२० आणि २०२५ च्या अतिवृष्टीदरम्यान संपूर्ण परिसरात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. यासंदर्भात महापालिकेकडून भोपळे यांना राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम ांतर्गत कायदेशीर नोटीस बजावली होती.

सोमवार, दि.१३ जुलै २०२६ रोजी सकाळी ११:३० ते १२:३० वाजण्याच्या सुमारास विजापूर नाका पोलिसांच्या बंदोबस्तात महापालिकेचे पथक दोन पोकलेन मशीनसह मजरेवाडी येथे काम सुरु करण्यासाठी गेले असता आरोपी नेताजी भोपळे पोकलेन म शीनच्या समोर बसून, 'मी या जागेवरून नाल्याचे काम करु देणार नाही' अशी भूमिका घेत शासकीय कामात थेट अडथळा निर्माण केला. यावरुन त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस उपनिरीक्षक अशोक तरंगे हे पुढील तपास करीत आहेत.

# महामार्गावर डिझेल चोरणारे दोन चोरटे जेरबंद; ४ लाख ७४ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**सोलापूर, दि.१३ जुलै-**

महामार्गावर थांबलेल्या वाहनांमधून डिझेल चोरी करणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांना ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने जेरबंद केले आहे. या कारवाईत पोलिसांनी १ स्विफ्ट कार आणि २४५ लिटर डिझेलसह एकूण ४ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. वाहीद इमाम सय्यद (वय-२४), मदनशा गुलाबशा मकानदार (वय-१९, दोघेही रा.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर) अशी आरोपींची नावे आहेत.

हैदराबाद रोडवरील संगदरी फाटा येथे हे आरोपी डिझेल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिस नाईक आसिफ शेख यांना मिळाली होती. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक बालाजी कांबळे व पथकाने सापळा रचून एम.एच.४६ ए.पी.०५०१ या क्रमांकाच्या चारचाकीसह त्या दोघा आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता दि.१४ जून रोजी कोंडी येथील ट्रकमधून आणि २६ जून रोजी हगलूर येथे एस.टी.बसमधून डिझेल चोरी केल्याची कबुली दिली.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर अधीक्षक विजय कबाडे, पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक बालाजी कांबळे, सहायक फौजदार इसाम सय्यद, पोलिस अंमलदार अविनाश पाटील, आसिफ शेख, यश देवकते, समर्थ गाजरे यांनी ही कामगिरी पार पाडली.

# बँकॉकमधील पबला भीषण आग; २७ जणांचा मृत्यू

## १२ पेक्षा जास्त नागरिक गंभीर जखमी

**बँकॉक, १३ जुलै**

येथील एका बीअर हॉलला सोमवारी पहाटेच्या सुमारास लागलेली भीषण आग अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नियंत्रणात आणण्यापूर्वी किमान २७ जण ठार, तर १२ पेक्षा जास्त जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

थायलंडची राजधानी असलेल्या शहराच्या उत्तरेकडील भागातल्या 'ना लाडप्राओ' बिअर हॉलमध्ये भीषण आग लागल्याचे आणि त्याच्या मुख्य प्रवेशद्वारातून धुराचे लोट बाहेर पडत असल्याचे मदतकार्यात सहभागी झालेल्यांनी शेअर केलेल्या दृश्यांमध्ये दिसून आले. आकाशात दाट काळा धूर पसरत असताना लोक तिथून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसले.

आग लागण्याच्या कारणाचा शोध अधिकारी घेत आहेत. मात्र, तपासणी अधिकारी छताच्या साहित्याची तपासणी करतील आणि बाहेर पडण्याचा आपत्कालीन मार्ग अडवलेले आहेत का, हे पाहतील, असे बँकॉकचे गव्हर्नर चाडवार्ट सिट्टीपंट यांनी सांगितले. आपत्कालीन मार्गात अडथळे असल्यास लोकांना बाहेर पडण्यास अडचण होऊ शकते, असे ते म्हणाले. रविवारी मध्यरात्रीच्या काही काळ आधी ही भीषण आग लागली, असे बँकॉक महानगर प्रशासनाने सांगितले.

ही जागा सोमवार सकाळपर्यंत सील करण्यात आली होती आणि १२ पेक्षा जास्त थाई न्यायवैद्यक विभागाचे अधिकारी आगीचे कारण शोधण्यासाठी जळालेल्या अवशेषांची कसून तपासणी करीत होते. इमारतीच्या रस्त्याकडील बाजूची खिडक्यांची तावदाने फुटून उडाली होती आणि पदपथावर ढिगारा पडला होता. त्यात जळून खाक झालेले टीव्ही सेट्स, स्पीकर्स आणि एका इलेक्ट्रिक गिटारचा समावेश होता. बाहेरून पाहताना फुटलेल्या खिडक्यांमधून त्या विध्वंसाची व्याप्ती स्पष्ट दिसत होती. आत जळून खाक झालेली टेबले होती. यापैकी काहींवर बिअरच्या बाटल्या तशाच पडून होत्या.

**अनेक पीडित प्रसाधनगृहांत आढळले**

या आगीत २७ जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती पंतप्रधान अनुतिन चार्नविराकूल यांनी घटनास्थळावर पत्रकारांना दिली. वीज जाण्यापूर्वी मंचाजवळील सर्किट ब्रेकरमधून धूर येताना दिसला; त्यानंतर स्फोटाचा आवाज झाला आणि काही क्षणांतच त्या ठिकाणी दाट धूर पसरला, अशी माहिती बारमध्ये सादरीकरण करणाऱ्या एका संगीतकाराने दिल्याचे अनुतिन चार्नविराकूल यांनी सांगितले. अनेक पीडित बारच्या मागील बाजूला असलेल्या प्रसाधनगृहांमध्ये आढळले, असे अनुतिन यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



आगीच्या ठिकाणी पाहणी करताना न्यायवैद्यक विभागाचे अधिकारी

### बौद्ध भिक्खूंनी केली प्रार्थना

सोमवारी सकाळी काही बौद्ध भिक्खूंनी घटनास्थळी जाऊन पीडितांसाठी प्रार्थना केली, तर जळून खाक झालेल्या इमारतीतून निघणारा धूर आणि वाफांपासून संरक्षण करण्यासाठी परिचारिकांनी आसपासच्या लोकांना मुखाच्छादन वाटले.

### २२ जणांची प्रकृती गंभीर

६३ जणांना रुग्णालयात नेण्यात आले असून, त्यापैकी २२ जणांची प्रकृती गंभीर आहे. अनेक जणांकडे ओळखपत्र नव्हते किंवा ते बेशुद्ध होते, त्यामुळे पीडितांची ओळख पटवण्याचे काम अधिकारी करीत आहेत, असे बँकॉकच्या गव्हर्नरनी सांगितले.

## झेलेन्स्कींनी युरोपकडे मागितली हवाई संरक्षण यंत्रणा

**कीव्ह, १३ जुलै**

युक्रेनवरील रशियाच्या आक्रमणाचा सामना करण्यासाठी कीव्हला मदत करण्यासाठी जवळपास २४ पेक्षा जास्त युरोपियन नेत्यांसोबत चर्चा करण्यासाठी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदोमिर झेलेन्स्की सोमवारी पॅरिसमध्ये होते.

या चर्चेदरम्यान त्यांनी हवाई संरक्षण यंत्रणेची मागणी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. युरोपियन देशांचे परराष्ट्र मंत्री ब्रुसेल्समध्ये स्वतंत्रपणे बैठक घेत होते. या बैठकीत युक्रेनच्या गरजा आणि या खंडाला निर्माण झालेला धोका यावर चर्चा होणे अपेक्षित होते. युक्रेन आणि त्यांचे युरोपियन समर्थक हे युक्रेनच्या अलिकडील यशाचा पुरेपूर लाभ उठवण्यास आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांना संघर्ष संपवण्यासाठी वाटाघाटी करण्यास भाग पाडण्यास उत्सुक आहेत. मात्र, ट्रम्प प्रशासनाने वर्षभर शांततेसाठी प्रयत्न करूनही रशियाने तडजोड करण्याची कोणतीही तयारी दर्शवली नाही. रशिया पॅरिसमधील बैठकीवर बारकाईने लक्ष ठेवेल, असे क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



# रशिया-इराणचा 'क्रिप्टो'मध्ये व्यापार

**। ९.९२ लाख कोटींचे व्यवहार । वेगळे नेटवर्क केले तयार**

**मॉस्को, १३ जुलै**

रशिया, इराण आणि उत्तर कोरियाने जगाच्या बँकिंग व्यवस्थेपासून वेगळी, क्रिप्टोच्या माध्यमातून एक समांतर पेमेंट प्रणाली उभी केली आहे. क्रिप्टो व्यवहारांवर लक्ष ठेवणाऱ्या चेनालिसिस संस्थेनुसार, २०२५ मध्ये त्यांनी क्रिप्टोद्वारे तब्बल ९.९२ लाख कोटी रुपयांचे व्यवहार केले आहेत. हे २०२४ च्या तुलनेत आठपट जास्त आहे. हे देश या रकमेचा वापर केवळ व्यापार किंवा बचतीसाठी करत नाहीत, तर ड्रोन, शस्त्रास्त्रांचे सुटे भाग, लष्करी तंत्रज्ञान आणि तेलाच्या पेमेंटसाठी करीत आहेत.

रशियाने रुबलशी संबंधित ए-७५ टोकन तयार केले. यात रशियामध्ये रुबल देऊन परदेशात क्रिप्टोमध्ये बदलता येते. मे महिन्यापर्यंत यात ११.४ लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत. नेटवर्कमध्ये ४१ हजारांपेक्षा जास्त खाती आणि २.५ लाख हस्तांतरणे नोंदवली गेली. इराणने देशांतर्गत एक्सचेंजेसना तेल विक्री आणि परदेशी देयकांसाठी पर्यायी मार्ग बनवले आहे. रिव्होल्युशनरी गार्ड क्रिप्टोमधून तेलाचे पैसे घेतात आणि ते डिजिटल वॉलेटमध्ये इतर देशांमध्ये पाठवतात. विशेषज्ञ क्रिप्टोला रशिया-इराणसाठी निर्बंधांच्या समांतर चालणारी एक स्थायी आर्थिक व्यवस्था मानत आहेत.

उत्तर कोरियाने क्रिप्टो चोरीला कमाई आणि शस्त्र कार्यक्रमाचे साधन बनवले आहे. २०२५ मध्ये त्याच्या हॅकर्सनी २० हजार कोटी रुपये चोरले. सर्वात मोठी घटना २१ फेब्रुवारी रोजी घडली. यात लाझारस समूहाने बायबिटमधून १४,३१० कोटी रुपये उडवले.

एफबीआयने याला 'ट्रेडरेटर' नेटवर्कशी जोडले. २०१६ पासून उत्तर कोरियाने २६३ घटनांमध्ये ६.७५ अब्ज डॉलर्सची क्रिप्टो चोरी केली आहे. याचा वापर तो क्षेपणास्त्रे आणि लष्करी उपकरणे खरेदी करण्यासाठी करत आहे.

इराणचे सर्वात मोठे क्रिप्टो एक्सचेंज नोबाइटेक्स. देशातील सुमारे ७० टक्के डिजिटल चलन व्यवहार सांभाळते आणि त्याचे १.१ कोटी वापरकर्ते आहेत. (वृत्तसंस्था)

### क्रिप्टो कंपन्यांमध्ये बनावट नोकऱ्या

बनावट ओळख, एआयने तयार केलेली कागदपत्रे आणि डीपफेक मुलाखतींद्वारे चीन, उत्तर कोरिया आणि इराणसारख्या देशांतील ऑपरेटिव्हजनी ४० देशांतील क्रिप्टो आणि तांत्रिक कंपन्यांमध्ये रिमोट नोकऱ्या मिळवल्या. या नेटवर्कने दोन वर्षांत २६,७०० कोटी रुपये जमा केले. अनेक प्रकरणांमध्ये कर्मचारी त्याच देशात काम करीत असल्याचे दिसावे म्हणून स्थानिक मदतनीसांनी 'फर्म' चालविल्याचे निष्पन्न झाले.

# मदरसा शिक्षकांच्या याचिका फेटाळल्या

**सुप्रीम कोर्टाचा निर्णय**



## नियुक्त्या अवैध असल्याचे आढळले

**नवी दिल्ली, १३ जुलै**

राज्य सरकारच्या अनुदान योजनेनुसार मदरशांमधील ३६० शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासकीय नोकरीत कायम करणे आणि त्यानुसार वेतन सुरू करण्याच्या केलेल्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या आहेत. त्यामुळे पश्चिम बंगालमधील या शिक्षकांना मोठा झटका बसला आहे.

पश्चिम बंगालमधील ३६० शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वतीने ४८ याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या. यापैकी १३ प्रकरणांवर न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती ए.जी. मसिह यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली. या याचिकाधारकांना दिलासा देण्यासाठी काही ठोस आधार आहे काय? याची तपासणी केली. यापैकी एकही याचिकाकर्ता आम्हाला प्रभावित करू शकला नाही. त्यामुळे आम्ही ह्या १३ याचिका तर फेटाळत आहोतच पण उर्वरित याचिकाही फेटाळत आहोत. ह्या याचिका गुणवत्तेच्या दृष्टीन निरर्थक आहेत, असे न्यायासनाने आपल्या निकालात म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयात पोहचलेला हा वाद 'पश्चिम बंगाल मदरसा सेवा आयोग कायदा, २००८' शी संबंधित आहे. या कायद्यान्वये मान्यताप्राप्त मदरशांमधील शिक्षकांच्या नेमणुकीची शिफारस करण्यासाठी पश्चिम बंगाल सरकारने एका वैधानिक आयोगाची स्थापना केली होती. मात्र, कोलकाता उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये हा कायदा रद्दबातल ठरविला होता. तसेच २०१५ मध्ये पुनरावलोकन याचिकाही फेटाळली होती. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. मार्च २०१६ मध्ये सुप्रीम कोर्टाने कोलकाता हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली. (वृत्तसंस्था)

### नेमणुकांची वैधता तपासण्यासाठी समिती

दरम्यान, २०२५ चा कलकता उच्च न्यायालयाचा निर्णय आणि २००८ चा कायदा कायम ठेवणारा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय या दोन कालवधीदरम्यान करण्यात आलेल्या नेमणुकांची वैधता तपासण्यासाठी सुप्रीम कोर्टाने एक समिती स्थापन केली होती. तपासणीत नेमणूका अवैध असल्याचे आढळून आले. संबंधित कर्मचाऱ्यांनी समितीच्या निष्कर्षांनाही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

## चित्रपट वार्ता

### वारीत रिंकूचा खास शूट



**मुंबई :** पावसाळा सुरू झाला की वारकऱ्यांसह संपूर्ण महाराष्ट्राला विठ्ठलाच्या पंढरीच्या वारीचे वेध लागतात. यंदाची वारी आणखी खास करण्यासाठी अभिनेत्री रिंकू राजगुरू सज्ज झाली आहे. काही दिवसांपूर्वी रिंकूचे वारीमधील काही फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. त्यानंतर ती काहीतरी नवीन घेऊन येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. आता या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून रिंकूचा भक्तिमय अंदाज लवकरच प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. सारेगम मराठीच्या आगामी वारी स्पेशल गाण्यात रिंकू राजगुरू एका नव्या रूपात दिसणार आहे. 'बाप विठुराया' असे या गाण्याचे नाव असून, प्रसिद्ध गायक अजय गोगावले यांच्या दमदार आवाजातून हे भक्तिगीत साकारले जाणार आहे.

### आता जेठालाल दिसणार नाही



**मुंबई :** छोट्या पडद्यावरील सर्वाधिक लोकप्रिय मालिकांपैकी एक असलेल्या 'तारक मेहता का उल्टा चष्मा'ने गेल्या १५-१६ वर्षांपासून प्रेक्षकांचे सातत्याने मनोरंजन केले आहे. मालिकेतील प्रत्येक कलाकाराने आपल्या अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले असले, तरी जेठालाल हे पात्र सर्वाधिक लोकप्रिय ठरले आहे. अभिनेते दिलीप जोशी अनेक वर्षांपासून ही भूमिका साकारत असून त्यांच्या अचूक विनोदी टायमिंग, प्रभावी हावभाव आणि वैशिष्ट्यपूर्ण संवादफेकीमुळे त्यांना केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही मोठी लोकप्रियता मिळाली आहे. मात्र, आता जेठालालच्या चाहत्यांसाठी निराशाजनक बातमी समोर येत आहे. आगामी काळात निर्माते मालिकेतील जेठालालचा ट्रॅक कमी करण्याचा विचार करत असल्याची चर्चा आहे. काही दिवसांपूर्वीच या मालिकेत एका नव्या राजस्थानी कुटुंबाची एंट्री झाली आहे. या कुटुंबात पती, पत्नी आणि दोन मुलांचा समावेश असून अभिनेते कुलदीप गौर हे रतन सिंह बिंजोला ही भूमिका साकारत आहेत.

### 'पेड्डी'चा जलवा कायम



**मुंबई :** दर आठवड्याला विविध 'ओटीटी' प्लॅटफॉर्मवर अनेक चित्रपट आणि वेब सिरीज प्रदर्शित होत असतात. मात्र, त्यापैकी मोजकेच चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरून अल्पावधीत लोकप्रियतेचे नवे विक्रम प्रस्थापित करतात. अशाच चित्रपटांपैकी 'पेड्डी' या स्पोर्ट्स ड्रामाने सध्या नेटफ्लिक्सवर आपला ठसा उमटवला आहे. चित्रपटगृहांमध्ये दमदार यश मिळवल्यानंतर या चित्रपटाने 'ओटीटी'वरही आपला प्रभाव कायम राखला असून, ९ जुलै रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या २४ तासांत तो प्लॅटफॉर्मवरील सर्वाधिक पाहिला जाणारा आणि ट्रेंडिंगमध्ये अव्वल क्रमांकाचा चित्रपट ठरला आहे. 'पेड्डी' प्रदर्शित होताच सोशल मीडियावर त्याची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली. दमदार कथा, भावनिक प्रसंग, थरारक ॲक्शन आणि क्रीडाविषयक कथानक यामुळे प्रेक्षकांनी या चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. याच प्रतिसादाच्या जोरावर नेटफ्लिक्सच्या ट्रेंडिंग यादीत 'पेड्डी'ने पहिले स्थान पटकावले आहे.

## यमुना नदीत चार मुले बुडाली

**नवी दिल्ली, १३ जुलै**

यमुना नदीत आंघोळ करायला गेलेली चार लहान मुले नदीच्या प्रवाहात वाहून गेली. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून बेपत्ता मुलांपैकी दोघांचे मृतदेह सापडले आहेत, तर इतरांचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे कुटुंबीय दुःखात बुडाले आहेत. ही धक्कादायक घटना उत्तर दिल्लीत हिरंकी गावाजवळ घडली. पोलिसांनुसार, रविवारी सायंकाळी पाच मुले यमुना नदीच्या काठावर खेळायला आणि आंघोळ करायला गेली होती. दिल्लीतील मान्सून आणि खाडीतील पाणी सोडल्यामुळे यमुना नदीची पाणी पातळी अचानक वाढली आहे. (वृत्तसंस्था)

# ट्रकला स्कॉर्पिओची धडक; तिघांचा मृत्यू, ९ जखमी

**कानपूर, १३ जुलै**

भरधाव स्कॉर्पिओने महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकला जबर धडक दिली. यात स्कॉर्पिओस्वार तीन जणांचा मृत्यू झाला तर नऊ जण जखमी झाले आहेत. जखमींवर रूग्णालयात उपचार सुरु आहे. ही धडक एव्हढी भीषण होती की, कारचा चचक्काचूर झाला. ही घटना महाराजपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत सोमवारी पहाटे ५:३० च्या सुमारास कानपूर-प्रयागराज राष्ट्रीय महामार्गावर घडली.

पोलिसांनुसार, रूमा येथील न्यू जेके ढाब्याजवळ महामार्गावर उभ्या असलेल्या एका ट्रकला भरधाव स्कॉर्पिओने धडक दिली. ही कार हरियाणातील सिरसा येथून बिहारकडे जात होती. गाडीत बारा जण होते. प्रत्यक्षदर्शींनुसार, एका अज्ञात वाहनाला चुकवण्याच्या प्रयत्नात स्कॉर्पिओवरील नियंत्रण सुटले आणि तिने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून धडक दिली. स्कॉर्पिओमध्ये प्रवास करणाऱ्यांमध्ये एका पुरुषासह एक मुलगा व एका मुलीचा समावेश आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या नऊ जणांना रुग्णवाहिकेने कांशीराम रुग्णालयात नेण्यात आले. प्रथमोपचारानंतर, त्या सर्वांना हॅलेट रुग्णालयात हलवण्यात आले. जखमींमध्ये दोन महिला, चार पुरुष आणि तीन मुलींचा समावेश आहे. त्यापैकी दोन महिला आणि एका पुरुषाची प्रकृती चिंताजनक आहे. (वृत्तसंस्था)





कर्नाटकातील मंगलुरू जिल्ह्यातील पाडू कोंजारे येथे भाताच्या शेतात मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. भावी पिढीची माती आणि शेतीसोबत नाळ जुळून राहावी, यासाठी दरवर्षी विविध खेळांचे उपक्रम राबविले जातात

# पेट्रोल-डिझेलच्या किमती आणखी भडकणार?

## अमेरिका- इराण संघर्ष पुन्हा तीव्र झाल्याने तज्ज्ञांचा इशारा

**दुबई, १३ जुलै**

अमेरिका आणि इराणमधील संघर्ष पुन्हा एकदा उफाळून आला आहे. या संघर्षामुळे पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. कच्च्या तेलाचे भाव प्रति बॅरल ८० डॉलर्सच्या जवळ पोहोचले आहेत. संघर्ष कायम राहिला तर हे भाव प्रति बॅरल ११० ते १५० डॉलर्सपर्यंत वाढू शकतात, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. या वाढीचा थेट परिणाम भारतातील पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या दरांवर होणार आहे.

सोमवारी तेलाच्या दरात ४ टक्क्यांहून अधिक वाढ झाली. अमेरिका आणि इराणमध्ये पुन्हा एकदा संघर्ष उफाळल्यामुळे 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांच्या



सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. १३ जुलै रोजी 'ब्रेंट क्रूड फ्युचर्स'चे भाव ३.३४ डॉलर्सनी (४.३८%) वाढून प्रति बॅरल ७९.५० डॉलर्सवर पोहोचले, तर अमेरिकेच्या 'डब्ल्यूटीआय' कच्च्या तेलाचे भाव ३.०७ डॉलर्सनी वाढून प्रति बॅरल ७४.२० डॉलर्स झाले आहेत. मागील आठवड्यात ५.५ टक्क्यांची वाढ झाल्यानंतर ही नवीन दरवाढ झाली आहे; यात 'डब्ल्यूटीआय'चे भाव पुन्हा एकदा प्रति बॅरल ७४ डॉलर्सच्या वर गेले आहेत. रविवारच्या सुट्टीनंतर आज (दि. १३ जुलै) बाजार उघडताच युरोपियन नैसर्गिक वायूच्या फ्युचर्समध्येही २.५ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली असल्याने बाजारातील आर्थिक तणाव वाढल्याचे संकेत मिळू लागले आहेत. अलीकडील तणावामुळे वर्षाच्या अखेरीस जागतिक तेलाचा साठा पुन्हा भरून काढण्याच्या प्रयत्नांना धोका निर्माण झाला आहे, असे निरीक्षण आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेने (आयईए) शुक्रवारी जारी केलेल्या निवेदनात नोंदवले होते. एका जहाजावरील हल्ल्यानंतर इराणने 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' बंद केल्याचे जाहीर केले असले तरी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी सांगितले की, व्यापारी वाहतुकीसाठी हामार्ग खुला आहे. (वृत्तसंस्था)

### उत्पादनातील घट कायम

या ताज्या घडामोडींमुळे गेल्या महिन्यात स्वाक्षरी केलेल्या त्या तात्पुरत्या कराराच्या भविष्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे; ज्याचा उद्देश पुढील ६० दिवसांच्या वाटाघाटींनंतर संघर्ष सोडवणे हा होता. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या (आयईए) मासिक अहवालानुसार, करारानंतर जूनमध्ये जागतिक तेल पुरवठ्यात दररोज ४.१ दशलक्ष बॅरल्सची वाढ झाली; तरीही, उत्पादन हे युद्धापूर्वीच्या पातळीपेक्षा दररोज ९.४ दशलक्ष बॅरल्सने कमीच राहिले. बाजारातील तणाव कायम असल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे.

### कच्च्या तेलाचा प्रवाह खंडित होण्याची शक्यता

'नुवामा इन्स्टिट्यूशनल इक्विटीज'च्या मते, 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' दीर्घकाळासाठी बंद राहिली तर दररोज सुमारे २० दशलक्ष बॅरल्स कच्च्या तेलाचा प्रवाह खंडित होऊ शकतो. तेलाच्या किमती प्रति बॅरल ११० ते १५० डॉलर्सच्या दरम्यान जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, 'एसईबी'च्या मुख्य कमोडिटी विश्लेषकाच्या मते, बाजारातील सध्याची परिस्थिती पाहता, प्रति बॅरल ७० डॉलर्सऐवजी ८० डॉलर्स ही किंमत अधिक योग्य ठरेल.

## जामिनासाठी जवाद सिद्दीकीची उच्च न्यायालयात धाव

**नवी दिल्ली, १३ जुलै**

कोठडीत असलेले अल फलाह युनिव्हर्सिटी समूहाचे अध्यक्ष जवाद अहमद सिद्दीकी यांनी पत्नीच्या उपचारार्थ जामीन मिळावा, अशी विनंती सोमवारी दिल्ली उच्च न्यायालयाला केली. अंतरिम जामिनाची अट म्हणून ते जीपीएस ट्रॅकर बँड घालण्यासही तयार आहेत, असेही त्यांनी न्यायालयाला सांगितले. दोन प्रकरणांमध्ये दाखल केलेल्या अंतरिम जामिनाच्या अर्जांना विरोध करताना अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) वकिलांनी सुटकेनंतर पुराव्यांमध्ये फेरफार होण्याची आणि सिद्दीकी कायदेशीर प्रक्रियेतून पळून जाण्याची भीती व्यक्त केली. त्याऐवजी त्यांना कोठडीतील पॅरोलवर त्यांच्या पत्नीला भेटण्याची परवानगी द्यावी, असे न्यायालयाला सूचवले. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# क्षमतासिद्धीचे आव्हान दोन्हीकडे...

केंद्र किंवा राज्य सरकारांच्या कोणत्याही कल्याणकारी योजनेचे यश हे या योजनांच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. काही योजनांना चांगले यश मिळते, काहींना मिळत नाही. काही योजनांमध्ये त्रुटी दिसतात आणि कालांतराने त्या दुरुस्त केल्या जातात. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीआधी जाहीर केलेल्या व तातडीने अंमलबजावणी सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी दिसल्या आणि लगेच त्या दूर करण्याचे काम सुरू झाले. या योजनेच्या लाभार्थ्यांमधून तब्बल ९२ लाख नावे वगळण्यात आली, ही गोष्ट अंमलबजावणीच्या दृष्टीने आणि सरकारी तिजोरीच्या आरोग्यासही पोषक म्हणावी लागेल. महिलांचे सक्षमीकरण हा केंद्र आणि राज्य शासनाचा प्राधान्यक्रम आहे हे खरे आहे; पण त्यासाठी तिजोरीवर नाहक भार टाकून केवळ महिलांच्या पदरात आर्थिक मदतीचा ओघ वळविणे हा सक्षमीकरणाचा एकमेव मार्ग नाहीच, हे केंद्र सरकारच्या काही दूरदृष्टीच्या योजनांमधून स्पष्ट झाले आहे. लाडकी बहीण योजना लागू करताना राज्य सरकारचा हेतू तसाच होता. पण योजनेच्या आखणी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटींमुळे या योजनेचा गैरफायदा घेत सरकारी तिजोरीवर डल्ला मारण्यासाठी अपात्र लाभार्थ्यांची झुंबड उडाली. आर्थिक ओझ्यातून सावरण्यासाठी महिलांच्या सक्षमीकरणाअगोदर आपल्या यंत्रणांचे सक्षमीकरण करण्याची गरज स्पष्ट झाली आहे.

देशभरात महिलांच्या सक्षमीकरणाच्या असंख्य योजना राबविण्यासाठी सक्षम सरकारी यंत्रणा उभारण्यात आलेल्या आहेत. यामुळे महिलांना कायदेशीर आणि मानसिक आधार मिळू लागला. एकीकडे ज्या पात्र भगिनी आहेत, त्यांना टप्प्याटप्प्याने स्वावलंबी करतानाच, लाडकी बहीण योजनेतून वगळल्या गेलेल्या अपात्र महिलांना अन्य योजनांतील अन्य लाभांचे दरवाजे खुले करावे लागतील. महिलांकडे आता केवळ योजनांच्या लाभार्थी या नजरेने पाहिले जात नसून देशाच्या प्रगतीच्या वाटचालीच्या भागीदार आणि निर्णयकर्त्या म्हणून पाहिले जावे, ही केंद्र सरकारची भूमिका आहे. त्यामुळे योजनांची व्याप्ती वाढविताना त्या केवळ आधाराच्या कुबड्या राहू नयेत, तर कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या योजनांतून महिलांच्या अंगी स्वयंपूर्णता आणि स्वयंनिर्णयाची क्षमता निर्माण होईल यासाठी त्यांना कायमस्वरूपी आर्थिक क्षमता निर्माण होणारी साधने पुरविणे गरजेचे ठरेल. महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, गृहोद्योग किंवा बचत गटांच्या माध्यमातून उत्पादित होणाऱ्या वस्तूंसाठी हक्काची कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा सक्षमीकरणाच्या योजनेचा गाभा असला पाहिजे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने राज्यातील महिला विकासास नेहमीच प्राधान्य दिले आहे. महिला सक्षमीकरणाकरिता करण्यात आलेली तरतूद, नियोजनाची दिशा आणि अंमलबजावणीची वस्तुस्थिती पाहता आर्थिक, सुरक्षा, आरोग्य-पोषण आणि आर्थिक स्वावलंबन असे त्रिस्तरीय नियोजन करण्यात आले आहे. राज्यातील कोट्यवधी महिलांना बचत गटांसोबत जोडून त्यांना कायमस्वरूपी आर्थिक उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध करून देणारी लखपती दीदी योजना हे सरकारचे उद्दिष्ट लाडक्या बहिणींच्या यादीतून वगळल्या गेलेल्या, परंतु गरजवंत असलेल्या महिलांच्या उत्कर्षासाठी वरदान ठरणार आहे. वर्षाकाठी एक लाखांहून अधिक उत्पन्न मिळवून देण्याची हमी देणारी लखपती दीदी योजना फडणवीस सरकार गांभीर्याने राबवत असल्याने, राज्यातील ५० लाख महिला या योजनेतून आर्थिक स्वावलंबनाचा सुखद अनुभव घेऊ लागल्या आहेत. एक कोटी महिलांना लखपती बनविण्याचा या योजनेचा संकल्प असल्याने, महिलांच्या सक्षमीकरणाचा हा उद्यमशील मार्ग राज्यातील महिलांचा आत्मविश्वास वाढविणारा ठरेलच; एक कोटी कुटुंबांच्या जीवनशैलीचा आलेख उंचावणारा ठरेल. ५० लाख महिलांच्या उत्पन्नाचा आकडा एक लाखांच्या घरात नेऊन ठेवणे ही वाटते तेवढी साधी बाब नाही. देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने हा उच्चांक केव्हाच प्रस्थापित केला आहे ही आनंदाची बाब. महाराष्ट्राने याच्याही पुढे गेले पाहिजे. सरकारच्या तिजोरीतून दरमहा दीड हजारांची मदत घेऊन आपला आर्थिक स्तर उंचावण्यापेक्षा, आपल्या कष्टातून मिळविलेल्या घामाच्या पैशातून लक्षाधीश होण्याच्या समाधानाला स्वाभिमानाची झालर लाभेल, तेव्हा ते महिलांचे खरे सक्षमीकरण ठरेल. त्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा. ९२ लाख नावे वगळणे ही महाराष्ट्राच्या महिलांच्या आर्थिक उत्कर्षाच्या नव्या संधींची नांदी ठरणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या उमेद अभियानातूनही महिलांच्या बचत गटांचे सक्षमीकरण करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत महालक्ष्मी सरस सारख्या उपक्रमांतून बचत गटांच्या उत्पादनांना एक प्रतिष्ठा आणि ओळख प्राप्त झाली आहे. जनतेचा भरघोस पाठिंबा आणि सरकारचे संपूर्ण सहकार्य हा महिलांच्या आर्थिक उत्कर्षाचा योग्य मार्ग आहे, हे या अभियानाने सिद्ध केले आहे. नवी मुंबईत भरविण्यात आलेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सुमारे २५ कोटींची उलाढाल करून महिलांनी आपल्या आर्थिक क्षमतेची परीक्षा यशस्वीपणे पूर्ण केली आहे. लाडकी बहीण योजनेतील जवळपास ३८ टक्के लाभार्थ्यांची नावे आता वगळण्यात आली आहेत. या महिलांना क्षमता सिद्ध करण्याची नवी क्षितिजे आमंत्रण देतील आणि त्यासाठी सज्ज झालेल्या महिला सक्षमीकरणाचे नवे मापदंड सिद्ध करतील, तेव्हा लाडकी बहीण योजनेतून नावे वगळल्याचा त्यांना खेद वाटणार नाही; उलट नवा मार्ग सापडल्याचा अभिमान महिलांमध्ये निर्माण होईल. महाराष्ट्रातील महिला या केवळ आर्थिक योजनांच्या लाभार्थी नसून आर्थिक विकासाचे इंजिन ठराव्यात यासाठी अशा योजनांना गती देण्याची गरज सरकारने ओळखली, हे योग्यच झाले. अर्थसंकल्पातील निधीची तरतूद आणि नियोजनबद्ध अंमलबजावणी यांची योग्य सांगड घातली गेली, तर महाराष्ट्र हे नेतृत्वक्षम महिलांच्या विकासाचे एक आदर्श राज्य ठरेल आणि राज्याची अर्थव्यवस्थाही निरोगी राहील.

यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. या निमित्ताने महिला शेतकऱ्यांचा सन्मान आणि त्यांचे सक्षमीकरण यांवर विशेष भर देण्याचा संकल्प सरकारने सोडला आहे. गेल्या वर्षी याच महिन्यात उमेद अभियान योजनेस मान्यता देण्यात आल्यानंतर वर्षभरातच त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. महिला शेतकरी हा केंद्रबिंदू मानून पशुपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन अशा अनेक योजनांसाठी महिलांना सहकार्य करण्याच्या योजना अर्थसंकल्पातून सरकारने मांडल्या आहेत. उमेद अभियानातील उमेद मॉल नावाची संकल्पना हा त्याचा एक भाग आहे. महिला शेतकऱ्यांच्या कष्टाचा सन्मान करण्याचा सरकारचा मानस विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकातूनही स्पष्ट झाला आहे. प्रत्यक्ष शेतीची मालकी नसली तरी कृषी क्षेत्रात सहभागी असलेल्या महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा हा नवा प्रयोग महाराष्ट्राच्या महिलांना नवे बळ देणारा ठरेल. महिलांच्या श्रमाला कायदेशीर पाठबळ देणाऱ्या या योजनेमुळे, शासकीय लाभांपासून वंचित राहणाऱ्या लाखो महिलांच्या श्रमाची प्रतिष्ठा वाढेल. म्हणूनच, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या यादीतून ९२ लाख नावे वगळल्याचा खेद नसावा. उलट यातील अनेक महिलांकरिता नव्या संधींचे दरवाजे उघडण्याचा आनंद मिळावा, असेच कुणालाही वाटेल. त्यासाठी सरकारला आणि महाराष्ट्रातील महिलांनाही क्षमता सिद्ध करावी लागेल. ■

## आंतरराष्ट्रीय

# राजसामरिक, आर्थिक, तांत्रिक साह्य

**प्रा. जयसिंग यादव**

भारत-जपान संबंधांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये कोणताही ऐतिहासिक संघर्ष नाही; उलट परस्परविश्वास, सांस्कृतिक जवळीक आणि विकासाभिमुख सहकार्याचा मजबूत पाया आहे. जपानने भारतातील पायाभूत सुविधा उभारणीत सातत्याने योगदान दिले आहे. दिल्ली मेट्रो, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन, औद्योगिक कॉरिडॉर, मालवाहतूक मार्ग, स्मार्ट सिटी प्रकल्प अशा अनेक योजनांमध्ये जपानची आर्थिक आणि तांत्रिक भागीदारी दिसून येते. आता या सहकार्याची व्याप्ती संरक्षण आणि उच्च तंत्रज्ञानापर्यंत विस्तारत आहे. अलिकडेच पार पडलेल्या शिखर परिषदेतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संरक्षण सहकार्याला मिळालेली नवी गती. हिंद महासागरात संयुक्त नौदल सराव वाढविणे, सागरी सुरक्षेत समन्वय वाढविणे, युद्धनौकांच्या देखभालीतील सहकार्य आणि अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीबाबत दोन्ही देशांमध्ये अलिकडेच सहमती झाली. या निर्णयांचे महत्त्व लक्षात घेणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांमध्ये चीनने दक्षिण चीन समुद्र, पूर्व चीन समुद्र आणि हिंद-प्रशांत क्षेत्रात आपली लष्करी उपस्थिती मोठ्या प्रमाणावर वाढविली आहे. 'बेल्ट अँड रोड' उपक्रमाच्या माध्यमातून अनेक देशांमध्ये बंदरे, पायाभूत सुविधा आणि आर्थिक गुंतवणूक वाढवून चीनने प्रभाव विस्तारला आहे.

या पृष्ठभूमीवर भारत-जपान यांचे वाढते नौदल सहकार्य सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरते. तथापि, या सहकार्याचा उद्देश चीनविरोधी लष्करी आघाडी उभारणे हा नाही. भारत आणि जपान दोघेही मुक्त, खुला आणि नियमाधारित हिंद-प्रशांत या संकल्पनेवर भर देतात. आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर, नौवहन स्वातंत्र्य, समुद्री व्यापाराचे संरक्षण आणि प्रादेशिक स्थैर्य हे या भागीदारीचे मूलभूत तत्त्व आहे. त्यामुळे ही भागीदारी संघर्षाऐवजी संतुलन निर्माण करण्याचा प्रयत्न मानला पाहिजे. आर्थिक क्षेत्रातील करारांचे महत्त्वही कमी नाही. अलिकडेच जपानी उद्योगपतींच्या उपस्थितीत भारत आणि जपानदरम्यान शेकडो व्यावसायिक करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. विशेषतः सेमीकंडक्टर, महत्त्वाची खनिजे, हरित ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, डिजिटल तंत्रज्ञान आणि संशोधन या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला. भारताने या क्षेत्रात जपानसारख्या तंत्रज्ञानसंपन्न देशाशी सहकार्य वाढविणे ही काळाची गरज आहे. मोठी बाजारपेठ, तरुण मनुष्यबळ, वाढती औद्योगिक क्षमता आणि स्थिर लोकशाही व्यवस्था यामुळे भारत जागतिक उत्पादन केंद्र बनू शकतो. जपानची भांडवली गुंतवणूक आणि तांत्रिक कौशल्य या प्रक्रियेला वेग देऊ शकते. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांच्या यशासाठी केवळ सरकारी धोरणे पुरेशी नाहीत. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, जागतिक दर्जाची उत्पादन क्षमता आणि दीर्घकालीन गुंतवणूक आवश्यक आहे. जपान या सर्व बाबतीत भारताचा विश्वासार्ह भागीदार ठरू शकतो. विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स, हरित ऊर्जा, बॅटरी तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन उद्योग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांच्या सहकार्यामुळे भारताला मोठा लाभ होऊ शकतो. जपानलाही या भागीदारीतून मोठा फायदा होणार आहे. भारत जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. जपानी कंपन्यांसाठी भारत ही केवळ मोठी बाजारपेठ नाही, तर भविष्यातील उत्पादन आणि निर्यातीचे केंद्रही ठरू शकतो. चीनवरील औद्योगिक अवलंबित्व कमी करण्याच्या जपानच्या धोरणाला भारत महत्त्वपूर्ण आधार देऊ शकतो. भारताच्या परराष्ट्र धोरणातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे 'रणनीतिक स्वायत्तता.' भारत कोणत्याही एका महासत्तेवर अवलंबून न राहता अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, जपान, युरोपीय संघ आणि पश्चिम आशियातील देशांशी स्वतंत्र संबंध मजबूत करत आहे.

असे असले तरी कोणत्याही शिखर परिषदेनंतर खरा प्रश्न करारांच्या अंमलबजावणीचा असतो. अनेकदा मोठमोठ्या घोषणा होतात; मात्र त्या प्रत्यक्षात येण्यास विलंब होतो. गुंतवणूक प्रत्यक्ष उद्योगांमध्ये उतरेल, तेव्हाच भारत-जपान भागीदारीचे खरे यश दिसेल. भारत-जपान भागीदारीचा परिणाम केवळ द्विपक्षीय संबंधांपुरता मर्यादित राहणार नाही. या सहकार्यामुळे संपूर्ण हिंद-प्रशांत प्रदेशातील सामरिक संतुलन मजबूत होईल. लहान आशियाई देशांनाही यामुळे विश्वासार्ह पर्याय उपलब्ध होईल. लोकशाही मूल्ये, नियमाधारित व्यवस्था, सुरक्षित समुद्री व्यापार आणि शाश्वत आर्थिक विकास या चार स्तंभांवर आधारित नवी प्रादेशिक रचना उभारण्याची क्षमता या भागीदारीमध्ये आहे. आज जग नव्या शक्तिसंतुलनाकडे वाटचाल करत आहे. अशा वेळी भारत आणि जपान यांची वाढती जवळीक ही कोणत्याही देशाविरोधातील आघाडी नसून स्थिर, सुरक्षित आणि समृद्ध हिंद-प्रशांत घडवण्याचा दूरदृष्टीचा प्रयत्न आहे. आगामी दशकात ही भागीदारी आशियाच्या नव्या सामरिक व्यवस्थेचा एक प्रमुख आधारस्तंभ ठरली, तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण राहणार नाही.

जागतिक राजकारणात काही घटना तत्काळ मथळे बनत नाहीत; परंतु पुढील अनेक दशकांच्या भू-राजकीय समीकरणांची दिशा ठरवतात. भारत आणि जपान यांच्यात नुकत्याच झालेल्या १६ व्या वार्षिक शिखर परिषदेकडे अशाच दृष्टीने पाहण्याची गरज आहे. ही परिषद केवळ दोन देशांमधील द्विपक्षीय चर्चेपुरती मर्यादित नसून बदलत्या जागतिक व्यवस्थेत हिंद-प्रशांत प्रदेशातील सामरिक, आर्थिक आणि तांत्रिक सहकार्याची नवी चौकट तयार करणारी ठरू शकते. आज जग एका संक्रमणाच्या टप्प्यावर उभे आहे. अमेरिका आपल्या परराष्ट्र धोरणाचा नव्याने विचार करत आहे, चीन आशिया आणि हिंद-प्रशांतमध्ये आर्थिक आणि लष्करी प्रभाव झपाट्याने वाढवत आहे, तर युरोपही भारताशी संबंध दृढ करण्याच्या प्रयत्नात आहे. अशा परिस्थितीत भारत आणि जपान या दोन लोकशाही राष्ट्रांनी अधिक जवळ येण्याचा निर्णय हा केवळ योगायोग नसून काळाची गरज आहे. या शिखर परिषदेत संरक्षण सहकार्याला विशेष महत्त्व देण्यात आले. हिंद महासागरातील संयुक्त नौदल सराव, सागरी सुरक्षेतील समन्वय, युद्धनौकांच्या देखभालीतील सहकार्य तसेच प्रगत संरक्षण तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाबाबत दोन्ही देशांनी सहमती दर्शवली. यावरून भारत आणि जपान यांचे संबंध केवळ राजनैतिक पातळीवर न राहता दीर्घकालीन सामरिक भागीदारीमध्ये रूपांतरित होत असल्याचे स्पष्ट होते. हिंद-प्रशांत प्रदेश आज जागतिक व्यापाराचा केंद्रबिंदू बनला आहे. जगातील मोठ्या प्रमाणावरील ऊर्जा आणि मालवाहतूक या समुद्री मार्गांवरूनच होते. या मार्गांची सुरक्षितता केवळ भारत किंवा जपानसाठी नव्हे, तर संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची आहे. त्यामुळे या प्रदेशात मुक्त, नियमाधारित आणि सुरक्षित समुद्री व्यवस्था निर्माण करण्यासाठी दोन्ही देशांचे सहकार्य निर्णायक ठरणार आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# गोंदण आणि टॅट्यूचे दुष्परिणाम

शरीराच्या त्वचेवर कोरलेले गोंदण हा केवळ शरीरावरील अलंकार नसून मानवी संस्कृतीचा, सामाजिक रचनेचा, धार्मिक विश्वासाचा जिवंत दस्तऐवज आहे. मानववंशशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर गोंदण ही एक शारीरिक भाषा आहे. माणूस बोलण्याआधी चिन्हे वापरत होता त्यापैकी एक म्हणजे शरीरावर कायमस्वरूपी कोरलेले नक्षीकाम. भारतात सिंधू संस्कृतीतील मूर्तींवर, प्राचीन शिल्पांवर लोकपरंपरांमध्ये शरीरालंकरणाचे अनेक पुरावे आढळतात. जरी टॅट्यूचे थेट पुरावे मर्यादित असले, तरी लोकसंस्कृतीत गोंदणाला हजारो वर्षांची परंपरा लाभली आहे. शरीरावरील प्रत्येक चिन्ह काही ना काही संदेश देत असे. उदाहरणार्थ व्यक्ती कोणत्या जमातीची आहे. तिचे वैवाहिक स्थान काय आहे वगैरे. भारतातील गोंदण परंपरा सर्वाधिक आदिवासी समाजात आढळते. गोंड समाजामध्ये गोंदण हे सौंदर्य, धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक होते. स्त्रिया हात, पाय, मान, कपाळावर विशिष्ट भूमितीय नक्षी गोंदवत. बंजारा महिलांच्या गोंदणात मोर, फुले, वेली, सूर्य, चंद्र आणि धार्मिक प्रतीकांचा वापर होत असे. महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशातील भील समाजात गोंदणाला संरक्षणात्मक धार्मिक महत्त्व होते. काही चिन्हे वाईट शक्तींपासून रक्षण करतात, अशी श्रद्धा होती. महाराष्ट्रातील गोंड, कोरकू, धनगर, कोळी, ठाकूर, बंजारा आणि इतर समाजांमध्ये गोंदणाला विशेष स्थान होते. जत्रा, यात्रा धार्मिक उत्सवांमध्ये गोंदण करणाऱ्या स्त्रिया गावोगावी फिरत असत. राम, विठ्ठल, ओम, त्रिशूळ, स्वस्तिक, देवीची पावले अशी चिन्हे हातावर किंवा दंडावर गोंदवली जात. अनेक भागांत मुलीच्या विवाहापूर्वी गोंदण करणे ही सामाजिक प्रथा मानली जात असे. पंढरपूर, जेजुरी, माहूर, तुळजापूर, शेगाव, अंबाबाई, खंडोबा, संतांच्या यात्रांमध्ये गोंदण करणारे कारागीर मोठ्या संख्येने येतात. आधुनिकीकरणामुळे बदललेली परंपरा गेल्या चार दशकांत गोंदण परंपरेत मोठा बदल झाला आहे. शहरीकरण, आधुनिक फॅशन वाढल्याने पारंपरिक गोंदण कमी झाले. त्याची जागा आधुनिक टॅट्यूंनी घेतली. धार्मिक प्रतीकांच्या जागी इंग्रजी अक्षरे, पोर्ट्रेट, आधुनिक कलात्मक डिझाईन रंगीत टॅट्यू लोकप्रिय झाले. आजच्या तरुणाईमध्ये टॅट्यू म्हणजे केवळ फॅशन नसून ती व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली आहे. हात, मान, छाती, पाठ, मनगट, पाय अशा शरीराच्या विविध भागांवर कायमस्वरूपी किंवा तात्पुरते टॅट्यू काढण्याची स्पर्धाच दिसून येते. सोशल मीडियावर सेलिब्रिटी, खेळाडूंच्या प्रभावामुळे टॅट्यूचे आकर्षण आणखी वाढले आहे.

टॅट्यू शाईतील रासायनिक विज्ञान गुंतागुंतीचे आहे. टॅट्यूची शाई म्हणजे साधा रंग नसतो. ती रंगद्रव्ये रासायनिक मिश्रणांनी तयार केलेली असते. त्वचेच्या थरात ही शाई आयुष्यभर राहते, त्यामुळे तिच्या गुणवत्तेला, रासायनिक रचनेला विशेष महत्त्व आहे. आधुनिक टॅट्यू उद्योगाला १९७० नंतर पाश्चिमात्य देशांमध्ये टॅट्यूला नवीन ओळख मिळाली. संगीत, चित्रपट, खेळ आणि फॅशन उद्योगातील प्रसिद्ध व्यक्तींनी टॅट्यू स्वीकारल्यानंतर त्याची लोकप्रियता वाढत गेली. भारतामध्ये १९९० नंतर इंटरनेट व सोशल मीडियाच्या युगात टॅट्यू स्टुडिओंची संख्या झपाट्याने वाढली. आज महानगरांपासून शहरांपर्यंत आधुनिक टॅट्यू स्टुडिओ उपलब्ध आहेत. टॅट्यू उद्योगाची आर्थिक उलाढाल कोटी रुपयांचा जागतिक उद्योग बनला आहे. टॅट्यू मशीन, सुया, रंग, त्वचा-देखभाल उत्पादने, प्रशिक्षण संस्था, डिझाईन सॉफ्टवेअर, लेझर रिमूव्हल केंद्रे, ऑनलाईन डिझाईन प्लॅटफॉर्म यामुळे संपूर्ण उद्योग साखळी निर्माण झाली आहे. भारतातही प्रशिक्षित टॅट्यू कलाकार, डिजिटल डिझाईन, आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टुडिओ विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. नवीन संशोधनानुसार शरीरावर गोंदवून घेतल्याने आरोग्य तज्ज्ञांच्या मते टॅट्यू काढण्याचा विचार करणाऱ्या प्रत्येकाला स्वच्छता आणि शाईमधील घटकांविषयी टॅट्यू काढणाऱ्यांशी बोलण्याचा सल्ला देतात, ज्यांची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत आहे. त्यांनी टॅट्यू काढण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अशी शिफारस तज्ज्ञ करतात. सध्या माणसांमध्ये टॅट्यू आणि कर्करोग यांचा संबंध जोडणारा कोणताही निश्चित पुरावा नसला, तरी काही अभ्यासकांनी टॅट्यू काढलेल्या व्यक्तीमध्ये त्वचेच्या कर्करोगाचा धोका जास्त असल्याचे दाखविले आहे. याचबरोबर बेकायदेशीर, अप्रमाणित स्वस्त दरात टॅट्यू करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे, ही चिंतेची बाब आहे. शास्त्रज्ञांनी टॅट्यू मानवी शरीरावर कायमस्वरूपी गंभीर परिणाम करतात, असा इशारा दिला आहे. ■

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# कामगार आंदोलनास कारण की...

**दत्तात्रेय आंबुलकर**

औद्योगिक क्षेत्रात कामगारांचे संप-आंदोलन हे प्रकार नवे नाहीत. कामगारांच्या जीवनाशी निगडित व जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर तोडगा निघावा, यासाठी कामगारांना छोट्या-मोठ्या स्वरूपात आंदोलनाचा मार्ग चोखाळावा लागणे, हे प्रकार सर्वमान्य स्वरूपाचे ठरले आहेत. मात्र, विशेषतः गेल्या दोन महिन्यांत देशाच्या विशिष्ट औद्योगिक क्षेत्रात कामगार आंदोलनाचा जो व्यापक भडका उडला, तो कामगार-व्यवस्थापन व शासन-प्रशासन या सर्वच संबंधित घटकांना या विषयाकडे गांभीर्याने पाहण्यासाठी बाध्य करणारा ठरला. या निवडक; पण दाहक स्वरूपातील आंदोलनाच्या भडक्याची पृष्ठभूमी समजून घ्यायला हवी. या हिंसक व नुकसानकारी आंदोलनांची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे, त्यांचे नेतृत्व व या प्रकरणी घेतलेला पुढाकार हा परंपरागत कामगार संघटनांच्या जोडीलाच स्थानिक व औद्योगिक क्षेत्रातील नव्या चळवळ्या नवनेतृत्वाचा होता. त्यांना प्रचलित कामगार आंदोलन पद्धतीची पृष्ठभूमी नव्हती. त्यामुळे या निवडक व नियोजनपूर्ण पद्धतीने केलेल्या मर्यादित आंदोलनांची परिणती स्वाभाविकपणे भडक्यात झाली. एका ठिकाणी तर कंपनीने नोकरीवरून कमी केल्याने बेकार झालेल्या, बेकारीपोटी आलेल्या उद्वेगातून या कामगाराने कंपनीच्या तयार मालाच्या गोडावूनलाच आग लावून आपण आणि कंपनी या उभयतांचे भविष्य बेचिराख करण्याचा आक्रस्ताळेपणाचा प्रकार याचदरम्यान झाल्याची बातमी गाजली. यासंदर्भात आणि विशेषतः स्वातंत्र्यपूर्व काळातील म्हणजेच, १९२६ च्या कामगार संघटनाविषयक कायद्याची यंदा शताब्दी होत असताना, कामगार संघटना व आंदोलने या महत्त्वाच्या विषयाकडे मुळातून व गांभीर्याने पाहणे महत्त्वाचे ठरते.

यासंदर्भात कामगार संघटना म्हणून अशा भूमिका मांडताना 'मजदूर किसान शक्ती संघटने'चे सहसंस्थापक निखिल डे यांनी नमूद केल्यानुसार, कुठल्याही कामगार अथवा कर्मचाऱ्याला आपल्या कामाच्या ठिकाणी तोडफोड अथवा जाळपोळ करायची नसते. आपले जगणे व उदरनिर्वाह यावरच अवलंबून आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव असते. मात्र, त्यांना ते करीत असताना कामकाजात आवश्यक प्रगती व वाटचाल न दिसून आल्यास मात्र त्यांच्या संयमाचा बांध फुटू शकतो.



अशाच प्रकारे कामगारांच्या आंदोलक प्रकारांची पुनरावृत्ती नोएडा औद्योगिक क्षेत्रातील हिंसक आंदोलनापूर्वी बरौनी-बिहार, सुरत-गुजरात व मनेसर आणि पानिपत-हरयाणा या देशातील प्रमुख व निवडक औद्योगिक वसाहतींमध्ये झाली होती, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. या घटनाक्रमामागील वैयक्तिक व महत्त्वाचा आर्थिक पैलू म्हणजे आखाती युद्धामुळे घरगुती गॅसपासून इतर सर्वच उपयोगी वस्तूंची अचानक झालेली भाववाढ व यापैकी काही वस्तूंची टंचाई याबाबी कामगारांच्या आंदोलनाची तीव्रता वाढविण्यास अधिक पूरक ठरण्याचे सांगण्यात येते. यामध्ये काही प्रमाणात तथ्यांश असला, तरी कामगारांचे अशा प्रकारे विध्वंसक आंदोलन करण्यामागे इतरही काही महत्त्वाची कारणे आहेत. कामगारांच्या व्यक्तिगत स्तरावर सांगायचे म्हणजे, संघटित क्षेत्रातील वा मोठ्या कंपन्या सोडल्यास मध्यम आकारातील कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची अवस्था चिंतनीय आहे. त्यातही कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्यांची अवस्था बहुतांशपणे अधिकच चिंतनीय असते. यामध्ये जुजबी वा प्रसंगी किमान वेतन कायद्यापेक्षाही कमी व बरेचदा अनियमितपणे मिळणारे वेतन, कामाचे अतिरिक्त तास आणि त्यासाठी घ्यावा लागणारा ताण, कामाच्या ठिकाणी स्वच्छता व मूलभूत आरोग्यासाठी आवश्यक मूलभूत व कायदेशीर सोयींची पूर्तता नसणे, या बाबींचा सामना अधिकांश उद्योग व औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना करावा लागतो. यासंदर्भात काही महिन्यांपूर्वी म्हणजे फेब्रुवारी २०२६ मध्ये 'टीट वॉच' ही सामाजिकसंदर्भात जागृती करणारी संस्था व मुंबईच्या 'टाटा सामाजिक संशोधन संस्था' यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आलेल्या तयार कपडे उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या ११५ कामगारांच्या मुलाखतींवर आधारित अभ्यास-अहवाल तयार करण्यात आला. या अभ्यासात नमूद केल्यानुसार, या क्षेत्रात काम करणाऱ्या बहुसंख्य म्हणजेच, सुमारे ७८ टक्के कामगारांना कामाच्या वेळी नैसर्गिक विधीसाठी पूर्वपरवानगी घ्यावी लागते व प्रत्येक वेळी ती मिळतेच असे नाही. या कामगारांपैकी लक्षणीय म्हणजेच, सुमारे ६८ टक्के कामगारांना अत्यधिक गरम-उष्ण वातावरण आणि परिसरात काम करावे लागते. याचाच परिणाम म्हणून, या आणि अशा प्रकारची कामे करणाऱ्या कामगारांना मोठ्या प्रमाणात आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागतो व प्रसंगी बिनपगारी रजा घ्यावी लागते. औद्योगिक कामगारांच्या संदर्भात त्यांना मिळणारे वेतन हा त्यांच्या दृष्टीने सर्वात मोठा व जिव्हाळ्याचा मुद्दा ठरला आहे. याला अर्थातच, दीर्घकाळ चाललेल्या आखाती युद्धाची पृष्ठभूमी लाभली आहे. या पृष्ठभूमीवर हरयाणा सरकारने राज्याच्या औद्योगिक कामगारांच्या मूलभूत वेतनात वाढीव स्वरूपाची अशी ३५ टक्के वेतनवाढ जाहीर करून अमलात आणली आहे. याचाच परिणाम हरयाणा आणि परिसरातील राज्यांमधील औद्योगिक कामगारांची वेतन तफावत अपरिहार्यपणे वाढण्यात झाली आहे. याचाच परिणाम ज्वलंत स्वरूपात लगतच्या उत्तर प्रदेशातील नोएडा, मनेसर यांसारख्या मोठ्या औद्योगिक परिसरात काम करणाऱ्या कामगारांवर अपरिहार्यपणे झालेला पाहायला मिळाला. राजधानी दिल्लीपासून जवळच असणाऱ्या राजस्थानमध्ये तर तेथील औद्योगिक कामगारांच्या मूलभूत वेतनात गेली १० वर्षे वाढ झालेली नसल्याची वस्तुस्थिती यानिमित्ताने स्पष्ट झाली आहे.

कामगारांना अतिरिक्त तास काम करून पण कायदेशीरपणे वेतन न मिळण्याच्या तक्रारी अधिकांश ठिकाणी आहेत. विषयतज्ज्ञांच्या मते, सद्यस्थितीत देशांतर्गत औद्योगिक कामगारांपैकी अधिकांश म्हणजेच, सुमारे ५१ टक्के कामगार आठवडी निर्धारित म्हणजेच, ४९ तासांपेक्षा अधिक तास काम करीत आहेत. मात्र, याची परिणती कामगारांचे काम आणि उत्पादकता यांच्या वाढीत होत नाही. याचीच परिणती कामगार संघटना आणि त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव बाजूला राहून कामगार हिंसक आणि भडकावू आंदोलनांना बळी पडू शकतात, हीच बाब यावेळी भडकलेल्या कामगार आंदोलनांनी स्पष्ट झाली आहे. यातून कंपनी-व्यवस्थापनांनी पण धडा घेणे आवश्यक असून, नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीने हे उद्देश साध्य होतील, अशी अपेक्षा आहे. ■

९८२२८४७८८६

(लेखक एचआर व्यवस्थापक आणि सल्लागार आहेत.)

### मनपा पुन्हा झोपी जाईल काय ?

सध्या ठेकेदारांनी किंवा खाजगी बांधकाम व्यावसायिकांनी रस्त्यावर टाकून ठेवलेल्या बांधकाम साहित्यामुळे होत असलेल्या त्रासाचा 'तरुण भारत'ने सुरू केलेला उपक्रम निश्चितच अभिनंदनीय आणि स्तुत्य आहे. पहिल्याच दिवशी बातम्या आणि फोटो प्रसिद्ध झाल्यानंतर मनपाने केलेल्या कारवाईच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. त्यावरून या उपक्रमाचा परिणाम दिसला. महानगरपालिकेने या कारवाईचा धडका सुरू करून ७० हजार रुपये कंत्राटदारांच्या खिशातून काढले! मनपाने दंड वसूल केला म्हणजे सामान्य नागरिकांच्या समस्या सुटल्या, असे म्हणता येईल का? जितके फोटो वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले, त्या ठिकाणचे ते बांधकाम साहित्य त्या बांधकाम कंत्राटदाराने तिथून उचलले आहे का? किंवा अन्य ठिकाणचे उचलले जात असल्याचे दिसत आहे काय, हा खरा प्रश्न आहे. मनपाच्या सर्जिकल स्ट्राईकमुळे रस्ता, फूटपाथ मोकळा झाला आहे का? नियमावर बोट ठेवून केवळ दंड वसूल करणे हे मनपाचे काम आणि हाच मनपाच्या उत्पन्नाचा स्रोत नक्कीच नसावा.

माझ्या घरासमोर सध्या घर पाडण्याचे काम सुरू आहे. काम व्यवस्थित सुरू आहे. त्याच्याबद्दल आम्हाला सध्या काहीही तक्रार नाही. पण कालच मनपा कर्मचारी आजूबाजूच्या शेजाऱ्यांकडे चौकशी करीत आले होते. तुम्ही तक्रार का नाही केली, असे म्हणत होते. म्हणजे नागरिकांनी तक्रार करायची आणि त्या घरमालकाला त्रास देण्यासाठी यांच्या हाती आयते कोलीत द्यायचे! असे कर्मचारी हीच खरी समस्या आहे. चुकीच्या गोष्टींसाठी दंड केला म्हणजे न्याय झाला असे होत नाही. दंड भरून ते रस्त्यावर बांधकाम साहित्य ठेवणारे कंत्राटदार दंड भरल्याचा कागद फडकवत शिरजोर होणार असतील आणि सर्रास रस्त्यावर बांधकाम साहित्य ठेवणार असतील तर काय उपयोग? रस्त्यावरचे बांधकाम साहित्य हलवले गेले तरच मनपाने जनसामान्यांना दिलासा देणारे काम केले असे समजता येईल. तसे झाले नाही तर मनपा प्रशासन नेहमीप्रमाणे पुन्हा झोपले असे होईल. तरुण भारतने हा जो प्रयत्न केला त्याबद्दल त्यांचे पुनश्च एकदा अभिनंदन!

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**/नागपूर। ९८२२५६९६४८

## वाचक पत्रे

### यास्तिका भाटियाचे पहिले शतक

सध्या इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या महिला क्रिकेट कसोटीमध्ये भारताची यष्टिरक्षक फलंदाज यास्तिका भाटिया हिने रविवारी लॉर्ड्स मैदानावर झळकावलेले शतक अप्रतिम होते. मूळ बडोद्याच्या असलेल्या यास्तिकाने केलेल्या ११३ धावात संयम आणि आक्रमकता यांचा सुरेख संगम दिसला. दोन क्षेत्ररक्षकांमधून जाणारे चौकार आणि प्रसंगी प्रतिस्पर्धी गोलंदाजाच्या डोक्यावरून मारलेले फटके रसिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. भारताची अनुभवी डावखुरी स्मृती मानधनाच्या फलंदाजीतील नजाकत आणि अचूकता जरी भाटियाच्या फलंदाजीत पुरेपूर नसली, तरी आपल्या चौथ्याच कसोटीत तिने दाखविलेली परिपक्वता आणि एकाग्रता निःसंशय प्रशंसनीय आहे.

२०२३ नंतर कसोटी संघात पुन्हा संधी मिळालेल्या भाटियाने चक्क इंग्रजांच्या भूमीत तेही लॉर्ड्स मैदानावर शतक झळकवले आणि तिचे नाव सन्माननीय क्रिकेटर्सच्या यादीत 'लॉर्ड्स'च्या भव्य फलकावर कोरले गेले. इंग्लंडमध्ये सध्या सुरू असलेल्या भारतीय पुरुष क्रिकेट संघाच्या लाजिरवाण्या कामगिरीच्या पृष्ठभूमीवर महिला क्रिकेट संघाचा लॉर्ड्स मैदानावरील खेळ भारतीयांना अभिमानास्पद असा आहे. इंग्रजांनी इंग्लंडमध्ये सुरू केलेल्या या खेळामध्ये भारताच्या क्रिकेटर्सनी आपले विशेष मानाचे स्थान निर्माण केले आहे आणि त्याचा एक भारतीय सगळ्यांनाच अभिमान आहे. लॉर्ड्सवरील या शतकाबद्दल यास्तिका हरीश भाटिया हिचे मनापासून अभिनंदन!

**प्रा. विवेक विश्वरूपे**/८८०५१५७४७५

■■■

### वारीची अभंग निष्ठा

आळंदी आणि देहू येथून निघणारी संत ज्ञानेश्वर माउली आणि जगद्गुरु तुकाराम महाराज यांची पालखी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाचा महाप्राण आहे. जात, पात, वय आणि श्रीमंती-गरिबीच्या भिंती गळून पडलेला हा एक असा अनुपम सोहळा आहे, जिथे मानवी मूल्यांचे सर्वात सुंदर दर्शन घडते. वारी म्हणजे केवळ पंढरपूरच्या दिशेने पडणारी पावले नव्हेत, तर तो शतकानुशके चालत आलेला समतेचा, बंधुभावाचा आणि असीम श्रद्धेचा अखंड प्रवास आहे. दरवर्षी लाखो वारकरी या प्रवासात स्वतःला विसरून विठ्ठलनामात तल्लीन होतात. यंदा मात्र या वारीच्या वाटेवर निसर्गाने एक मोठे आव्हान उभे केले आहे. पाण्याचा वेढा पडलेला असतानाही कुठेही गोंधळ झाला नाही. वारकरी एकमेकांचा हात धरून, परस्परांना धीर देत सुरक्षित स्थळी सरकत राहिले. अन्नछत्रांमध्ये भोजन वाटप असो वा औषधोपचार, प्रत्येकाने अत्यंत शांततेत आणि सेवाभावाने परिस्थिती हाताळली. हाच तो वारीचा खरा संस्कार आहे, जो संकटात माणसाला माणूस म्हणून जगायला आणि लढायला शिकवतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने आपण कितीही प्रगती केली, तरी निसर्गाच्या एका झटक्यासमोर आपण किती लहान आहोत, याची नम्र जाणीव या घटनेने करून दिली आहे. प्रशासनाने अशा मोठ्या सोहळ्यांसाठी कायमस्वरूपी सुविधांची निर्मिती करावी. ■

**वीरेंद्र सोनवणे** /पुणे।८८८८२४४८८३

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### रोटरी क्लबचा संयुक्त पदग्रहण सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ तसेच रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचा सन २०२६-२७ या वर्षासाठीचा संयुक्त पदग्रहण सोहळा आयएमए हॉल येथे अत्यंत दिमाखदार, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी असावरी सराफ यांनी रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षपदाची, तर डॉ. विष्णू रंगरेज यांनी सचिवपदाची सूत्रे स्वीकारली. तसेच महेश सुधाकर यांनी रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे चेअरमन म्हणून, अनास्तासिया मार्टिनकोव्हा यांनी सचिव म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटे. जयेशभाई पटेल हे प्रमुख पाहुणे, डीएलए डॉ. दीपक पोफळे हे प्रमुख अतिथी तसेच असिस्टंट गव्हर्नर महेश साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी रोटरीच्या वार्षिक संकल्पनेनुसार समाजहिताची प्रभावी सेवा करण्याचे आवाहन केले. नवनिर्वाचित अध्यक्षा असावरी सराफ यांनी आगामी वर्षासाठीचे सेवा प्रकल्प, सदस्यवृद्धी, महिला व युवक सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन आणि समाजोपयोगी उपक्रमांचे व्हिजन सादर केले. तर सॅटेलाईट क्लबचे चेअरमन महेश सुधाकर यांनी सॅटेलाईट क्लबच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण व परिणामकारक सेवा प्रकल्प राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नमिता वडापूरकर यांनी केले. कार्यक्रम सादरीकरणासाठी बसवराज रोड ट्रॅक्टर यांनी सहकार्य केले.



### संगीत परीक्षेत एनटीपीसीच्या नोट्रे डेम अकॅडमीच्या ९ विद्यार्थ्यांचे यश

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

येथील एनटीपीसी नोट्रे डेम अकॅडमी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी हार्मोनियम व गायन या संगीत विषयाच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. हे यश विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, नियमित रियाज, पालकांचे मोलाचे सहकार्य आणि संगीत शिक्षक सिद्धाराम विभूते यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाचे फलित आहे. मुख्याध्यापिका सिस्टर रंजना जोसेफ म्हणाल्या, ''विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच विद्यालयाचा मुख्य उद्देश आहे. शैक्षणिक प्रगतीसोबतच संगीत, कला आणि संस्कार क्षेत्रातील असे यश विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक समृद्ध आणि परिपूर्ण करते. **विशेष प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थी याप्रमाणे :** मनोग्रा श्री जंगा,शिवांश कुमार सिंह, आवानी नांबियार, धीरज व्ही. आर., अदिती नांबियार,चरण पशुपती, आर. अंजन अभिराम, जंगा चार्विक नंदन, नीरज व्ही. आर.

### दिगंबर जैन पंचम समाजाचा 'सप्तपदी' वधू-वर पालक परिचय मेळावा २६ जुलैला

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

येथील दिगंबर जैन पंचम समाज विकास मंडळ यांच्या वतीने 'सप्तपदी सकल दिगंबर जैन वधू-वर पालक परिचय मेळावा' रविवार, २६ जुलै रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत नेहरू नगर, विजापूर रोड येथील सुंदर मल्टिपर्पज हॉलमध्ये आयोजित केला आहे, अशी माहिती अध्यक्ष अनिल जमगे यांनी पत्रकार परिषदेत दिली. मेळाव्यासाठी नोंदणी शुल्क ८०० रुपये असून प्रत्यक्ष उपस्थित राहणाऱ्या वधू उमेदवारांना हे शुल्क परत करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. उमेदवार नोंदणी फॉर्म स्वीकारण्याची अंतिम तारीख बुधवार, १५ जुलै आहे. उमेदवार नोंदणी फॉर्मचा पीडीएफ हवा असल्यास ९२२६३२८२१९ या क्रमांकावर व्हॉट्सॲपद्वारे मागवता येईल. भरलेला अर्ज व नोंदणी शुल्क संस्थेकडे वेळेत जमा करावे. फॉर्म व शुल्क स्वीकारण्यासाठी अरविंद जमगे (सन्मती नगर, विजापूर रोड) तसेच सुमेरचंद जमालपुरे (जिनेंद्र मेडिकल, भवानी पेठ) यांच्याकडे व्यवस्था करण्यात आली आहे. समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींसाठीयोग्य स्थळांचा शोध सुलभ व्हावा, पालकांना एकाच छताखाली संवादाची संधी मिळावी आणि समाजातील वैवाहिक संबंध अधिक दृढ व्हावेत, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. समाजबांधवांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष देवेंद्र शटगार, कोषाध्यक्ष अनिल माणिकशेटे, सचिव देशभूषण व्हसाळे, सहसचिव अनूप कस्तुरे, संयोजक डॉ. अजित माणिकशेटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

**प्रत्यक्ष उपस्थित राहणाऱ्या वधू उमेदवारांना नोंदणी शुल्क परत**



# यशोधरा प्रशालेस विजेतेपद



### जिल्हा जीत कुने डो मार्शल आर्ट स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै -**

जिल्हा जीत कुने डो मार्शल आर्ट स्पर्धेत किशोर चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या यशोधरा प्रशालेने विजेतेपद पटकाविले. भास्कर देडे यांच्या संत तुकडोजी महाराज आश्रम प्रशालेने द्वितीय तर अभिजीत गायकवाड यांच्या टीम जुळे सोलापूर संघाने तृतीय स्थान संपादिले.

असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूर यांच्या वतीने ही स्पर्धा पोद्दार शाळेजवळील चैत्राली हॉल येथे झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन सम्यक क्रांती मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत गायकवाड व ग्रँडमास्टर युवराज गायकवाड यांच्या हस्ते झाले. स्पर्धेतील विजेत्यांना ग्रॉंडमास्टर युवराज गायकवाड, टेक्निकल डायरेक्टर मास्टर आनंद जाधव, प्रल्हाद जाधव, नितीन गवळी व संतोष कांबळे यांच्या उपस्थितीत पारितोषिके देण्यात आली. यावेळी किक बॉक्सिग असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष शिवराम भोसले, टेक्निकल डायरेक्टर मास्टर किशोर चंदनशिवे, भास्कर देडे उपस्थित होते. यावेळी ग्रँडमास्टर युवराज गायकवाड यांचा वाढदिवस उपस्थित मान्यवर, प्रशिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मास्टर अजिंक्य गायकवाड, मास्टर सम्राट गायकवाड, सुनील बरगोदीया, संदीप गायकवाड, नागेश कांबळे, सुमित पाटील, विश्वजीत गायकवाड, देवदत्त सावंत आदींनी परिश्रम घेतले.

# क्रीडा व शारीरिक शिक्षण क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

### सुशीलकुमार शिंदे कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै -**

आजच्या आधुनिक युगात क्रीडा, फिटनेस आणि आरोग्य क्षेत्राला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर क्रीडा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नेहरूनगर येथील 'श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन । स्पोर्ट्स' मध्ये प्रवेशाची उत्तम संधी उपलब्ध आहे. महाविद्यालयात बारावीनंतर तीन वर्षांचा बी.पी.ई.एस. हा पदवी अभ्यासक्रम उपलब्ध असून, याद्वारे स्पर्धा परीक्षांसह 'एनआयएस' कोच डिप्लोमाचे मार्ग खुले होतात. यानंतर बी.पी.एड. हा व्यावसायिक शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करून शाळा व महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण शिक्षक म्हणून नोकरी मिळवता येते.तसेच उच्च शिक्षणासाठी दोन वर्षांचा एम.पी.ई.एस. हा पदव्युत्तर अभ्यासक्रमही उपलब्ध आहे.



प्रशिक्षित क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक व क्रीडा प्रशासक बनण्यासाठी हा एक उत्कृष्ट पर्याय आहे. अधिक माहिती व प्रवेशासाठी ९६२३०००७६८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मागास समाज सेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष चव्हाण यांनी केले आहे.

# चेतक स्केटिंग स्पर्धा; विजेत्यांना 'गोल्डन स्मृतिचिन्ह' देऊन गौरविले



**सोलापूर, दि. १३ जुलै-**

येथील चेतक स्केटिंग क्लबच्या १०० दिवसांच्या ८४ व्या शिबिराच्या सांगतेनिमित्त स्केटिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ नुकताच तिरंगा बंगला येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धा ६ वर्षे, ९ वर्षे, १२ वर्षे, १५ वर्षांखालील आणि खुला गट अशा वेगवेगळ्या ६ गटांमध्ये मुले व मुलींसाठी आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना नगर रचना विभागाचे इंजिनियर शब अरविंद जगताप व प्रशिक्षक दिव्यकांत गांधी यांच्या हस्ते 'गोल्डन स्मृतिचिन्ह' देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी सद्भावना संस्थेच्या रोशन शेख, सोना गांधी, श्रुती गांधी यांच्यासह बहुसंख्येने मुलांचे पालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# कंदलगावच्या राऊंड टेबल जीवनज्योत प्रशालेत एम.के. फाउंडेशनतर्फे वह्या वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथील राऊंड टेबल जीवनज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील विद्यार्थ्यांना एम.के.फाउंडेशन व सागर सिमेंट लिमिटेड तर्फे ''स्कूल चले हम'' या उपक्रमांतर्गत शैक्षणिक साहित्य वह्या वाटप करण्यात आले.



संस्थापक शिक्षणमहर्षी स्वर्गीय दी. शि. कमळे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे सहसचिव प्राध्यापक सुबोध कोळी सर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक सुबोध कोळी यांनी ''मानवतेचे कर्म, सेवा हेच धर्म'' हे ब्रीद घेऊन सागर सिमेंट लिमिटेड व एम.के.फौंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे यांच्या उपक्रमाचे व दातृत्वाचे अभिनंदन केले. खऱ्या अर्थाने आपण समाजाचा एक भाग आहोत व अशी सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची आज समाजाला गरज असल्याचे विशद केले तसेच सदर उपक्रमासाठी प्रशालेतील सहशिक्षक आवटी सर यांच्या विशेष प्रयत्नांचेही कौतुक केले. याप्रसंगी प्राचार्य आर. बी. यलगोंडे, पर्यवेक्षक एस.बी. जमादार आदी उपस्थित होते.


### जाहीर प्रसिद्धीकरण

ज्या अर्थी श्री अंकुश रामचंद्र आगलावे-पाटील व इतर यांनी मौजे पोखरापूर, ता. मोहोळ येथील गट नं. १७५ हा सातबारा उतारा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ प्रमाणे दुरुस्तीसाठी मा. तहसीलदार साहेब मोहोळ यांचेकडे अर्ज केलेला आहे. सदर दुरुस्तीने श्री जगदंबादेवी वहिवाटदार हे नाव कमी करण्यासाठी विनंती आहे.

त्याअर्थी मौजे पोखरापूर, ता. मोहोळ येथील गट नं. १७५ च्या संदर्भाने अथवा अर्जदाराच्या अर्जावर कोणाची काही तक्रार हरकत असेल तर हे जाहीर समन्स प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत किंवा दि. ३१/०७/२०२६ रोजी आपली तक्रार किंवा हरकत नोंदवावी. कोणाचीही काही तक्रार आली नसल्यास कोणाची तक्रार नाही असे समजून अर्जाचा निर्णय दिला जाईल.

हे जाहीर समन्स दिले: १०/०७/२०२६

सही/- कनिष्ठ लिपिक मोहोळ (शिक्का) सही/- तहसीलदार मोहोळ

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000040742 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 15/2026-27, Particulars:** Work of annual rate contract for attending on site minor repairs / maintenance works / OLTC overhauling of EHV class power transformers / ICTs at various EHV S/s under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 75,00,000/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs. 75,000/- **Tender cost** in Rs. 500/- + GST, **Sale period:** 12.07.2026 to 27.07.2026 **Last Date of Submission:** 27.07.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 28.07.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Executive Engineer -7447440852 For further details. **Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**
**1) https://srmetender.mahatransco.in.**
**2) https://mahatransco.in**
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/- Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर शहर व परिसरातील लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे प्रतापनगर येथील ९१/१ याचे ०३ हेक्टर ३५ आर यापैकी ०१ हेक्टर १५ आर वर नमूद मिळकत व त्यातील तदंगभुत वस्तुसह ही **१)** निर्मला धर्मण्णा कौलगी, **२)** समुबाई ज्ञानदेव खडाखडे, **३)** सदाशिव ज्ञानदेव खडाखडे, **४)** मल्लिकार्जुन ज्ञानदेव खडाखडे, **५)** रवींद्र ज्ञानदेव खडाखडे, **६)** भागवत ज्ञानदेव खडाखडे, **७)** सविताबाई गुरूनाथ तळवार यांच्या मालकीकब्जे वहिवाटीची आहे. त्यांची नावे फेरफार क्रमांक ८८३ अन्वये लागलेली आहेत. सदर वर नमूद शेतजमीन मालकांनी आमचे अशिलांस सदर शेतजमीन विक्री करण्याचा करार करून इसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर शेतजमीन ही निर्वेध व निजोखमीचे असल्याची खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. सबब या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद प्लॉट जागेवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, या अन्य कोणत्याही स्वरूपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर प्लॉट जागेसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (२०) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावीत. मुदतीत कोणाचेही कसलीही तक्रार न आल्यास सदरची प्लॉट जागा ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे गृहित धरून आमचे अशील पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांवर मुळीच बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीख १३/०७/२०२६

सही/-
ॲड. तुकाराम एस. चिंचोळी
ॲड. संतोष महादेव म्हामणे
मु.पो. वळसंग, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर
मो. ९०२११६६३३२
अशील - प्रविण सुधाकर खरबस

महाराष्ट्र महसूल व वन विभाग
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
संकलन - जन्म-मृत्यू
दूरध्वनी नं. ९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@gmail.com

जा.क्र.२०२६/जन्म-मृत्यू/कावि/९६९/२०२६ दि. ०९/०७/२०२६

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्री. रियाज अहमद काशिम नाईकवाडी** - **अर्जदार**
रा. अक्कलकोट, ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाला**
**नगर परिषद, अक्कलकोट, ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील रियाज अहमद काशिम नाईकवाडी रा. अक्कलकोट ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि. १७/०२/१९८९ रोजी मौजे अक्कलकोट ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतु माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन रियाज अहमद काशिम नाईकवाडी नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२)(३) अन्वये मा. तहसीलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०३/१०/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०९/०७/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

(शिक्का) सही/- **विनायक सुधीर मगर** तहसीलदार, अक्कलकोट

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३१/२०२६ नि.नं.५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात**

१) **राहिबाई दिगंबर काशीद,** वय - ७८ वर्षे, धंदा - वयोवृद्ध, रा. कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **श्री. दशरथ दिगंबर काशीद,** वय - ४७ वर्षे, धंदा - खासगी नोकरी, रा. सुभाष नगर, मिरज, ता. मिरज, जि. सांगली
३) **श्री. प्रभाकर दिगंबर काशीद,** वय - ४५ वर्षे, धंदा - खासगी नोकरी, रा. सदर
— **अर्जदार**

विरुद्ध
**कोणी नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल दिगंबर धर्मा काशीद हे दि. २२/०३/२०२६ रोजी धाराशिव येथे मयत झालेले आहेत. मयत दिगंबर धर्मा काशीद यांचे नावे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा बार्शी येथे बचत खाते क्र. २५०३०६७६००१ असून सदर खात्यावर र.रु. २,५९,८६२/- (अक्षरी दोन लाख एकोणसाठ हजार आठशे बासष्ट रु.) इतकी रक्कम जमा आहे, सदरची रक्कम मिळणेकामी अर्जदार नं. १ ते ३ हे मयत दिगंबर धर्मा काशीद यांचे कायदेशीर वारस आहेत असे जाहीर होऊन मिळणेकामी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमुद अर्जदार नं. १ ते ३ यांचे शिवाय मयत दिगंबर धर्मा काशीद यांचेसी इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. ०७/०८/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. अथवा कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील मयत मयत दिगंबर धर्मा काशीद यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. ता. २५/०६/२०२६

सही/- क. लिपिक (कोर्टाचा शिक्का) सही/- सहा. अधिक्षक सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, बार्शी

### चौकशीची जाहीर नोटीस

**पुनरीक्षण अर्ज क्र.** ७२/२०२५ कलम ७०(अ)
**सार्वजनिक न्यासाचे नाव** : सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, लोटेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर.
**अर्जदार - श्री. अरुण संभाजीराव शेंडे, वगैरे**
रा. मु.पो. मेडशिंगी, ता. सांगोला, जि. सोलापूर.

या नोटीसीद्वारे **१)** श्री. जयंत उमेश डोंगरे, रा. मु.पो. घेरडी, ता. सांगोला, जि. सोलापूर, **२)** दिप्ती दिलीप कुलकर्णी, रा. मु.पो. लोटेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर, **३)** विद्या जयंत डोंगरे, रा. मु.पो. घेरडी, ता. सांगोला, जि. सोलापूर, **४)** सुदेश धनंजय डोंगरे, रा. मु.पो. घेरडी, ता. सांगोला, जि. सोलापूर यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मा.धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग, पुणे हे वर नमूद केलेल्या अर्जा यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ७०(अ) अन्वये चौकशी करणार आहेत. त्याकामी आपणांस वरील पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविली होती, परंतु हे नोटीसींचे पाकीटे ही सदर पत्त्यावर राहत नाही असा शेरा मारुन ती पाकीटे या कार्यालयात परत आली नाहीत. तरी आपणांस संधी देण्याच्या हेतूने मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग, पुणे यांच्या दि. ०३/०७/२०२६ रोजीच्या आदेशानुसार जाहीर नोटीस काढण्यात येत आहे. सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणांस काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशारीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग, पुणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी दिली.

सही/- वरिष्ठ लिपिक (शिक्का) सही/- मा.धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे विभाग, पुणे

### जाहीर नोटीस

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० कलम ४७ अन्वये खालील नमूद न्यासात विश्वस्तांची नेमणूक करणेबाबत**

**अर्ज क्रमांक** : ३६/२०२६.
**न्यासाचे नाव** : अमोगसिध्द देवाचे मंदिर, मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर
**न्यास नोंदणी क्रमांक** : ए-४९५, सोलापूर

१. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४७ अन्वये दाखल अर्ज क. ३६/२०२६ मधील निशाणी क्र.१ वर मा. धर्मादाय सह आयुक्त-२ पुणे यांनी दिनांक ०३/०७/२०२६ रोजी आदेश केलेला आहे. सदर आदेशानुसार संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अमोगसिध्द देवाचे मंदिर, मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर न्यास नोंदणी क्र.ए-४९५, सोलापूर या न्यासात विश्वस्तांची नेमणूक करण्याकरीता अर्जदार बिळेणी ओगसिध्द पुजारी यांनी सदर अर्ज दाखल केला आहे.
२. अमोगसिध्द देवाचे मंदिर, मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर न्यास नोंदणी क्र.ए-४९५, सोलापूर या न्यासाचे व्यवस्थापन पाहणारे कोणीही नाहीत असे अर्जदाराने अर्जातील निशाणी-१ मध्ये म्हटले आहे.
३. सदरचे प्रकरणी अर्जदारांनी अर्जात नमूद ७ व्यक्तींची न्यासात विश्वस्तपदी नेमणूक करण्यासाठी मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे यांचे समोर दि. ११/०८/२०२६ रोजी ११ वाजता ठेवली आहे. कार्यालयाचा पत्ता :- सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे ४५/२, कै. बा.स. ढोले पाटील रोड, पुणे ४११००१ असा आहे. तरी या संदर्भात कोणाला काही हरकती/आक्षेप किंवा काही सांगावयाचे असल्यास स्वतः किंवा इतरांकरवी सदर नोटीस जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपर्यंत या कार्यालयात हजर राहून सांगणे किंवा आपले म्हणणे लेखी मांडावे. जर कोणीही हजर न राहील्यास कोणासही काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून योग्य तो कायदेशीर न्याय निर्णय घेण्यात येईल याची आपण सर्वांनी नोंद घ्यावी.

ही नोटीस माझे सही व मा. धर्मादाय सह आयुक्त-२, पुणे यांचे शिक्क्यानिशी आज दि. ०९/०७/२०२६ रोजी दिली.

**ठिकाण - पुणे**
**दिनांक : ०९/०७/२०२६**

(शिक्का) सही/- अधिक्षक (न्याय) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग, पुणे



# मेस्सीचे आव्हान मोडून काढू : जो कोल



**अटलांटा, १३ जुलै**
अटलांटा स्टेडियमवर होणाऱ्या फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्य सामन्यात इंग्लंडचा संघ लिओनेल मेस्सीचे आव्हान मोडून काढतील, असा विश्वास इंग्लंडचा माजी विंगर जो कोल यांनी व्यक्त केला. थॉमस ट्युशेल यांचा संघ २१ वर्षांनंतर पहिल्यांदाच अर्जेंटिनाचा सामना करणार आहे.

गुरुवारी (भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री १२.३० वाजता) होणारा हा सामना इंग्लंड व अर्जेंटिना यांच्यातील विश्वचषकातील पारंपरिक प्रतिस्पर्धी संघर्षाचा आणखी एक अध्याय असेल. यापूर्वी १९६२, १९६६, १९८६, १९९८ आणि २००२ मध्ये हे दोन देश जागतिक मंचावर पाच वेळा आमने-सामने आले आहेत; यात जपानमधील त्यांच्या शेवटच्या भेटीत डेव्हिड बेकहॅमच्या पेनॉल्टीमुळे इंग्लंडने विजय मिळविला होता.

अर्जेंटिना हा सध्याचा विश्वविजेता संघ आहे; त्यांनी चार वर्षांपूर्वी कतारमध्ये विजय मिळविला होता, जो त्यांचा तिसरा विश्वचषक विजय व ३६ वर्षांनंतरचा पहिला विजय होता. मात्र, इंग्लंडच्या आक्रमक क्षमतेमुळे दक्षिण अमेरिकन संघाला रोखले जाईल, असा विश्वास कोल यांनी व्यक्त केला.

आम्हाला लिओनेल मेस्सीचे आव्हान मोडून काढावे लागेल. आम्ही त्याला शांत झोपायला लावणार आहोत, असे कोलने सांगितले.

इंग्लंडप्रमाणेच, अर्जेंटिनानेही अतिरिक्त वेळेत खेळून विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत धडक मारली. स्वित्झर्लंडविरुद्धच्या सामन्यात ९० मिनिटांनंतर १-१ अशी बरोबरी झाली होती; त्यानंतर ज्युलियन अल्वारेझने दक्षिण अमेरिकन संघासाठी एक शानदार गोल केला आणि लाउटारो मार्टिनेझने ३-१ असा विजय निश्चित केला.

अंतिम-१६' मध्ये, त्यांनी २-० अशा पिछाडीवरून ३-२ असा विजय मिळवित विश्वचषकात नाट्यमय पुनरागमन केले. ७९ व्या मिनिटांपर्यंत ते दोन गोलने पिछाडीवर होते, मात्र त्यानंतर अवघ्या १३ मिनिटांच्या अंतरात त्यांनी तीन गोल केले.

त्याआधी, अंतिम-३२' मध्ये विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या केप वर्दे संघाविरुद्ध त्यांना अनपेक्षितपणे अतिरिक्त वेळेपर्यंत खेळावे लागले होते; अखेरीस प्रतिस्पर्धी संघाकडून झालेल्या 'ओन गोल'मुळे स्कॅलोनीच्या संघाला ३-२ असा विजय मिळविता आला आणि ते पुढील फेरीत पोहोचले.गटवार फेरीत त्यांनी अल्जेरिया, ऑस्ट्रिया आणि जॉर्डनचा पराभव केला. फ्रान्ससोबतच, स्पर्धेत शंभर टक्के विजयाची कामगिरी (अतिरिक्त वेळेतील विजयासह) असलेला हा एकमेव संघ आहे. ◂(वृत्तसंस्था)

# इंग्लंडचा उपांत्य फेरीपर्यंतचा प्रवास 'स्वप्नवत'

**मध्यफळीतील खेळाडू रीस जेम्स याचे मत**



**मियामी, १३ जुलै**
इंग्लंड संघाचा फिफा विश्वचषक उपांत्य फेरीपर्यंतचा प्रवास हा "स्वप्नवत" आहे, असे इंग्लंडचा मध्यफळीतील खेळाडू रीस जेम्स म्हणाला. अर्जेंटिनाचा सामना करण्यासाठी इंग्लंड सज्ज होत असताना रीस जेम्स माध्यमांशी बोलत होता.

थॉमस टुचेल यांच्या मार्गदर्शनाखालील संघाने उपांत्यपूर्व फेरीत नॉर्वेविरुद्ध संघर्षपूर्ण विजय मिळविला. १-० अशा पिछाडीवरून सावरत, ज्यूड बेलिंगहॅमच्या दोन गोलच्या जोरावर त्यांनी अतिरिक्त वेळेत २-१ असा विजय नोंदवला. पूर्वार्धात अँड्रियास श्जेल्डरप याने नॉर्वेला आघाडी मिळवून दिली; डाव्या बाजूने मारलेला त्याचा फटका जॉर्डन पिकफोर्डच्या गोलपोस्टच्या दिशेने गेला आणि गोलरेषा ओलांडण्यापूर्वी दूरच्या पोस्टला धडकला. बेलिंगहॅमने आपल्या वैयक्तिक कौशल्याचे प्रदर्शन करत इंग्लंडला बरोबरी साधून दिली. त्यानंतर अतिरिक्त वेळेत अगदी जवळून गोल करत त्याने 'इंग्लंडच्या पुनरागमनावर शिक्कामोर्तब केले आणि संघाला १९६६ नंतरच्या केवळ तिसऱ्या विश्वचषक उपांत्य फेरीत पोहोचवले. स्पर्धेच्या सुरुवातीला हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरल्यानंतर, नॉर्वेविरुद्धच्या सामन्यात राखीव खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या जेम्सने बचाव आणि मध्यफळीत महत्त्वाची भूमिका बजावली. इंग्लंडला त्यांच्या चौथ्या विश्वचषक उपांत्य फेरीत पोहोचण्यास मदत केल्यानंतर, उत्तर अमेरिकेतील या प्रगतीचे त्याच्यासाठी काय महत्त्व आहे, यावर जेम्सने आपले विचार मांडले. हे स्वप्नवत आहे. लहानपणापासूनच प्रत्येक मुलाचे विश्वचषकात खेळण्याचे स्वप्न असते व हा त्याच प्रक्रियेचा एक भाग आहे. सर्वोत्तम देशांपैकी एकाविरुद्ध उपांत्य फेरीत खेळणे. आम्ही येथे पोहोचल्याचा आम्हाला आनंद आहे, असे तो म्हणाला.

नॉर्वेविरुद्ध बेलिंगहॅमने केलेल्या दोन गोलचा आनंद क्षणिक होता. सामन्यांदरम्यान हे कठीण असते. तुम्हाला त्या क्षणाचा आनंद घेण्यासाठी कदाचित १० सेकंद मिळतात व मग तो क्षण निघून जातो. कालचा सामना संपताच, आता पुढील गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जाते. आम्ही मागे वळून पाहत नाही. ◂(वृत्तसंस्था)

# आयसीसी पुरस्काराच्या शर्यतीत गिल



**दुहई, १३ जुलै**
आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने जून २०२६ साठी पुरुषांमधील महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूच्या पुरस्कारासाठी नामांकने जाहीर केली आहेत. बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू मोसाद्देक हुसेन, न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज नॅथन स्मिथ व भारताचा कर्णधार शुभमन गिलने विविध प्रकारच्या क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरीमुळे ही मान्यता मिळविली आहे.

या तिघांनीही महिन्याभरात सामना जिंकून देणारी कामगिरी केली आणि आपापल्या संघांच्या अविस्मरणीय मालिका विजयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

भारताचा कर्णधार शुभमन गिलसाठी जून महिना फलंदाजीच्या दृष्टीने अत्यंत यशस्वी ठरला. त्याने महिन्याची सुरुवात अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात संयमी १२६ धावांची खेळी करून केली; हे त्याचे ११ वे कसोटी शतक होते, ज्यामध्ये १५ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. गिलने हाच फॉर्म एकदिवसीय मालिकेतही कायम राखला आणि खेळलेल्या दोन डावांत एकूण २३८ धावा केल्या. पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याने ६६ चेंडूंत वेगवान ८४ धावा केल्या, तर लखनौमधील सामन्यात केवळ ११० चेंडूंत शानदार १५४ धावांची खेळी साकारली.

डावादरम्यान स्नायूंच्या पेटके येण्याच्या समस्येशी झुंज देऊनही, गिलने डावाच्या उत्तरार्धात वेगवान फलंदाजी करत 'सामनावीर' पुरस्कारासाठी पात्र ठरेल अशी खेळीकेली. तसेच, आपल्या वर्चस्वपूर्ण कामगिरीमुळे त्याने 'मालिकावीर' पुरस्कारही पटकावला.

बांगलादेशच्या अष्टपैलू मोसाद्देक हुसेनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शानदार पुनरागमन केले. चार वर्षांच्या खंडानंतर परतलेल्या या खेळाडूने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत बांगलादेशच्या ऐतिहासिक २-१ अशा विजयात मोलाची भूमिका बजावली. त्याला 'मालिकावीर' म्हणून गौरवण्यात आले.

नेथन स्मिथसाठी हा महिना अत्यंत यशस्वी ठरला; इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत न्यूझीलंडने २-१ असा संस्मरणीय विजय मिळविला.या वेगवान गोलंदाजाने मालिकेत सर्वाधिक १६ बळी घेत अव्वल स्थान पटकावले. त्याला मालिकावीर म्हणून गौरवण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय महिलांचा इंग्लंडवर ऐतिहासिक विजय

## क्रांती गौड सामनावीर

**लंडन, १३ जुलै**
लॉर्ड्सवर खेळल्या गेलेल्या पहिल्या महिला कसोटीच्या अंतिम दिवशी भारतीय फिरकी गोलंदाजांनी इंग्लंडचा सहज पराभव केला आणि अवघ्या ९५ मिनिटांत २७० धावांनी विजय निश्चित केला. स्नेह राणाने अवघ्या ४२ धावांच्या मोबदल्यात ४ बळी टिपण्याची किमया केली. पहिल्या डावात ५ बळी व दुसऱ्या डावांत २ बळी टिपणारी मध्यमगती वेगवान गोलंदाज क्रांती गौड सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली.



प्रतिष्ठित लॉर्ड्सवर इंग्लंड महिला संघाविरुद्धचा एकमेव कसोटी सामना जिंकल्यानंतर भारतीय महिला संघाने विजेतेपदाची ट्रॉफी उंचावली.

सोफी एक्लेस्टोनने झुंजार खेळी करत कारकिर्दीतील पहिले आंतरराष्ट्रीय अर्धशतक झळकावले; मात्र स्नेह राणाने तिला त्रिफळाचीत केले. या बळीसह राणाने डावातील चौथी व सामन्यातील सहावा बळी मिळविला आणि भारताने महिला कसोटी क्रिकेटमधील धावांच्या फरकाने मिळवलेला चौथा सर्वात मोठा विजय नोंदविला. चौथ्या दिवसाच्या खेळाच्या सुरुवातीला, ५२ धावांवर नाबाद असलेल्या एमी जोन्सने केवळ दोन धावांची भर घातली. ती मिड-विकेटवर शेफाली वर्माकडे झेल देऊन बाद झाली. या बळीमुळे राणाला डावातील तिसरे यश मिळाले आणि इंग्लंडची तळाची फलंदाजी उघडी पडली. रविवारी, भारताने इंग्लंडसमोर चौथ्या डावात विजयासाठी ४५७ धावांचे प्रचंड आव्हान ठेवले होते. यस्तिका भाटियाने झळकावलेल्या शतकामुळे हे शक्य झाले; या शतकामुळे तिचे नाव लॉर्ड्स कसोटीच्या फलंदाजांच्या 'ऑनर्स बोर्ड'वर (सन्मान फलकावर) झळकले. विजयासाठी ४५७ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा संपूर्ण संघ ६२.५ षटकांत १८६ धावांतच गारद झाला. ॲमी जोन्स (५४) व सोफी एक्लेस्टोनने (५०) तेवढी अर्धशतकी खेळी करत संघाला विजय मिळवून देण्याचा कसोशीने प्रयत्न केला, परंतु उर्वरित फलंदाज भारती गोलंदाजांसमोर फिर वेळ टिकाव धरू शकले नाहीत. स्नेह राणाने प्रभावी मारा करीत ४ बळी टिपले. सायली सातघरे, क्रांती गौड व दीप्ती शर्माने प्रत्येकी दोन बळी घेत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. ◂(वृत्तसंस्था)

# स्टीफन फ्लेमिंगने सोडली सीएसकेची साथ



**चेन्नई, १३ जुलै**
चेन्नई सुपर किंग्स (सीएसके), टेक्सास सुपर किंग्स (टीएसके) आणि जोबर्ग सुपर किंग्स (जेएसके) या तिन्ही फ्रँचायझींनी न्यूझीलंडच्या या माजी कर्णधाराशी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय जाहीर केल्यामुळे, सुपर किंग्स कुटुंबासोबतचा स्टीफन फ्लेमिंग यांचा दीर्घकालीन प्रवास सोमवारी संपला.

या घोषणेमुळे फ्रेन्चायझी क्रिकेटमधील सर्वात यशस्वी आणि दीर्घकाळ चाललेल्या भागीदारींपैकी एका भागीदारीचा समारोप झाला आहे. फ्लेमिंग २००८ मध्ये इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) पहिल्या हंगामात खेळाडू म्हणून सीएसके मध्ये सहभागी झाले होते आणि त्यानंतर २००९ मध्ये त्यांनी मुख्य प्रशिक्षकपदाची धुरा सांभाळली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेन्चायझीने पाच आयपीएल जेतेपदे, दोन चॅम्पियन्स लीग टी-२० ट्रॉफी जिंकल्या, तसेच १० वेळा आयपीएलच्या अंतिम फेरीत आणि विक्रमी १२ वेळा प्लेऑफमध्ये धडक मारली. दक्षिण आफ्रिकी टी-२० मध्ये, जोबर्ग सुपर किंग्सने आतापर्यंतच्या चारही हंगामांत प्लेऑफमध्ये प्रवेश केला, परंतु त्यांना एकदाही अंतिम फेरी गाठता आली नाही. तसेच, एमएलसीच्या पहिल्या तीन हंगामांतही त्यांनी प्लेऑफमध्ये स्थान मिळवले, पण अंतिम सामना खेळता आला नाही.

फ्लेमिंग आणि फ्रँचायझी व्यवस्थापन यांच्यातील अनेक चर्चांनंतर हा निर्णय घेण्यात आला, असे सीएसकेने जाहीर केले. सुपर किंग्सच्या परदेशातील दोन फ्रँचायझींनी — एसए२० मधील जेएसके व मेजर लीग क्रिकेटमधील टीएसके देखील सोशल मीडियावर स्वतंत्र निवेदने जारी करून या घडामोडीला दुजोरा दिला. ◂(वृत्तसंस्था)

# कोहली, रोहितकडून मदतीची अपेक्षा

**बर्मिंगहॅम, १३ जुलै**
टी-२० मधील निराशाजनक कामगिरीनंतर, इंग्लंडविरुद्ध मंगळवारी सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत अनुभवी विराट कोहली व रोहित शर्माला केवळ स्वतःची चांगली कामगिरीच करायची नाही, तर आत्मविश्वास उंचावलेल्या इंग्लंडविरुद्ध भारतीय संघाचे खचलेले मनोबल उंचावण्यातही महत्त्वाची भूमिका बजावायची आहे.

टी-२० क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे द्विपक्षीय वन-डे मालिकांचे महत्त्व व आकर्षण काहीसे कमी होत असताना, कोहली व रोहित (जसप्रीत बुमराहसह) पुन्हा एकदा या फॉरमॅटमध्ये खेळण्यासाठी सज्ज झाले आहेत. वन-डे विश्वचषकासह आपल्या कारकिर्दीचा शानदार समारोप करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या ३९ वर्षीय रोहित व लवकरच ३८ वर्षांचे होणाऱ्या कोहली यांच्यात अजूनही जिद्द कायम आहे व त्यांच्या कामगिरीतून धावांचा ओघही सुरू आहे. उपखंडातील फलंदाजीसाठी पोषक असलेल्या खेळपट्ट्यांच्या



तुलनेत अधिक वेगवान व उसळी घेणाऱ्या खेळपट्ट्यांवर जोफ्रा आर्चर व जोश टंग यांचा सामना करणे हे एक वेगळेच आव्हान आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत या जोडीने इंग्लंडच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली असल्याने, त्यांना काय करावे लागेल याची त्यांना पूर्ण कल्पना आहे.

या मालिकेतील त्यांची उपस्थिती विशेष महत्त्वाची ठरते, कारण श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने या दौऱ्यातील सात टी-२० सामन्यांपैकी केवळ एक सामना वगळता इतर सर्व सामने गमावले आहेत. एका सामन्यात पराभव झाला नाही, कारण तो सामना रद्द करावा लागला होता.

आयर्लंडविरुद्धचा ०-२ असा पराभव व इंग्लंडकडून झालेला ०-४ असा दारूण पराभव, यामुळे अनेक समस्या समोर आल्या आहेत आणि बीसीसीआयने कामगिरीचा आढावा घेण्याचे ठरवले आहे. अशा परिस्थितीत, ज्या संघ व्यवस्थापनाने या दोन आधुनिक काळातील दिग्गज खेळाडूंसाठी गोष्टी फारशा सोप्या केल्या नव्हत्या, त्यांनाच आता संघाची घसरण रोखण्यासाठी या दोघांचे स्वागत खुल्या दिलाने करावे लागेल. टी-२० संघाच्या निराशाजनक कामगिरीतील त्रुटी पूर्णपणे झाकून टाकू शकत नसला, तरी तो नक्कीच संघाचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत करेल.

**भारत वि. इंग्लंड**
**पहिला वन-डे सामना**
**वेळ :** दुपारी ३.३० वाजतापासून
**स्थळ :** एजबॅस्टन क्रिकेट मैदान, बर्मिंगहॅम
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्‌सवर

### फलंदाजी फळी बळकट करणे महत्त्वाचे

कर्णधार शुभमन गिल, ५० षटकांच्या फॉरमॅटमधील आणखी एक उत्कृष्ट फलंदाज व अनुभवी केएल राहुल याच्या पुनरागमनामुळे, वरच्या फळीतील फलंदाजांची एक जबरदस्त चौकडी तयार झाली आहे; ही चौकडी कोणत्याही सामन्याचे चित्र पालटू शकते. यात श्रेयस अय्यरची भर घातल्यास, फलंदाजीच्या फळीबद्दल फारशी चिंता करण्याचे कारण उरणार नाही. ◂(वृत्तसंस्था)

# श्री चरणी, ब्राइस, वायट-हॉज आयसीसी पुरस्काराच्या शर्यतीत



**दुबई, १३ जुलै**
आयसीसी महिला टी-२० विश्वचषकातील उत्कृष्ट वैयक्तिक कामगिरीनंतर, भारताची उदयोन्मुख डावखुरी फिरकीपटू एन. श्री चरणी हिला जून २०२६ च्या आयसीसी 'महिला प्लेअर ऑफ द मंथ' पुरस्कारासाठी मानांकन देण्यात आले आहे.

या यादीत चरणीसोबत स्कॉटलंडची कर्णधार कॅथरीन ब्राइस आणि इंग्लंडची अनुभवी सलामीवीर डॅनी वायट-हॉज यांचाही समावेश आहे. जरी भारताचे स्पर्धेतील आव्हान साखळी फेरीतच संपले असले, तरी चरणीने या मोठ्या स्पर्धेत सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज ठरून एक सकारात्मक छाप पाडली.

चरणीने आपल्या फिरकीच्या जाळ्यात फलंदाजांना अडकवत केवळ सहा टी-२० सामन्यांत १४ बळी टिपले. तिची सरासरी ११ आणि इकॉनॉमी रेट ६.६९ इतका प्रभावी होता. भारताच्या 'गट १' मधील पाचही सामन्यांत तिने किमान दोन बळी घेतले. तिच्या या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीमध्ये कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध ३-२१, नेदरलँड्सविरुद्ध घातक ४-१९ आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध उत्कृष्ट ३-२४ अशा कामगिरींचा समावेश होता.

या मासिक पुरस्कारासाठी चरणीला डॅनीकडून तगडे आव्हान मिळत आहे. डॅनीने सलामीला फलंदाजी करताना हा महिना गाजविला. तिने सहा टी-२० सामन्यांत ७१.७५ ची जबरदस्त सरासरी आणि १५१.८५ च्या स्ट्राईक रेटसह एकूण २८७ धावा केल्या. ती स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारी फलंदाज ठरली आणि टी-२० विश्वचषकाच्या एकाच आवृत्तीत ३०० धावांचा टप्पा ओलांडणारी पहिली महिला खेळाडू बनून इतिहास रचला; तिने एकूण ३०२ धावा केल्या. ◂(वृत्तसंस्था)

# आठ भारतीय खेळाडूंची अंतिम फेरीत धडक

**जकार्ता, १३ जुलै**
आशियाई १९ वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील मुष्टियुद्ध स्पर्धेत पुरुष आणि महिलांच्या गटात एकूण आठ भारतीय खेळाडूंनी अंतिम फेरीत प्रवेश केला, तर सात बॉक्सरनी उपांत्य फेरीपर्यंत मजल मारत कांस्यपदके निश्चित केली.

महिलांच्या गटात पाच भारतीय खेळाडू अंतिम फेरीत पोहोचल्या. निशा (५४ किलो) हिने पहिल्या फेरीत 'आरएससी' - (रेफरी स्टॉप्स कॉन्टेस्ट) द्वारे ह्येजू ली (दक्षिण कोरिया) हिचा पराभव केला, तर निकिता चंद (६० किलो) हिने पहिल्या फेरीत सारी कोकुफू (जपान) हिच्याविरुद्ध 'आरएससी' विजय नोंदविला.

काजल (६५ किलो) हिने दुसऱ्या फेरीत गुल्झिना मेल्सवेक (किर्गिस्तान) हिच्यावर 'आरएससी' विजय मिळवला. अधिक वजनी गटांमध्ये, मुस्कान (७५ किलो) हिने तोइरोवा ओयशा (उझबेकिस्तान) हिच्याविरुद्ध ५:० असा विजय मिळविला आणि प्रियांका (+८० किलो) हिने पणार सेइतखांकीझी (कझाकस्तान) हिच्यावर ५:० असा वर्चस्वपूर्ण विजय नोंदविला.


विश्वनाथ



प्रियांका

पुरुषांच्या गटात तीन भारतीय बॉक्सर अंतिम फेरीत पोहोचले. विश्वनाथ सुरेश (५० किलो) याने फिलिपीन्सच्या प्रतिस्पर्ध्यावर ५:० असा दमदार विजय मिळविला, तर गंगा (५५ किलो) याने जपानच्या खेळाडूवर ३:२ अशा विभाजित निर्णयाने मात केली. वंशज (६५ किलो) यानेही किर्गिस्तानच्या खेळाडूवर ४:१ असा विजय मिळवून अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. भारताने उपांत्य फेरीतील कामगिरीच्या जोरावर सात कांस्यपदकेही आपल्या नावावर केली. महिलांच्या गटात तनु (५१ किलो), प्राची (५७ किलो), शिवानी (७० किलो) आणि नैना (८० किलो) यांनी कांस्यपदके जिंकली. २३-वर्षांखालील (U-23) पुरुष गटात हितेश (७० किलो), नीरज (७५ किलो) आणि ईशान कटारिया (+९० किलो) यांनी कांस्यपदके जिंकली. या निकालांमुळे, या खंडीय स्पर्धेत भारताने आपली पदकांची दमदार कामगिरी अधिक दृढ केली असून, पुरुष आणि महिला अशा दोन्ही विभागांमधील संघाची सखोल गुणवत्ता सिद्ध केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

## सचिनने साधला महिला संघाशी सुसंवाद

**लंडन :** इंग्लंडविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्याच्या अंतिम दिवशी सकाळचे सत्र सुरू होण्यापूर्वी, महान फलंदाज सचिन तेंडुलकरने लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर भारतीय महिला क्रिकेट संघाशी संवाद साधून एक अतिशय कौतुकास्पद कृती केली.सर्वकाळातील महान क्रिकेटपटूंपैकी एक मानल्या जाणाऱ्या तेंडुलकरने हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघ आणि सपोर्ट स्टाफच्या सदस्यांची भेट घेतली व त्यांच्याशी संवाद साधला. इंग्लंडच्या भूमीवर ऐतिहासिक कसोटी विजयाच्या उंबरठ्यावर असलेल्या भारतीय संघाला यामुळे एक अविस्मरणीय आणि प्रेरणादायी बळ मिळाले.

# सेनूजा वेकुनागोडाचे नाबाद द्विशतक

## श्रीलंका युवा संघ ४ बाद ३४४

**गॅले, १३ जुलै**
येथे सोमवारपासून प्रारंभ झालेल्या १९ वर्षांखालील भारतीय युवकांच्या विरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात सेनूजा वेकुनागोडाने झळकावलेल्या नाबाद द्विशतकाच्या बळावर श्रीलंका युवा संघाने दिवस अखेर पहिल्या डावांत ८९ षटकांत ४ बाद ३४४ धावा उभारल्या.



श्रीलंका संघाचा कर्णधार विमथ दिनसाराने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र भारताच्या काव्या परेश पटेलने पहिल्याच षटकांत चौथ्या चेंडूवर सलामीवीर दुलनिथ सिगेराला (०) भोपळा फोडण्याआधीच तंबूत परत पाठविले. मात्र त्यानंतर त्याचा जोडीदार सेनूजा वेकुनागोडाने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत संघाचा डाव सावरला. सेनूजाला कर्णधार विमथ दिनसारा (५२), कविजा गमागे (४९) व चामिका हिनातीगालाची (नाबाद ३३) उत्तम साथ मिळाली, त्यामुळे त्याने वैयक्तिक शतकाला द्विशतकात परिवर्तित केले. सेनूजा व चामिकाने नाबाद खेळी करत श्रीलंका युवा संघाला दिवस अखेर पहिल्या डावांत ४ बाद ३४४ धावांचा टप्पा गाठून दिला. सेनूजाने २२७ चेंडूंचा सामना करीत नाबाद २०३ धावांची खेळी केली, यात त्याने तब्बल ३१ चौकार ठोकले.

भारताकडून काव्या परेश पटेलला २ बळी, तर प्रणव राघवेंद्र व यशवर्धन चौहानला प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश मिळाले. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# विदेशी मद्य साठ्यासह सव्वा कोटींचा मुद्देमाल जप्त

### मळोलीत राज्य उत्पादन शुल्क विभागाचा दणका



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ जुलै-**

राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाच्या माळशिरस विभागाने रविवार दि. १२ जुलै रोजी मळोली (ता. माळशिरस) येथे सापळा रचून गोवा राज्यनिर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधित असलेल्या विदेशी मद्य वाहतूकीवर धडक कारवाई केली. आरोपीच्या ताब्यातून १ कोटी २४ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

कारवाईत गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंध असलेले विदेशी मद्याचे ७५० मि.ली. क्षमतेच्या ८ हजार ४०० बाटल्या (७०० बॉक्स) एकूण रक्कम ९२ लाख ४० हजार व एक चौदा टायर ट्रक अंदाजे किंमत ३२ लाख रुपये व तीन मोबाईल अंदाजे किंमत ३१ हजार असा एकूण मिळून १ कोटी २४ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच दोघांवर गुन्हा नोंदवला आहे.

ही कारवाई निरीक्षक सचिन भवड, राकेश पवार, दुय्यम निरीक्षक सौरभ भोसले, बाळासाहेब नेवसे, अमित नांगरे, अक्षय सस्ते, स्वप्नील सोनवलकर, प्रीतम पडवळ, सहा. दु.निरी. एस.ए.बिराजदार, जवान योगेश पाटील, प्रविण पुसावळे, देवीदास चौधरी, संजय पराडे, रेवनसिद्ध कांबळे, योगीराज तोग्गी, युवराज टेळे, आबासो कसबे, सचिन भोसले, किरण गोळे, रोहित लोखंडे, सुजित जाधव, दिवेश फडतरे, सौरभ गुरव, ओंकार जाधव, महिला जवान कल्पना जाधव, जवान नि.वाहन चालक मारुती जडगे यांनी पार पाडली. गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक सौरभ भोसले हे करत आहेत.

> **कारवाईबाबत संपर्कासाठी जनतेला आवाहन**
> जिल्ह्यात बनावट दारु तसेच हातभट्टी दारु निर्मिती, विक्री, वाहतूक तसेच इतर कोणत्याही प्रकारच्या दारुची निर्मिती, विक्री व वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची माहिती कार्यालयास देण्यात यावी. तसेच टोल फ्री क्र.१८००८३३३३३३ व व्हॉटस ॲप क्र. ८४२२००११३३ यावर संपर्क साधावा असे आवाहन राज्य उत्पादन अधिक्षक भाग्यश्री जाधव यांनी केले आहे.

# बार्शीच्या बाजारात मोबाईल चोरट्यांचा धुमाकूळ

### चौघांचे मोबाईल लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ जुलै-**

बार्शी शहरांच्या आठवड्याच्या शनिवार बाजारात अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत चार नागरिकांचे एकूण ४५ हजार रुपये किमतीचे चार मोबाईल फोन लंपास केल्याची घटना शनिवार, दि. ११ जुलै सकाळी घडली.

या घटनेमुळे बाजारात आलेल्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बार्शी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत लक्ष्मण शामराव लांडगे (रा. संभाजीनगर, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते शनिवारी सकाळी सुमारे ९ वाजता भाजी खरेदीसाठी बाजारात गेले होते. पत्नीशी मोबाईलवर बोलून त्यांनी मोबाईल पँटच्या मागील खिशात ठेवला.

काही वेळाने भाजीचे पैसे देण्यासाठी खिशात हात घातला असता २० हजार रुपये किमतीचा मोटोरोला कंपनीचा मोबाईल चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले.

मोबाईलचा शोध घेत असताना समाधान सुधाकर काळे, श्रीकांत वृजकिशोर गुप्ता आणि शंकर बाबुराव शिंदे यांचेही मोबाईल चोरीला गेल्याचे समोर आले. चौघांनी भाजीमंडई परिसरात शोध घेतला; मात्र मोबाईल मिळून न आल्याने त्यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. चोरीस गेलेल्या मोबाईलमध्ये मोटोरोला, विवो व ओप्पो कंपनीच्या मोबाईलचा समावेश असून, त्यांची एकूण किंमत ४५ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलीस सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी करुन आरोपींचा शोध घेत आहेत.

## महत्वाचे...



### जिजामाता प्रशालेत स्वच्छता पंधरवडा साजरा

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

जिजामाता प्रशाला, कोंडी व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, पाकणी डेपो यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून नवतेज सिंग व शुभम जैन उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिन ठोकळ उपस्थित होते. स्वच्छता पंधरवडा निमित्त प्रशालेमध्ये चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तसेच स्वच्छता फेरी व वृक्षारोपण आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी चित्रकला स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक उदय जाधव यांनी केले. त्यानंतर देशभक्त स्वातंत्र्य सेनानी तुळशीदास जाधव, निर्मलाताई ठोकळ व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. सागर ढोणे यांनी स्वच्छतेची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांकडून म्हणून घेतली. सूत्रसंचालन आकांक्षा उदय जाधव हिने केले तर आभार विजयकुमार लांडगे यांनी मानले.



### कायझन होंडातर्फे ॲक्टिव्हा १२५ रॅली; सोलापूरकरांचा प्रतिसाद

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

स्थानिक बाजारपेठेत अग्रणी असलेल्या कायझन होंडा शोरूमतर्फे शहरात होंडा ॲक्टिव्हा १२५ स्कूटरची रॅली काढण्यात आली. शोरूमपासून सुरू झालेली रॅली ओल्ड एम्प्लॉयमेंट चौक, सात रस्ता, सिव्हिल चौक, दयानंद महाविद्यालय, समाचार चौक, विजापूर वेस, सिद्धेश्वर मंदिर आणि डफरिन चौक मार्गे पुन्हा शोरूममध्ये दाखल झाली. रॅलीद्वारे ॲक्टिव्हा १२५ मधील आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल फीचर्स, उत्कृष्ट परफॉर्मन्स आणि इंधन बचतीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. सर्व चालकांनी हेल्मेट परिधान करून वाहतूक नियमांचे पालन केले. सेल्स मॅनेजर नागेश झुंजूर यांनी ग्राहकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आभार मानत, शोरूममध्ये सुरू असलेल्या विशेष फायनान्स ऑफर्सचा लाभ घेऊन ॲक्टिव्हा १२५ ची टेस्ट राइड करण्याचे आवाहन केले.

### ताता गणपती मंडळातर्फे बुधवारी मोफत नेत्रतपासणी शिबीर

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

पूर्व भागातील मानाच्या ताता गणपती मंडळातर्फे आधारस्तंभ मुरलीधर आरकाल व विश्वस्त उमेश मामड्याल यांच्या मार्गदर्शनाखाली, साबळे नेत्र हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दिवंगत आशय्या आरकाल यांच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर बुधवार, १५ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत ताता गणपती हॉल येथे होणार आहे. या शिबिराचा समाज बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष बालाजी आरकाल तसेच उपाध्यक्ष ॲड. संदीप प्रे. संगा यांनी केले आहे.

### टायर फुटल्याने धावत्या दुचाकीला अपघात; दोन बालकांसह पाच जण जखमी

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

भरधाव वेगातील दुचाकीचे टायर फुटल्याने झालेल्या अपघातात दुचाकी वर बसलेले पाच जण मार लागून जखमी झाल्याची घटना सोलापूर मंगळवेढा मार्गावर ब्रह्मपुरी येथे रविवारी सायंकाळी घडली. छाया राजेंद्र खांडेकर (वय ५०वर्ष),आरती विठ्ठल खांडेकर(वय २५वर्ष, विठ्ठल राजेंद्र खांडेकर (वय २८ वर्ष), सिद्धी विठ्ठल खांडेकर (वय ३वर्ष )आणि शिवम विठ्ठल खांडेकर(वय ५ वर्ष, सर्व रा. गोटेवाडी, ता.मोहोळ) अशी जखमींची नावे आहेत. ते सर्वजण रविवारी सायंकाळी एकाच मोटार सायकल वर बसून मंगळवेढाकडून सोलापूरकडे येत असताना वाटेत ब्रह्मपुरी जवळ सदर दुचाकीचे पाठीमागचे टायर फुटले. त्यामुळे दुचाकी वर बसलेले सर्वजण खाली पडून जखमी झाले. या सर्वांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात एका रुग्णवाहिकेतून रात्री साडेआठ वाजता दाखल करण्यात आले.

# सांगोला महाविद्यालयात बीसीए, एमसीए भाग.१ ची प्रवेश प्रक्रिया सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ जुलै-**

सांगोल्यातील सांगोला महाविद्यालय मध्ये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद दिल्ली अंतर्गत बीसीए भाग.१ व एमसीए भाग.१ या वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. एमसीए भाग.१ च्या प्रवेशासाठी आवश्यक असणारी कॅप रजिस्ट्रेशन प्रोसेस सुरू झाली असून सांगोला महाविद्यालयास एफ.सी सेंटरची मान्यता मिळाली आहे.

या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छित विद्यार्थ्यांनी बिनचूक मोफत रजिस्ट्रेशन करण्यासाठी महाविद्यालयात सकाळी ९ ते ५ या वेळेत आवश्यक कागदपत्रासह उपस्थित राहावे. एमसीए साठी रजिस्ट्रेशन करण्यासाठी अंतिम दि.१४ जुलै तसेच बीसीए साठी दि.१६ जुलै आहे. प्रशस्त कॉम्प्युटर लॅब, डिजिटल क्लासरूम तसेच कॅम्पस प्लेसमेंटची सुविधा असलेल्या सांगोला महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे आवाहन संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, सचिव ॲड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, खजिनदार नागेश गुळिमरे, प्र.प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, संगणक विभागप्रमुख डॉ. राजकुमार ताठे, प्लेसमेंट प्रमुख सूर्यकांत पाटील यांनी केले आहे.

# प्रा. बाबर, प्रा. लंबे यांच्या संशोधनाला भारत सरकारचे पेटंट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ जुलै-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पंढरपूर येथील प्राध्यापक डॉ. अनिल बाबर आणि डॉ. सोमनाथ लंबे यांनी विकसित केलेल्या पोर्टेबल ऊस पाचट कंपोस्टर या उपकरणाला भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. शेतीतील ऊस पाचट, सुकलेली पाने, तण तसेच इतर सेंद्रिय अवशेषांपासून कमी वेळात व कमी खर्चात दर्जेदार सेंद्रिय कंपोस्ट तयार करण्यासाठी हे उपकरण उपयुक्त ठरणार आहे.

सदर पोर्टेबल उपकरण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज हलविता येते. त्यामुळे शेतातच कंपोस्ट निर्मिती करणे अधिक सोपे व किफायतशीर होते. या उपकरणाद्वारे ट्रॅक्टर किंवा मोठ्या यंत्रांची आवश्यकता कमी होते. संशोधनामुळे ऊस पाचट जाळल्यामुळे होणारे वायू प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे.



श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ.एस.पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.ए.बी.कणसे, रजिस्ट्रार गणेश वाळके, संशोधन अधिष्ठाता डॉ अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, विभाग प्रमुख डॉ. एस.व्ही.एकलारकर, प्रा. दीपक भोसले तसेच सर्व प्राध्यापकांनी डॉ.अनिल बाबर आणि डॉ.सोमनाथ लंबे यांचे अभिनंदन केले आहे.

### भिशीच्या पैशावरून दगड व चाकूने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

भिशीच्या पैशाच्या कारणावरून दगड व चाकूने एका तरुणाला मारहाण करण्यात आल्याची घटना चैतन्य मार्केट जवळील पारधी वस्ती येथे रविवारी दुपारी घडली.

कैलास चंदू चव्हाण (वय ३५वर्ष, रा.विजापूर नाका सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे . रविवारी दुपारी तो पारधी वस्ती येथे असताना त्याला भिशीच्या पैशाच्या कारणावरून मारहाण करण्यात आली. यात सर्व अंगाला मुका मार लागल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात भाऊ अजय चव्हाण याने रात्री आठ वाजता दाखल केले.

# गर्भवती विवाहितेचा छळ; हुंड्यासाठी लाखोंची मागणी

### पतीसह सासरच्या पाच जणांविरोधात, तसेच कथित प्रेयसीविरोधात गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ जुलै-**

बार्शी येथे राहणाऱ्या सहा महिन्यांच्या गर्भवती विवाहित असलेल्या पूनम विकी पाटोळे यांनी पती विकी दत्तू पाटोळे, सासू नंदा दत्तू पाटोळे, सासरे दत्तू पाटोळे, नणंद संध्या सागर लोखंडे, नणंदेचे पती सागर सुरेश लोखंडे (रा. दौंड, जि. पुणे) तसेच करमाळा येथील सोनाली आलाट यांच्याविरोधात हुंड्याची मागणी, शारीरिक व मानसिक छळ, मारहाण, धमक्या आणि कथित अनैतिक संबंधांमुळे त्रास दिल्याची फिर्याद बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

फिर्यादी पूनम विकी पाटोळे (वय २९) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा विवाह ४ मे २०१६ रोजी बार्शी येथे समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे झाला. विवाहानंतर सुरुवातीला काही काळ चांगला संसार झाला. मात्र त्यानंतर पती व सासरच्या मंडळींकडून नोकरीसाठी पैसे भरायचे असल्याचे कारण सांगत माहेरहून दोन लाख रुपये आणण्याची मागणी करण्यात आली. नकार दिल्यानंतर शिवीगाळ, मारहाण व मानसिक छळ सुरु झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या आई-वडिलांनी संसार टिकावा या उद्देशाने दोन लाख रुपये दिल्यानंतरही घर बांधण्यासाठी आणखी पांच लाख रुपयांची मागणी करण्यात आली. तसेच पुन्हा तीन लाख रुपये रोख स्वरुपात दिल्यानंतरही छळ सुरूच राहिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. दरम्यान, पतीचे करमाळा येथील एका महिला कर्मचाऱ्याशी कथित अनैतिक संबंध असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याबाबत जाब विचारला असता पतीने उडवाउडवीची उत्तरे दिली. या प्रकाराची माहिती सासरच्या मंडळींना दिल्यानंतर त्यांनीही मला पाठिंबा न देता उलट शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, संबंधित महिलेलाही या गोष्टीची माहिती मिळाल्यानंतर तिने घरी येऊन शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. या सर्व प्रकारामुळे त्रस्त होऊन १६ मार्च २०२६ रोजी त्या दोन मुलींना घेऊन माहेरी गेल्या. त्यानंतर भरोसा सेल, सोलापूर येथे तक्रार दिली होती. मात्र तेथेही पतीने पत्नीला नांदविण्यास व मुलांचा सांभाळ करण्यास नकार दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच फिर्यादीच्या पोटातील बाळ आपले नसल्याचेही पतीने सांगितल्यांचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पती, सासू, सासरे, नणंद, नणंदेचा पती आणि पतीच्या कथित प्रेयसीविरुद्ध हुंड्याची मागणी, शारीरिक व मानसिक छळ, मारहाण, शिवीगाळ, दमदाटी आणि कौटुंबिक अत्याचार केल्याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.




# आरोग्य तपासणी शिबिराचा १७२ जणांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जुलै-**

घोंगडे वस्ती विराट हिंदू संमेलन समिती व गीतगंगा सोशल फाऊंडेशन आणि मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने घोंगडे वस्ती येथील घोंगडे वस्ती या भागातील सर्व नागरिक व रहिवासी करिता मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांची जनरल आरोग्य तपासणी व मोफत औषध, शुगर, रक्तदाब, डोळे व दंत तपासणी डॉ. करण आकुडे करण्यात आली. तसेच मोतीबिंदू तपासणी ( राजशेखर जेयुरे) करून पात्र रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेसाठी नोंदणी करण्यात आली. सोबत SIR मतदान प्रक्रिया करण्यात आले. या उपक्रमाचा १७२ अधिक नागरिकांनी लाभ घेतला. शिबिराचे आयोजन घोंगडे वस्ती विराट हिंदू संमेलनाचे संयोजक नितीन शेजुळ व गीतगंगा फाऊंडेशनचे संस्थापक प्रमुख व्यंकटेश कंची, मुख्यमंत्री सहायता कक्ष संयोजक कैलास चौधरी यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी उपस्थित शिवस्मारक अध्यक्ष रंगनाथ बंकापूरे, भटक्या विमुक्त प्रांत कार्यकर्ते अशोक संकलेचा, जिल्हा सेवा प्रमुख करपे, गीतगंगा फाऊंडेशन सचिव चंद्रकांत कंची खजिनदार वेणुगोपाल उत्तुर, दयानंद नगर कार्यवाह चंद्रकांत जक्कन, नगर सेवा प्रमुख गणेश मादगुंडी, राकेशचंद्र केसरवाणी, विनायक मादम, विनायक सामलेटी, परमेश्वर क्षीरसागर, श्रीनिवास दासरी यांनी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले. शिबिरास आमदार विजयकुमार देशमुख मालक, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, नगरसेवक राजकुमार पाटील व मंडळ अध्यक्ष दत्ता बडगू यांचीही उपस्थिती लाभली. प्रास्ताविक चन्नेश इंडी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समिती सदस्य रवी दासरी, अनिल म्हता, प्रभाकर बिंगी, नरेश म्हता, भालचंद्र गालपल्ली, सत्यनारायण नडीमेटला, नागेश मलजी यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### पुष्पावती सिद



**माळिशरस, दि. १३ जुलै-**

येथील पुष्पावती सिद (वय ६५ वर्षे) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन डॉक्टर मुले, सुना, नातवंडे व एक मुलगी असा परिवार आहे. त्या श्रीराम देवस्थानचे संचालक शिवाजीराव सिद यांच्या पत्नी होत.

### सुमित्रा गोंडाळ



**सोलापूर, दि. १३ जुलै-**

येथील विजयपूर रस्त्यावरील इंदिरा महिला जीवन विकास सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संस्थेच्या विद्यमान अध्यक्ष सुमित्रा विठ्ठल गोंडाळ (वय ८६) यांचे सोमवारी सकाळी वृद्धापकाळाने (दि.१३) निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर सोलापूरच्या मोदी स्माशनभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. इंडियन एक्सप्रेस वृत्त समूहाचे असिस्टंट जनरल मॅनेजर अमित गोंडाळ यांच्या त्या मातोश्री होत.

# बार्शी तालुक्यात अवतरलं 'मिनी कोकण'

### ७९७ लोकसंख्येच्या आंबेगावचा निसर्गस्नेही पॅटर्न

**तभा वृत्तसेवा । प्रभाकर क्षीरसागर**
**वैराग, दि. १३ जुलै-**

सध्याच्या सिमेंटच्या जंगलात आणि उन्हाच्या तीव्र झळांमध्ये निसर्गाचा गारवा शोधणाऱ्यांसाठी बार्शी तालुक्यातील आंबेगाव आशेचा किरण ठरत आहे. अवघी ७९७ लोकसंख्या असलेल्या या गावात 'जेवढी लोकसंख्या, तेवढी झाडे' हा पर्यावरणपूरक संकल्प प्रत्यक्षात उतरवली आहे. परिणामी ऐन उन्हाळ्यातही हे गाव एखाद्या 'मिनी कोकणा'सारखं नटलेलं दिसत आहे.

दैनंदिन बाजारहाट किंवा मोठ्या मार्केटसाठी येथील ग्रामस्थांना आजही गौडगाव, वैराग किंवा थेट बार्शी शहरावर अवलंबून राहावे लागते. नागरी सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असला, तरी या गावाने विकासाची आणि प्रगतशीलतेची एक वेगळीच पर्यावरणपूरक व्याख्या तयार केली आहे. लोकसंख्येने आणि आकाराने छोटे असले, तरी या गावाची ओळख एक 'सुशिक्षित गाव' म्हणून आहे. गावातील बहुतांश लोक कष्टाने उत्तम शेती करतात. मात्र शिक्षणाच्या बाबतीत हे गाव कुठेही मागे नाही. गावातील तरुण आणि नागरिक विविध क्षेत्रांत उच्च शिक्षण घेऊन नोकरीनिमित्त वेगवेगळ्या उच्च पदांवर कार्यरत आहेत.

प्रशासकीय सेवा, शिक्षण क्षेत्र, संरक्षण दल आणि खासगी क्षेत्रातील नामांकित कंपन्यांत येथील नोकरदार वर्ग सेवा देत आहे. शहरात राहत असले तरी आपल्या मातीशी असलेली नाळ त्यांनी तोडलेली नाही. शनिवार-रविवार किंवा सुट्ट्यांच्या दिवशी गावात येऊन हे सर्व सुशिक्षित नागरिक गावाच्या पर्यावरण मोहिमेत हिरीने भाग घेतात.



रस्त्यांवर कचऱ्याचा एक तुकडाही न देणारे हे गाव प्लास्टिकमुक्तीकडे यशस्वी पाऊल टाकत आहे.

**आंबेगावला 'आदर्श' बनवणारी प्रमुख वैशिष्ट्ये:**

- 'एक नागरिक, एक झाड' संकल्पना

गावात जेवढी लोकसंख्या आहे, तेवढीच किंवा त्यापेक्षा जास्त झाडे आज गावात डौलाने डुलत आहेत.

- स्वच्छ आणि निसर्गरम्य रस्ते

गावात सिमेंट किंवा डांबरी रस्त्यांच्या चकाकीपेक्षा तिथली स्वच्छता आणि रस्त्यांच्या दुतर्फा असलेली गर्द झाडी मनाला भुरळ घालते.

३) जैवविविधतेने पक्ष्यांचा किलबिलाट

झाडांची संख्या वाढल्यामुळे आंबेगावात आता विविध प्रजातींच्या पक्ष्यांचा वावर वाढला आहे.

४) 'थेंब थेंब पाण्याचे' नियोजन

झाडे जगवण्यासाठी गावाने सांडपाण्याचा वापर करुन वेगळेपण जपले आहे.

५) उन्हाळ्यातही जाणवतो कोकणचा भास

मध्यंतरी झालेल्या रिमझिम पावसानंतर हे गाव निसर्गरंगात न्हाऊन निघालं होतं. जणू कोकणातल्या एखाद्या छोट्याशा देखण्या गावामध्ये आल्याचा भास प्रत्येकाला होत होता. शेतकरी आणि नोकरदारांची 'जुगलबंदी' गावातील कष्टकरी शेतकरी बांधव आणि बुद्धिमान नोकरदार वर्ग यांच्यात एक अनोखा ताळमेळ पाहायला मिळतो. तरुण मंडळी सुट्टीच्या दिवशी श्रमदान करून झाडांची काळजी घेतात.

# ग्रामीण विकासाचा १ हजार ७६८ कोटींचा मेगा ब्ल्युप्रिंट

## ■ 13 हजार विकासकामांचा समावेश ■

### शिक्षण, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य आणि ग्रामविकासाला सर्वाधिक प्राधान्य



**पाणी, शिक्षण, आरोग्य, रस्ते**

जिल्हा परिषद प्रशासनाने या आराखड्यात ग्रामीण विकासाचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला असून पिण्याचे पाणी, शिक्षण, आरोग्य आणि दर्जेदार रस्ते या चार प्रमुख क्षेत्रांना विकासाचा आधारस्तंभ मानले आहे. यामुळे ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा होण्याबरोबर स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, आर्थिक उलाढाल आणि सर्वांगीण विकासाला नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी १,७६८.०८ कोटींचा प्रारूप विकास आराखडा जिल्हा नियोजन समितीकडे सादर केला आहे. याआराखड्यात जिल्हाभरातील १३ हजार ३१ विकासकामांचा समावेश करण्यात आला असून शिक्षण, ग्रामीण रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य, महिला व बालकल्याण, प्रशासकीय पायाभूत सुविधा बळकट करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्याबरोबरच स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळणार असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येच्या गरजा, दुष्काळी परिस्थिती आणि ग्रामीण भागातील अपुऱ्या पायाभूत सुविधांचा विचार करून हा आराखडा तयार करण्यात आला आहे. विशेषतः मागास व दुष्काळग्रस्त भागांना प्राधान्य देत विकासकामांचे नियोजन करण्यात आले असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित सुविधांवर भर देण्यात आला आहे.

शिक्षण विभागासाठी ४०६.९२ कोटींची तरतूद प्रस्तावित असून हा सर्वाधिक निधी असलेल्या विभागांपैकी एक आहे. या निधीतून ४,६५३ विकासकामे राबविण्याचे नियोजन आहे. शाळांची दुरुस्ती, नवीन वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, स्मार्ट क्लासरूम, संरक्षण भिंती आणि इतर शैक्षणिक सुविधा उभारण्यावर भर दिला जाणार आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे.

सामान्य प्रशासन विभागासाठी ४०६.८० कोटींचा प्रस्ताव देण्यात आला असून ३,५३१ कामांचा समावेश आहे. ग्रामपंचायत कार्यालयांच्या नवीन इमारती, विद्यमान इमारतींची दुरुस्ती, डिजिटल सेवा, संगणकीकरण आणि प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी हा निधी खर्च केला जाणार आहे.

ग्रामीण संपर्क व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी बांधकाम विभागासाठी ६३२.९३ कोटींची सर्वाधिक तरतूद करण्यात आली आहे. या विभागांतर्गत २,१७९ कामे प्रस्तावित असून ग्रामीण रस्ते, पूल, शासकीय इमारती आणि अन्य सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जाणार आहे. चांगल्या रस्त्यांमुळे गावागावांतील दळणवळण सुधारुन शेतीमालाची वाहतूक, उद्योग आणि व्यापारालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

लघुपाटबंधारे विभागासाठी १६१.८६ कोटी, महिला व बालकल्याण विभागासाठी ९९.८२ कोटी, आरोग्य विभागासाठी ४३.९६ कोटी आणि पशुसंवर्धन विभागासाठी १५.७८ कोटींच्या निधीची मागणी करण्यात आली आहे. पाणी साठवण क्षमता वाढविणे, अंगणवाडी सुविधा सक्षम करणे, ग्रामीण आरोग्य सेवा बळकट करणे आणि पशुपालकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे या कामांवर या निधीचा उपयोग होणार आहे.

# बहुप्रतिक्षेनंतर मंजुरी मिळालेल्या 'आयटी' पार्कसाठी नव्याने जागा शोध मोहीम

### जिल्हा प्रशासन लागले पुन्हा कामाला

### ८ दिवसात नवीन जागेचा प्रस्ताव देण्यात येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

'आय टी' पार्कबाबत जिल्हा प्रशासनाकडून होटगी रोडवरील ६८ एकर जागेची पाहणी करून आवश्यक तो प्रस्ताव अन् कागदपत्रांची प्रक्रियाही पार पडली होती. यानंतर सोलापूरच्या आयटी पार्कसाठी होटगी रोडवरील जलसंपदा विभागाची जागा देण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही याच जागेचा आग्रह धरला असला तरी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तज्ज्ञ आणि उद्योजकांच्या अहवालानंतरच जागेचा अंतिम निर्णय घेतला जाईल, असे एका बैठकीत स्पष्ट करत जागेबाबत फेर अभ्यासाची घोषणा केली आहे.



दरम्यान, आयटी पार्कसाठी आवश्यक त्या जागेचा नव्याने शोध घेण्यासाठी जिल्हा प्रशासन कामाला लागले असून, येत्या आठ दिवसांत या जागेचा प्रस्ताव पुन्हा पाठविणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळाली.

सोलापूरच्या प्रस्तावित माहिती तंत्रज्ञान (आयटी) पार्कच्या जागेवरून महायुतीमधील शिवसेना आणि भाजपमधील मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी होटगी रस्त्यावरील जागेचा आग्रह धरला असताना, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मात्र आयटी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि उद्योजकांच्या अभ्यासानंतरच जागेचा अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा केली. त्यामुळे या प्रकल्पाचे भवितव्य आता तज्ज्ञ समितीच्या हाती गेले आहे.

उद्योगमंत्री उदय सामंत नुकतेच सोलापूर दौऱ्यावर आले असता येथील शासकीय विश्राम गृहात उद्योजकांची बैठक घेतली. जिल्हा प्रशासनाने प्रस्तावित केलेली होटगी परिसरातील जागा आणि उद्योजकांनी सुचवलेली पर्यायी जागा या दोन्ही पर्यायांची तांत्रिक तपासणी केली जाईल, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील उद्योगाला चालना मिळावी यासाठी उद्योग विभागाच्या वतीने उद्योग स्नेही धोरण राबवण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व एमआयडीसीमध्ये उद्योजकांनी चांगले उद्योग उभा करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करावा यासाठी एमआयडीसीमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कटिबध्द आहे, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

जलसंपदा विभाग, महापालिका, प्रदूषण मंडळ, वनविभाग यांची जिल्हाधिकारी यांनी बैठक घेऊन कुंभारी-एमआयडीसी रस्त्याबाबतचा प्रश्न मार्गी लावावा, एमआयडीसीच्या जागेमध्ये भूखंड घेऊन जर कोणी उद्योग सुरू करत नसेल तर ते भूखंड त्यांच्याकडून काढून घ्यावेत, ड्रायपोर्टसाठी औद्योगिक वसाहतीमध्ये १०० एकर जागा देण्याची तयारी आहे. औद्योगिक वसाहतीला ५ एमएलडी पाणी देण्यात यावे, असेजही त्यांनी सांगितले.

**वाहतूक, पायाभूत सुविधा, उद्योगस्नेही वातावरण**

सोलापुरात आयटी तज्ज्ञ, प्रशासन आणि उद्योजकांची संयुक्त परिषद आयोजित केली जाईल. यात वाहतूक, पायाभूत सुविधा आणि उद्योगस्नेही वातावरण या निकषांवर मूल्यमापन करुन तज्ज्ञ ज्या जागेची शिफारस करतील, तिथेच आयटी पार्क साकारले जाईल, अशी ग्वाही ना.उदय सामंत यांनी दिली. यासंदर्भात आरडीसी अभिजित पाटील यांनी तहसीलदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि आयटी पार्कसाठी नव्याने जागा शोधण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**साखर कारखाना, विमानतळ, अपुरी जागा**

आयटी पार्कसाठी पाहिलेल्या पूर्वीच्या होटगी रोडवरील जागेजवळ सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना, विमानतळ आहे आणि जागाही अपुरी पडते अशी विविध कारणे काही उद्योजकांनी उद्योगमंत्र्यांसमोर मांडली होती. यामुळे त्या जागेचा प्रस्ताव रद्द होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# आईशक्ती फाउंडेशनतर्फे अनाथ मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जुलै-**

येथील आईशक्ती फाउंडेशनच्या वतीने सोलापूर शहरातील आई-वडील दोघेही नसलेल्या, आई किंवा वडील नसलेल्या २ हजार विद्यार्थिनींना निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

प्रारंभी व्याहाती होम करण्यात आला. व्यासपीठावर डॉ.अंबिका यावलकर, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, आईशक्ती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे, अध्यक्षा सृष्टी डांगरे उपस्थित होते.



निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाले, ज्यांना खऱ्या अर्थान आवश्यकता आहे अशांचा शोध घेऊन ती मदत पोहोचविण्याचे काम आईशक्ती फाउंडेशन करत आहे. जिल्हाभरातील गरजू विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक मदतीसह इतर उपक्रम राबवण्यासाठी शासनाची तसेच समाजातील विविध घटकांची सर्वतोपरी मदत करु.

डॉ.सूर्यप्रकाश कोठे, डॉ.अंबिका यावलकर यांनीही मनोगत व्यक्त केले. उज्ज्वला शिरुर यांनी सूत्रसंचालन केले. मीनल पिसे यांनी आभार मानले. यावेळी तेजश्री लकशेट्टी, लता गुंडला, तेजस्विनी मरीगुड्डी, सुनीता निलम, रोहिणी व्हनसुरे, मीनल पिसे, हेमा मुदगुंडी, प्रीती कुर्लेकर, लक्ष्मी कुर्लेकर, वासंती वाडी, प्रिती मलपेद्दी, मयुरीका चाटला, अलकनंदा बेत, ऐश्वर्या करंचकर, सूर्यकांत जिंदम, अविनाश शंकू, लक्ष्मीकांत येलदी, व्यंकटेश बंडा, उमेश चिट्याल आदी उपस्थित होते.

## महत्वाचे...



### नूमवि शिशु शाळेत पालक सभा उत्साहात

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

नूमवि अर्थात नूतन मराठी विद्यालयच्या शिशु शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची पहिली पालक सभा उत्साहात संपन्न झाली. प्रारंभी नाट्य कलाकार तथा दैनिक तरुण भारतच्या डिजिटल प्रमुख अश्विनी तडवळकर, शाळा समितीचे सदस्य सुरेश बाबू मंकणी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. अलका ओक यांनी ईशस्तवन सादर केले. मुख्याध्यापिका कुलकर्णी यांनी प्रास्ताविकातून शाळेचे नियम आणि उपक्रमसंदर्भात माहिती दिली. सायली देशमुख यांनी शाळेत इंग्रजी विषय कसा शिकवला जातो याबाबत प्रात्यक्षिक करून दाखवले. अलका ओक यांनी प्रार्थना, भजन, अभिनय गीत यांच्या चाली पालकांना सांगितल्या. अश्विनी तडवळकर यांनी शाळेच्या कामकाजाचे कौतुक केले. सूत्रसंचालन मृणाल देशपांडे यांनी केले.

### 'स्क्रीन टाईम कमी करा, करिअर फॉर द नेशनचा' विचार करा

**सोलापूर, दि. १३ जुलै-**

विद्यार्थ्यांनी 'स्क्रीन टाईम' कमी करून, योग्य संस्कार करून घेऊन 'करिअर फॉर द नेशन' याबद्दल विचार करून, समाज व देशाबद्दल कृतज्ञतेची भावना ठेवावी, असे आवाहन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री देवदत्त जोशी यांनी केले.राष्ट्रीय विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'राष्ट्रनिर्मितीसाठी युवकांची भूमिका' या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना जैन आचार्य परमपूज्य १०८ विद्यासागर महाराजांचा कार्याचा उल्लेख करून, स्वदेशी भाषांचा वापर, सुतकताई, 'इंडिया नही, भारत बोलो' या विचारांचा मागोवा घेऊन, वर्तमान पिढीने देशाच्या विकासामध्ये आपले योगदान देणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी नताशा कोतापल्ली यांनीही मनोगत व्यक्त केले. चेतन तुपकर यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी उपप्रचार्यद्वय डॉ.मनोहर जोशी, अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे आदी उपस्थित होते.



# कामगार मंत्र्यांच्या निषेधार्थ विडी कामगार हक्क समितीचे भीक मागो आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जुलै-**

राज्यातील विडी कामगारांना २३ जून रोजी मजुरी वाढीचा निर्णय जाहीर करणार, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी २ जून रोजीच्या बैठकीत जाहीर केले होते. परंतु २२ जूनपासून राज्याचे अधिवेशन सुरू झाले ते अधिवेशन १४ दिवस चालून १० जुलै रोजी समाप्त झाले. परंतु अधिवेशनात विडी कामगारांच्या किमान वेतन विषयी चर्चा देखील झाले नाही व किमान वेतन देखील कामगार मंत्र्यांनी जाहीर केले नाही, म्हणून कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या निषेधार्थ कामगार सेनेचे प्रदेश सचिव विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली साईबाबा चौकातील विजय नगर येथे भीक मांगो आंदोलन करण्यात आले.



कामगार सेनेचे प्रदेश सचिव विष्णू कारमपुरी याप्रसंगी बोलताना म्हणाले की, गेल्या १४ वर्षांपासून विडी कामगार महिलांच्या प्रश्नांकडे जाणूनबुजुन दुर्लक्ष केले जात आहे. आम्ही वरील चारही संघटनेच्यावतीने अनेक वेळा निवेदने दिले होते. मंत्रालयात व कामगार आयुक्त कार्यालय येथे बैठका झाल्या. २३ जून रोजी विडी कामगारांना आनंदाची बातमी देऊ, असे आश्वासन दिले होते. परंतु आजतागायत कामगारांच्या पदारत काहीही पडले नाही.

या आंदोलनात राष्ट्रवादी कामगार संघटनेचे अध्यक्ष डॉ.गोवर्धन सुंचू, नवमहाराष्ट्र कामगार संघटनेचे अध्यक्ष सायबण्णा तेगेळ्ळी, राष्ट्रीय मजदूर संघ इंटकचे राहुल गुजर यांच्यासह विडी कामगार महिला मोठ्या संख्येने सामील झाले होते.

# 'ते' सुपर पालकमंत्री; पालकमंत्र्यांचेही ऐकत नाहीत

### माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी लगावला टोला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जुलै-**

'ते' सुपर पालकमंत्री पालकमंत्र्यांचेही ऐकत नाहीत, असा टोला माजी गृहराज्यमंत्री तथा शिवसेनेचे नेते सिध्दाराम म्हेत्रे यांनी आमदान सचिन कल्याणशेट्टी यांचे नाव न घेता लगावला.



दरम्यान, 'सीएम' साहेबांचा फोन आला असे म्हणणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार आहे, असेही त्यांनी सांगितले. आपण केलेल्या तक्रारीनंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांना असे करु नका, असा सल्ला दिला होता. मात्र ते पालकमंत्र्यांचेही ऐकेनासे झाले आहेत. जिल्हा परिषदेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खरेच फोन करतात का? याची खात्री करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# मजरेवाडीतील नाल्याचे चुकीच्या पध्दतीने रेखांकन

### बाधितांनी घेतली सर्वोच्च न्यायालयात धाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जुलै-**

मजरेवाडी गावठाण गट क्रमांक ७६ येथे चुकीच्या पध्दतीने नाल्यांचे रेखांकन केले आहे. त्यामुळे येथे मागील शंभर वर्षांपासून शेती करणाऱ्यांचे नुकसान होत असल्याने बाधित मिळकतदार प्रा.पंडित भोपळे, निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त नेताजी भोपळे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

या परिसरामध्ये भोपळे यांची शंभर वर्षांपूर्वीपासूनची अंदाजे ९ एकर शेती आहे. याठिकाणी त्यांची २०० जनावरे आणि दुग्ध व्यवसाय आहे. प्रस्तावित रेखांकन हे टोपोशीटच्या आधारित केलेले असले तरी खासगी जागेतून असा नाला नेता येत नाही, असे भोपळे यांच्याकडून सांगण्यात आले.

पूर्वीचा पारंपारिक नाला मजरेवाडी गावठाणमधील मुलतानी बेकरीपासून ते श्री सदानंदी मंदिराजवळून जातो. सध्या केलेल्या रेखांकनामुळे पूर्वीचा मुख्य रस्त्यापासून ३०० मीटरवर असणारा नाला ७०० ते ८०० फूट फरक दाखवत आहे. त्यामुळे तज्ज्ञांकडून पुनररेखांकन करावे, असेही त्यांनी सांगितले.

# आंतरजिल्हा दुचाकी चोराला अटक, ६ लाख रुपये किंमतीच्या १४ दुचाकी जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जुलै-**

शहर गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने शहरासह लगतच्या जिल्ह्यांत धुमाकूळ घालणाऱ्या एका सराईत आंतरजिल्हा मोटारसायकल चोराला अटक करुन ६ लाख ५५ हजार रुपये किंमतीच्या एकूण १४ दुचाकी जप्त केले. सत्यवान रामहरी भोसले (वय-३२, रा.पडसाळी, ता.उत्तर सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे.




सोलापूर शहरात दुचाकीच्या वाढत्या चोरींच्या घटनांची गंभीर दखल घेत पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त डॉ.अश्विनी पाटील, सहायक पोलिस आयुक्त दिलीप पवार यांनी गुन्हे शाखेला कडक निर्देश दिले होते. त्यानुसार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर व त्यांच्या पथकाने शहर परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचे सखोल तांत्रिक विश्लेषण सुरू केले होते.

गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पोलिसांनी १२ जुलै रोजी हैदराबाद रोडवरील मार्केट यार्ड परिसरात सापळा रचला असता सत्यवान भोसले याला एका होंडा युनिकॉर्न मोटारसायकलसह ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपीने पोलिसांना दिशाभूल करणारी उत्तरे दिली, परंतु सखोल चौकशीअंती त्याने वसंत विहार परिसरातून मोटारसायकल चोरल्याची कबुली दिली सोलापूरसह धाराशिव, सातारा आणि कर्नाटक राज्यातून दुचाकी चोरल्याचे त्याने कबुली दिली. पोलिसांनी सोलापूर शहरातील ७, धाराशिव जिल्ह्यातील ५, सातारा जिल्ह्यातील १ आणि कर्नाटक राज्यातील १ असे एकूण १४ दुचाकी जप्त करुन त्याच्याविरुध्द एकूण १४ गुन्हे दाखल करण्यात आले.

पोलिस आयुक्त एम.राजकुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, प्रीतम यावलकर व सहायक आयुक्त दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखेचे वपोनि अरविंद माने, सपोनि शैलेश खेडकर यांच्या नेतृत्वाखालील विनोद रजपूत, इम्रान जमादार, उमेश पवार, रामा भिंगारे, सुरज पवार, विजयकुमार वाळके, महेश रोकडे, शैलेश बुगड, महेश शिंदे, युवराज गायकवाड, बाळासाहेब काळे, सतीश काटे, मच्छिंद्र राठोड व प्रकाश गायकवाड यांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बाबासाहेब पाटील यांचे हस्ते महावितरणच्या विविध विकासकामांचे लोकार्पण

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १३ जुलै : सौर ऊर्जेच्या माध्यमातून विज निर्मिती करावी व सर्वांनीच सौर उर्जेला प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

अहमदपूर येथे महावितरण कार्यालयामार्फत दहा एमव्हीए ट्रान्सफरचा तसेच जिल्हा वार्षिक योजनेच्या योजनेतून चार कोटी रुपयांच्या महावितरणच्या विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधीक्षक अभियंता अरविंद बुलबुले हे होते.

यावेळी व्यासपीठावर अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील, अहमदपूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष अय्याज शेख, शिवाजीराव देशमुख, तुकाराम पाटील विठ्ठल बोडके, अशोक केंद्रे,अझहर बागवान, अश्विन नागराळे, प्रफुल्ल गुंडरे, मुजीब पटेल, हुसेन मणियार आशिष तोगरे,अमित रेड्डी, युसुफ सय्यद, जावेद बागवान, मुजमील सय्यद, हुसेन मणियार, सद्दाम शेख, किरण बारमाळे, अफरोज शेख, प्रदीप कांबळे, सुधीर गुट्टे सुप्रिया भालेराव,गंगाधर ताडमे महेश हंबीर,राजकुमार शिंदे बाळासाहेब बेडदे, अशोक सोनकांबळे,नरसिंग जगताप, चंद्रकांत गंगथडे, प्रवीण रेड्डी सह विविध मान्यवर उपस्थित होते.



## विविध वृत्त....

### पीक स्पर्धेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देवून गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी विहित मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन कृषि विभागाने केले आहे. कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२६ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, सोयाबीन, भुईमुग, सूर्यफुल या पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आ-हे. खरीप पीक स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची मूग व उडीद पिकांसाठी अंतिम मुदत ३१ जुलै पर्यंत आहे.

## खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी घेतली पालकमंत्र्यांची भेट

### लातूर जिल्ह्याच्या तीन महत्त्वाच्या प्रश्नांकडे वेधले लक्ष

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जुलै : लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव बंडप्पा काळगे यांनी शनिवार, दि.११ जुलै २०२६ रोजी उशिरा रात्री लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची लातूर येथील शासकीय विश्राम गृहात भेट घेऊन लातूर जिल्ह्याशी निगडित तीन अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी संबंधित विषयांबाबत स्वतंत्र निवेदने पालकमंत्र्यांना सादर केली.



खा. डॉ. काळगे यांनी लातूर शहरातील वाढती वीज मागणी लक्षात घेता शहरात नवीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची योग्य जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. नवीन उपकेंद्र उभारल्यास लातूर शहरातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच, चालू खरीप हंगामात लातूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकासाठी वापरलेल्या बियाण्यांची उगवण अत्यल्प झाल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्याने निकृष्ट अथवा बोगस बियाण्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार मदत व नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणीही त्यांनी पालकमंत्र्यांकडे केली. याचबरोबर, लातूर जिल्ह्यात विविध भागांमध्ये पिकांवर शंखी गोगलगायींचा वाढता प्रादुर्भाव झाल्यामुळे कोवळ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे निदर्शनास आणून देत कृषी विभागामार्फत तातडीने क्षेत्रीय पाहणी, शास्त्रशुद्ध नियंत्रण उपाययोजना, आवश्यक औषधांचा पुरवठा, जनजागृती आणि शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची मागणीही खा. डॉ. काळगे यांनी केली. सदर विषयांची दखल घेत पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

जिल्ह्याच्या विकासाशी आणि शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित या विषयांवर प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा खा. डॉ. काळगे यांनी पालकमंत्र्यांच्या भेटीनंतर व्यक्त केली आहे.

## शंखी गोगल गायीचा प्रादुर्भाव रोखा : माजी आ. धिरज देशमुख



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : लातुरसह मराठवाड्यातील अनेक भागात शंखी गोगलगाय आणि पैसा आळीचा प्रादुर्भाव आतापासूनच दिसून येत असून ते कोवळे सोयाबीन फस्त करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरत आहे. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सरकारकडे केली आहे.

महाराष्ट्रात काही भागात सतत पाऊस पडत असला तरी मराठवाड्याकडे पावसाने पाठ

फिरवली आहे. त्यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहेत. कमी पाऊस असतानाही अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची जोखीम उचलली. लातुरमध्ये आजवर साधारण ३५ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. पावसाअभावी

अनेकांना अद्याप पेरणी करता आली नाही. ज्या भागात पेरणी झाली त्या भागात शंखी गोगलगायीने डोके वर काढले आहे. या संदर्भात शेतकऱ्यांमधून आलेल्या तक्रारींची त्वरित दखल घेऊन माजी आमदार

धिरज विलासराव देशमुख यांनी सरकारचे लक्ष वेधले आहे.

मराठवाड्यातील आमचा बळीराजा आधीच पावसाच्या लहरीपणामुळे आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे प्रचंड चिंतेत आहे. निसर्गाची साथ नसतानाही अनेक शेतकऱ्यांनी पदरचे पैसे लावून, कर्ज काढून पेरणीची मोठी जोखीम उचलली. त्यातच आता या नव्या अस्मानी संकटाने अनेक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आ-

हे. लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात सध्या शंखी गोगलगाय आणि पैसा अळीचा भयंकर प्रादुर्भाव झाला आहे. ते कोवळे सोयाबीन आणि इतर पिके फस्त करत आहे.

## गुणांना सलाम... गरजूंना आधार!

### जंगम समाजाच्या १६८ गुणवंतांचा गौरव; ८७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप



> महाराष्ट्रात जंगम समाजाचा अभिनव उपक्रम
> 'शिक्षणासाठी हातभार' या संकल्पनेला मिळाला समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद महाराष्ट्रात प्रथमच जंगम समाजामध्ये संघटित पद्धतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या योजनेची *आर्थिक संकल्पना*- इंजि. नागेश अशोक स्वामी,(शासकीय कंत्राटदार) इंजि. सुहास स्वामी आणि डॉ. सचिन बालकुंदे यांनी तयार करून शिक्षणासाठी समाजाने पुढाकार घेण्याचा नवा आदर्श निर्माण केला.

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : लातूर जिल्हा जंगम समाज प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव व स्कॉलरशिप वितरण सोहळा-२०२६ रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दहावी, बारावी, पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी, वैद्यकीय, यूपीएससी, एमपीएससी तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या १६८ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच समाजातील ८७ गरजू विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय स्वामी (चाकूर) होते, तर स्वागताध्यक्ष म्हणून इंजि. नागेश अशोक स्वामी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार प्रवीण स्वामी (उमरगा), श्री श्री १०८ काशीनाथ स्वामी शिवाचार्य महाराज (बापू)-पाथरी मठ तसेच धानेश स्वामी (खएड अधिकारी) यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. शिक्षण, स्पर्धा परीक्षा, समाजसेवा आणि उच्च शिक्षणात यशस्वी होण्यासाठी जिद्द, सातत्य, परिश्रम व गुणवत्तेचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.

कार्यक्रमास सुभाष (भीमाशंकर) स्वामी देवणीकर, विश्र्वनाथ सावळे, इंजि.सोमनाथ बालकुंदे, षण्मुखानंद मठपती, सूर्यकांत पत्रे, शिवलिंगण्णा मठपती यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारंभ यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. संजय स्वामी, उपाध्यक्ष इंजि. सुहास स्वामी, सौ. जयश्री दयानंद स्वामी, सचिव मनमथ स्वामी, कोषाध्यक्ष डॉ. सचिन बालकुंदे, स्वागताध्यक्ष -इंजि. नागेश अशोक स्वामी(शासकीय कंत्राटदार)

व्यासपीठ प्रमुख दयानंद कोंकलगे, महिला कार्याध्यक्ष ज्योती स्वामी, युवासंपर्क प्रमुख महेश सुगावे, दीपक मठपती तसेच प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास जंगम समाजातील नागरिक, पालक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या उपक्रमातून ८७ आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, तर १६८ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

शिष्यवृत्तीसाठी पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांची निवड सावळे, डॉ. बालकुंदे, निळकंठ(भाऊ) बंडू स्वामी, दयानंद स्वामी (उजेडकर) आणि कार्तिक स्वामी (सलगरा) यांच्या समितीने पारदर्शक पद्धतीने केली. उत्कृष्ट कार्याबद्दल समिती सदस्यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. हा उपक्रम समाजातील शैक्षणिक चळवळीला नवी दिशा देणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## पशुधनाचा चारा महागला



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : जुलै महिन्याच्या पहिला फारकता उलटला तरी पावसाने दडी मारलयाने शेतक-यांसह आता पशुपालकांचीही चिंता वाढली आ है. पावसाअभावी पेरण्या रखडल्याने जनावरांच्या चाऱ्याचे नियोजन पूर्णपणे बिघडले आहे. हिरव्या चाऱ्याचे टंचाई निर्माण झाली आहे बजारात चाऱ्याचे दर गगनाला भिडल्याने पशुधन जगवायचे कसे, हा मोठा प्रश्न पशुपालकांसमोर उभा आहे. शहरातील गुळ मार्केट परिसरात कडबा बाजारात शनिवारी मोठया प्रमाणात कडब्याची आवक झाली. मात्र चारा महागल्याने पशुपालकांच्या खिशला ताण बसत आहे

## प्रभाग ५ मध्ये सार्वजनिक सभागृहासाठी जागेची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : खुब्बानगर, शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील गौसपूरा गल्ली नं. १ ते ६, उटगेनगर, श्रीकृष्णनगर, कोल्हेनगर, सिद्धेश्र्वरनगर, मंठाळेनगरमधील नागरिकांसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमासाठी हक्काचे सार्वजनिक सभागृह उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

को-ऑप. ऑईल इंडस्ट्रिजमधील सर्वे नंबर १४२/ब मधील शिल्लक जागेपैकी १८ गुंठे जागा गेल्या अनेक दिवसांपसून पडीक आ-हे. ती जागा सार्वजनिक सभागृहासाठी देण्यात यावी, या मागणीचे निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना शेख अब्दुल्ला रहीम, जय भीमराव ढगे, अशपाक चौधरी, युसुफ बाटलीवाला, इसरार खान पठाण, शामसिंग मंगलसिंग जुनी, अजीम शेख, इब्राहिम शेख, जाकीर शेख, दस्तगीर सय्यद, अकबर शेख, जुनेद शेख, सुमित कांबळे, यशपाल कांबळे, इब्राहिम मनियार, शकील कुरेशी, प्रभाकर गुमटे, सादिक कुरेशी, नितीन चव्हाण यांनी दिले.

## गांधी चौक कचऱ्याच्या विळख्यात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १३ जुलै : शहरातील महात्मा गांधी चौकात छोट्या-छोट्या व्यवसायांपासून ते मोठे हॉटेलसचाही व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर आदी ठिकाणाहून दररोज पहाटे खाजगी ट्रॅव्हलस महात्मा गांधी चौकात येऊन थांबतात. मोठ्या प्रमाणात प्रवासी याच चौकात उतरतात. या प्रवाश्यांच्या चहा, नाष्ट्याची सोय व्हावी, म्हणून पहाटे या चौकात चहा, पोहे, इडली, वडा-सांबर विकणारे हातगाडे मोठ्या प्रमाणात थांबतात. प्रवासी चहा, नाष्टा करुन निघून जातात. व्यवसायिकही आपला व्यवसाय करुन निघून जातात. खरकटे, प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, कागदी प्लेटचा कचरा मात्र चौकातच पडून असतो. घंटागाडीवाले हा कचरा उचलत नाहीत. त्यामुळे या चौकात कचराच कचरा पडून आहे.

## महाडीबीटी पोर्टलवर 'तूर मिनीकीट'साठी अर्ज प्रक्रिया सुरू

### लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१३ जुलै : केंद्र व राज्य शासनाच्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना प्रमाणित तूर मिनीकीटचे (बियाणे संच) वाटप करण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यासाठी प्राप्त एकूण ७ हजार मिनीकीटच्या भौतिक लक्षांकापैकी आजतागायत ३ हजार ८३५ मिनीकीटचे वितरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. उर्वरित ३ हजार १६५ तूर मिनीकीटसाठी अद्याप पुरेसे अर्ज प्राप्त न झाल्यामुळे त्यांचे वितरण प्रलंबित राहिले आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी तातडीने ऑनलाइन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत बियाणे संच वितरण करण्याची ही प्रक्रिया पूर्णपणे महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे, लाभार्थ्यांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाणार आहे आणि यासाठी १० एप्रिल २०२६ पासूनच महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा खुली करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अर्ज करणे सोपे जावे, यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शक टप्पे जाहीर केले असून, इच्छुकांनी सर्वप्रथम ारहरवलीं.ारहरीरिहींीर.र्सीं.ळप/ऋीाशी या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन लॉगिन करावे, त्यानंतर 'अर्ज सादर करणे' या पर्यायावर क्लिक करून मुख्य घटकांमधील 'बियाणे वितरण, प्रात्याक्षिक, फ्लेक्झी घटक, औषधे आणि खते' हा पर्याय निवडावा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या उप-घटकांमधून 'बियाणे संच - तूर मिनीकीट' हा पर्याय निवडून आपला अर्ज सादर करावा, जेणेकरून शिल्लक राहिलेल्या बियाणेसंचाचा लाभ घेऊन शेतकऱ्यांना आपले उत्पादन वाढवता येईल.

## एस.आय.आर. अभियानात प्रत्येक पात्र मतदाराचा सहभाग महत्त्वाचा

### प्रभाग १५ मध्ये बीएलओ व बूथ प्रमुखांची बैठक, जनजागरण रथाचे उद्घाटन




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १३ जुलै : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एस.आय. आर.) अभियानाच्या पार्श्र्वभूमीवर प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक प्रवीण कस्तुरे व पुनीत पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात सर्व बीएलओ, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या महत्त्वपूर्ण अभियानात कोणताही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी नियोजनबद्ध जनजागृती करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

बैठकीत एस.आय.आर. अभियानाची उद्दिष्टे, मतदार नोंदणीची प्रक्रिया, नावातील दुरुस्ती, पत्ता बदल, नवमतदारांची नोंदणी, मृत व स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे, आवश्यक कागदपत्रे तसेच बूथनिहाय नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक बीएलओ व बूथ प्रमुखाने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घराशी संपर्क साधून नागरिकांना मतदार यादी पुनरीक्षणाबाबत जागृत करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी एस.आय.आर. अभियानाच्या व्यापक जनजागृतीसाठी सज्ज करण्यात आलेल्या जनजागरण रथाचे उद्घाटन जिल्हा अध्यक्ष .अजित पाटील कव्हेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा रथ प्रभागातील सर्व भागांमध्ये फिरून नागरिकांना मतदार यादी पुनरीक्षणाचे महत्त्व, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि नागरिकांनी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती देणार आहे. या माध्यमातून प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून मतदार यादी अधिक अचूक व परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

यावेळी नगरसेवक प्रवीण कस्तुरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, लोकशाहीची खरी ताकद मतदारामध्ये आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. एस.आय.आर. अभियान हे केवळ प्रशासकीय काम नसून लोकशाही अधिक सक्षम करण्याचे अभियान आहे. प्रत्येक बीएलओ, बूथ प्रमुख आणि कार्यकर्त्याने नागरिकांपर्यंत जाऊन त्यांना या प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे.

नगरसेवक पुनीत पाटील यांनीही प्रभागातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करून एस.आय. आर. अभियान शंभर टक्के यशस्वी करण्याचे आवाहन केले. प्रत्येक बूथवर प्रभावी जनसंपर्क, घरभेटी आणि जनजागृतीच्या माध्यमातून मतदार नोंदणीचे काम वेगाने पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास नगरसेवक ड. प्रदीप मोरे, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री संजय गिर, मंडळाचे पालक तुकाराम गोरे, मंडळाध्यक्ष रोहित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रभागातील प्रतिष्ठित नागरिक, बीएलओ, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने मतदार उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी उपस्थित सर्वांनी एस.आय.आर. अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचा संकल्प व्यक्त केला. आगामी काळात जनजागरण रथाच्या माध्यमातून संपूर्ण प्रभागात व्यापक जनसंपर्क मोहीम राबवून प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार नोंदणी व आवश्यक दुरुस्ती करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## संक्षिप्त...

## मोईज सितारी यांचा 'स्वाभिमान लेखणी' पुरस्काराने गौरव




तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १३ जुलै : जनहिताच्या प्रश्नांवर निर्भीड, वस्तुनिष्ठ आणि सातत्यपूर्ण वृत्तांकन करणारे साप्ताहिक जनता एक्सप्रेस चे संपादक तथा पत्रकार मोईज जमिरोद्दीन सितारी यांना पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'स्वाभिमान लेखणी' पुरस्काराने रविवारी (१२ जुलै) मुंबई येथे सन्मानित करण्यात आले. आर्यारवी एंटरटेनमेंट यांच्या वतीने आयोजित 'पहिला पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य, समाजवसेवक पुरस्कार सोहळा-२०२६' या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर हॉल दादर येथे झालेल्या या सोहळ्यात आयोजक, लेखक, अभिनेते, दिग्दर्शक व पत्रकार महेश्र्वर भिकाजी तेटांबे यांच्या हस्ते मोईज सितारी यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी श्रीधर कीर, विसुभाऊ बापट, अरुण म्हात्रे, पंढरीनाथ तामोरे, गुरुनाथ तिरपनकर, सुनील शिर्के, वैभव कदम, कृष्णा काजरोळकर, ड. गौरव पाटील आणि अतुल तोडकरी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पत्रकारितेत निर्भीड, निष्पक्ष आणि जनहिताच्या प्रश्र्नांवर सातत्याने प्रभावी वृत्तांकन केल्याबद्दल मोईज सितारी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. डिजिटल माध्यमाच्या प्रभावी वापरातून सामाजिक, प्रशासकीय आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्र्नांना सातत्याने वाचा फोडत त्यांनी विश्र्वासार्ह पत्रकार म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. साप्ताहिक जनता एक्सप्रेस या आणि युट्यूब चॅनेलच्या माध्यमातून ते विविध लोकहिताच्या प्रश्र्नांवर सातत्याने वृत्तांकन करत असून, त्यांच्या बातम्यांची दखल प्रशासनासह समाजातील विविध स्तरांवर घेतली जाते. यापूर्वीही त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाची दखल घेत विविध प्रतिष्ठित संस्थांकडून त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. 'स्वाभिमान लेखणी' पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याला आणखी एक मानाचा सन्मान लाभला असून, लातूर पत्रकारितेच्या शिरपेचातही मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल पत्रकार, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# कासार शिरसीत जलजीवन मिशनचा बट्ट्याबोळ

## जिल्हा परिषद सदस्यांनी आवाज उठवताच प्रशासन खडबडून जागे

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १३ जुलै : निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथे जलजीवन मिशनच्या कामाचा बट्ट्याबोळ झाला असुन काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. याचा आवाज स्थायी समिती मध्ये उमेश उमापुरे यांनी उठवताच प्रशासन खडबडून जागे होत आज उप अभियंता सह शाखा अभियंता यांनी जलजीवन च्या कामाला भेट दिली



कासार शिरसी हे गाव कर्नाटक सिमेवरील मोठे गाव असून या गावात मोठी ग्रामपंचायत सुद्धा आहे, वाढती लोकसंख्या विचारात घेता वद येथील वाढणारी वर्दळ लक्षात घेता या गावाला चाळीस पन्नास वर्षांपूर्वी केलेल्या जलकुंभाचा व पाणीपुरवठा कमी पडत होता. माझी मुख्यमंत्री स्वर्गीय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या दुरदृष्टीतुन तयार करण्यात आलेल्या बडुर मध्यम प्रकल्पात भरपुर पाणी साठा असुन हि या वाढत्या लोकसंख्येमुळे पाणी अपुरे पडत होते, सध्याच्या शासन धोरणामुळे हर घर नल हर जल इसवी सन २०२२ मध्ये जलजीवन मिशनच्या योजनेच्या अंतर्गत सुमारे दहा कोटी पेक्षा जास्त रक्कम मंजूर झाली. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होऊन तीन वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला पण आज हि गावाला पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसल्याने गावातील नागरीकांमध्ये ओरड निर्माण झाली होती याची दखल घेत जिल्हा परिषद सदस्य उमेश उमापुरे यांनी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये जोरदार मुद्दा मांडला व पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार केली या अनुषंगाने आज गावात जिल्हा परिषद उप अभियंता श्री पाथरकर व शाखा अभियंता पाटील यांनी जलजीवन मिशनच्या कामाची पाहणी जिल्हा परिषद सदस्य यांच्या सोबत केली यात कुचकामी पाइपलाइन मुळे अनेक ठिकाणी पाणी पाईप फुटुन पाणी वाहात असल्याचे दिसुन आले, तर तर पाणीपुरवठा करण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पॅच न मारताच उघडे पडुन मोठ मोठे खड्डे पडलेले दिसून आलें एवढेच नव्हे तर काही नळाला योजना सुरू झाल्यापासून पाणीच आले नाही व तर अद्याप शंभर पेक्षा अधिक जणांना नळ जोडणी सुध्दा नाही, या योजनेची शोकांतिका म्हणजे शुद्ध पाणी पुरवठा म्हणून ज्या ठिकाणी पाणी फिल्टर केले जाते तेथे हि पाणी गढुळ आढळुन आले तर नळाला येणारे पाणी सुध्दा गढुळ आले जे पिण्या योग्य नाही या सर्व कामाबाबत जिल्हा परिषद सदस्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरताच भंबेरी उडाली तर अधिकाऱ्यांनी येत्या पंधरा दिवसांत हि सर्व कामे व पाणीपुरवठा व्यवस्थित करुन घेऊ असे सांगितले

पण या योजनेचा मात्र कासार शिरसीत मात्र बट्ट्याबोळ झाला असुन जिल्हा परिषद सदस्य उमेश उमापुरे यांच्यामुळे यातील गौडबंगाल बाहेर निघाले यावेळी जिल्हा परिषद सदस्य उमेश उमापुरे यांच्या सह माजी सरपंच तथा सदस्य बडेसाब लकडहारे, पृथ्वीराज सरवदे, सह गावातील नागरिक उपस्थित होते

## विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट टेक्नॉलॉजीमध्ये बीसीए स्क्रुटिनी सेंटर कार्यरत

तभा वृत्तसेवा

औसा दि.१३ जुलै : विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी बीसीए प्रवेशासाठी अधिकृत स्क्रुटिनी सेंटर कार्यरत करण्यात आले आहे.तसेच महाविद्यालयात बीसीए प्रवेश प्रक्रियेलाही सुरुवात झाली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष मार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत या केंद्रावर विद्यार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रांची छाननी, अर्जातील त्रुटींची पूर्तता तसेच प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व प्रकारचे मार्गदर्शन विनामूल्य उपलब्ध करून दिले जात आहे. बीसीए प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणीची अंतिम तारीख १६ जुलै २०२६ असल्याने पात्र विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाविद्यालयातील बीसीए अभ्यासक्रमासाठी बारावी कला, वाणिज्य किंवा विज्ञान शाखा उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास पात्र आहेत. तसेच एमएचटी-सीईटी नॉन-झिरो स्कोअर (पीसीबी / पीसीम ) किंवा एमएएच-बीसीए सीईटीमध्ये नॉन-झिरो स्कोअर मिळविलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशासाठी पात्रता आहे. त्यामुळे कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांतील विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर घडविण्याची उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. महाविद्यालयात मुलींसाठी शासनाच्या धोरणानुसार मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध असून, पात्र विद्यार्थ्यांना राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांचाही लाभ मिळणार आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सुलभ पद्धतीने उच्च शिक्षण घेण्याची उत्तम संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी श्री विश्र्वेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळ, आलमला संस्थेने लातूर शहरातील शिवकमल सिल्व्हर आर्च, नांदी स्टॉप येथे स्वतंत्र प्रवेश मार्गदर्शन व स्क्रुटिनी सहाय्य कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयात ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्रांची पडताळणी, स्कॅनिंग व अपलोडिंग, प्रवेशासंबंधी मार्गदर्शन, समुपदेशन तसेच विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी अनुभवी कर्मचारी उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्रामीण भागासह लातूर शहरातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सुलभ व वेळेत पूर्ण करता येणार आहे.

### मागण्यांबाबत तातडीने कार्यवाही व्हावी । अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा

## रेणापूर तालुका काँग्रेसच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. १३ जुलै : रेणापूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्र्नांसंदर्भात रेणापूरचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द कराव्यात तसेच रेणापूर तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना पीकविमा मिळावा या प्रमुख मागण्यांसह विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना सुपूर्द करण्यात आले.

टीईटी व नीट पेपरफुटी प्रकरणातील दोषर्षीवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच तहसीलदार रेशन योजनेतील त्रुटी दूर करून शेतकरी यादीतील अपात्र लाभार्थी वगळण्यात यावेत, तहसील कार्यालय परिसरात नागरिकांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह उभारावे तसेच विविध विभागांत सामान्य नागरिकांची होत असलेली आर्थिक पिळवणूक तात्काळ थांबवावी, संजय गांधी निराधार योजनेचे प्रलंबित अनुदान, गाय गोठे, विहीर व घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे हप्ते तातडीने त्यांच्या खात्यात जमा करावेत आणि या योजनांमधील आर्थिक गैरप्रकारांना आळा घालावा, पर्यायी व्यवस्थेवर सुरू असलेली रेशन दुकाने महिला बचत गटांना देण्यात यावीत तसेच गटविकास अधिकारी यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक करावे, अशीही मागणी करण्यात आली.




याशिवाय कृषी सहाय्यकांनी गावागावांत शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत, प्रलंबित स्मशानभूमीचे प्रश्र्न सोडवून आवश्यक ठिकाणी जागा उपलब्ध करून द्यावी, जिल्हा परिषद शाळांना मूलभूत सुविधा पुरवाव्यात, तालुक्यातील अवैध दारूविक्री बंद करावी तसेच गावनकाशावरील शेतरस्ते व पांदण रस्ते सर्व शेतकऱ्यांच्या सहमतीने तातडीने विकसित करावेत, घनसरगाव ते टाकळगाव (ग्रामीण मार्ग क्र. १११) हा निकृष्ट दर्जाचा झालेल्या रस्त्याच्या कामाची चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी तसेच संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे. घनसरगाव फाटा ते घनसरगाव या रस्त्याच्या कामाचीही चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या सर्व मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रेणापूर तालुका काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

या निवेदनावर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे, शहराध्यक्ष नितीन मोटेगावकर, प्रदिप राठोड, डॉ. उमाकांत देशमुख, गोविंद पवार, प्रदिप काळे, केशव माने, सचिन इगे, विलास राठोड, केदार हलकुडे, पाशामियाँ शेख, जीवन पाटील, वैजनाथ भुजबळ, ॲड. मुरलीधर पडूळे, ॲड. राज मस्के, नामदेव देशमुख, अनंत पाटील, अंगद माने, दिनेश पाटील आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महाराष्ट्र महाविद्यालयास शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात 'ओ' ग्रेड



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १३ जुलै : येथील महाराष्ट्र महाविद्यालयास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामार्फत राबवण्यात आलेल्या शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षण (---) प्रक्रियेत 'O' ग्रेड (उत्कृष्ट) प्राप्त झाला आहे. या अंकेक्षणात महाविद्यालयास ८०० पैकी ७७० गुण मिळाले असून ९६.२५% गुण प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र महाविद्यालयाने शै.वर्ष २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षात राबवलेल्या विविध शैक्षणिक, शिक्षणेत्तर, सामाजिक, संशोधनपर व सांस्कृतिक उपक्रमांचे मुल्यमापन विद्यापीठाच्या तज्ञ समितीने केले व त्याद्वारे हा ग्रेड प्रदान करण्यात आला. सदरील अंकेक्षण महाविद्यालयांच्या गुणवत्ता सुधार योजनेचा एक भाग असून विद्यापीठ परिक्षेत्रातील मोजक्याच महाविद्यालयांना 'O' ग्रेड मिळवण्यात यश आले आहे. या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी कौतुक केले आहे. महाविद्यालयाचे प्राचाय डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, समिती समन्वयक डॉ. नरेश पिनमकर, सदस्य .दत्ता माने, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे तसेच विद्यार्थ्यांचे या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले.

# शेतकऱ्याचे लक्ष आता आभाळाकडे

## पावसाअभावी शेतकऱ्यांची वाढली चिंता

तभा वृत्तसेवा

देवणी दि. १३ जुलै : देवणी तालुक्यात झालेल्या खरीप पिकांच्या पेरणीनंतर अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रारंभी झालेल्या पावसामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी मूग, उडीद आणि मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची पेरणी केली होती. पेरणीनंतर पिकांची उगवणही चांगल्या प्रकारे झाली तर काही शेतक-यांची उगवणही झालेली नाही मात्र पेरणी नंतर एकदाही दमदार पाऊस न झाल्याने पिकांचे भविष्य धोक्यात आले आहे.



शेतीची मशागत, बियाणे आणि खतांच्या खरेदीसाठी हजारो रुपयांचा खर्च करून शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे. मात्र पावसाने पुन्हा पाठ फिरवल्याने उगवलेली पिके पुढील पाऊस येईपर्यंत तग धरू शकतील का, पाऊस नेमका कधी पडेल, अशा प्रश्र्नांनी शेतकरी हवालदिल झाले आहेत. वेळेत पाऊस न झाल्यास पिके करपण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यातच आणखी एक संकट शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. उगवून आलेल्या पिकांवर हरणांचे मोठ्या प्रमाणात हल्ले होत असून ते पिकांचे नुकसान करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसभर शेतात थांबून पिकांचे संरक्षण करावे लागत आहे. पावसाअभावी चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांच्या उपद्रवाचाही सामना करावा लागत असल्याने त्यांची अडचण अधिकच वाढली आहे.

परिसरातील प्रगतशील शेतकरी ज्ञानेश्र्वर कारभारी हेही आपल्या पिकांचे हरणांपासून संरक्षण करण्यासाठी दिवसभर शेतात पहारा देत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

देवणी तालुक्यातील शेतकऱ्यांचे संपूर्ण लक्ष आता आकाशाकडे लागले असून, लवकरात लवकर समाधानकारक पाऊस झाल्यासच खरीप हंगाम वाचण्याची आशा व्यक्त केली जात आहे.पाऊस नाही झाल्यास दुबार पेरणी करावी लागेल. दुबार पेरणी झाल्यास शेतकरी मेल्याशिवाय रहात नाही.

## येरोळ आरोग्य केंद्रातील साह्यक परिचारिका, प्रसुती सेविका यांची पदे तात्काळ भरा तुळसाबाई लोंढे यांची मागणी




तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १३ जुलै : तालुक्यातील येरोळ प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत सहाय्यक परिचारिका व प्रसूती सेविका यांची पदे रिक्त असल्याने आरोग्य सेवांवर परिणाम होत आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषद सदस्या सौ. तुळसाबाई जगदीप लोंढे यांनी जिल्हा आरोग्य सभापती ज्ञानेश्वर बिराजदार यांच्या कडे तात्काळ भरती करण्याची मागणी केली आहे.

येरोळ प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत अनेक गावांची आरोग्य सेवा चालते. प्रसुती सेविका पदे रिक्त असल्याने गरोदर मातांची तपासणी, लसीकरण, घरभेटी आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम रखडले आहेत. पावसाळ्यात साथीचे आजार वाढण्याची शक्यता असल्याने मनुष्यबळाची कमतरता मोठी अडचण ठरत आहे.

जि.प. सदस्या सौ. तुळसाबाई लोंढे म्हणाल्या, येरोळ केंद्र हे परिसरातील महिलांसाठी आधार आहे.प्रसुती सेविका नसल्याने प्रसूतीच्या वेळी महिलांना लातूरला धावावे लागत आहे. शासनाने तातडीने भरती करून ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुरळीत करावी.

स्थानीय नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. डॉक्टर आहेत पण नर्स नाही. त्यामुळे वेळेवर उपचार मिळत नाहीत अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली.

जिल्हा परिषद प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन येरोळ प्राथमिक आरोग्य केंद्रामधील रिक्त पदे भरावीत अशी मागणी जोर धरत आहे.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणा विरोधात निलंगा येथे ३० जुलै रोजी महामोर्चा

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १३ जुलै : अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, निलंगा यांच्या वतीने शासकीय विश्रामगृह, निलंगा येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत उपवर्गीकरणाच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली तसेच ३० जुलै रोजी निलंगा येथे होणारा तालुकास्तरीय महामोर्चा अभूतपूर्व करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.




बैठकीत उपस्थित विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींनी अनुसूचित जातींच्या घटनात्मक अधिकारांवर कोणताही आघात सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींच्या एकात्मतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत, संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना धक्का पोहोचेल, अशी भूमिका मांडण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने उपवर्गीकरणाचा निर्णय तत्काळ रद्द करून राज्यात सामाजिक सलोखा अबाधित ठेवावे या आंबेडकर वादी जनतेच्या भावनेकडे दुर्लक्ष केले तर सरकारला दूरगामी परिणाम भोगावे लागतील यासाठी समस्त आंबेडकरी जनता या विचारांच्या विरोधात रस्त्यावर येऊन तीव्र स्वरूपात आंदोलन करुन राज्य सरकारला सळो की,पळो केल्याशिवास स्वस्त बसणार नाहीत दोन्ही समाजात जातीय तेढ निर्माण करून राज्य सरकार काय साध्य करणार असा सूरही या बैठकीत काढण्यात आला. याबाबत राज्यसरकार मार्फत वर्गीकरणाबाबत झालेला संभ्रम दूर करावा.या प्रमुख मागणीसाठी निलंगा येथील.समस्त आंबेडकरवादी पक्ष, संघटना, संस्था तसेच निलंगा येथील चांभार,मातंग,ढोर,मुस्लीम.,धनगर,ओबीसी समाजातील प्रतिनिधी उपस्थित राहून मोर्चास पाठिंबा दिला.

मोर्चाच्या तयारीसाठी तालुक्यात जाहीर बैठकीचे आयोजन करण्याचे आवाहनही करण्यात आले.

बैठकीत निलंगा शहर व तालुक्यातील प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने मोर्चास महिला, युवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी निलंग्याच्या महामोर्चात सहभागी व्हावे, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक भागातून वाहनांची व्यवस्था करून हजारोंच्या संख्येने नागरिकांना मोर्चात सहभागी करण्यासाठी नियोजन आखण्यात आले.

उपस्थितांनी संविधान, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या मूल्यांच्या संरक्षणासाठी लोकशाही व संविधानिक मार्गाने संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. शासनाने समाजात मतभेद निर्माण करणाऱ्या निर्णयांऐवजी विश्र्वास, संवाद आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारी भूमिका स्वीकारावी, अशी अपेक्षाही बैठकीत व्यक्त करण्यात आली.

सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी विलास सूर्यवंशी हे होते यावेळी रजनीकांत कांबळे,अंकुश ढेरे, प्रा. रोहित बनसोडे, दाजीबा कांबळे, अर्जुनाप्पा कटके (ढोर समाज), देविदास धैर्य ,खाटिक समाजाच्या वतीने डॉ. प्रमोद हातागळे, मातंग समाजाच्या वतीने सतीश कांबळे,उल्हास वाघमोडे,चर्मकार समाजाच्या वतीने काशिनाथ जाधव,सुभाष भालके,रणवीर भालके, विजय जाधव,धनगर समाजाच्या वतीने झटिंग (अण्णा)म्हेत्रे,मुस्लिम समाजाच्या वतीने शेख सिराज,हज्जू सय्यद, यांच्यासह, नागोराव गायकवाड (दाजी) विजयकुमार सूर्यवंशी,प्रकाश गायकवाड, सूर्यकांत कांबळे,अंगद गवळी कांबळे, दाजीबा कांबळे,दिगंबर सूर्यवंशी, धनराज कांबळे,यांच्यासह विविध समाजघटकांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## निराधार योजनांचे थकीत अनुदान तातडीने वितरित करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील वृद्ध महिला, वृद्ध पुरुष, निराधार विधवा महिला तसेच इतर पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या निराधार योजनेंतर्गत मिळणारे थकीत अनुदान कोणताही विलंब न लावता तातडीने वितरित करण्यात यावे, अशी मागणी तुळजापूरचे नगरसेवक मधुकर शेळके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तहसीलदार तुळजापूर यांच्या मार्फत सादर करण्यात आलेल्या निवेदनात तुळजापूर, भूम, परंडा, उमरगा, वाशी, कळंब, धाराशिव आणि लोहारा या सर्व तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना निराधार योजनांचे थकीत अनुदान त्वरित देण्याची मागणी करण्यात आली आहे.

संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन पात्र वृद्ध महिला, वृद्ध पुरुष, निराधार विधवा महिला तसेच इतर लाभार्थ्यांना रखडलेले अनुदान तातडीने वितरित करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती मधुकर शेळके यांनी निवेदनातून केली आहे.

त्यांनी सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ गरजूंपर्यंत वेळेत पोहोचणे आवश्यक असल्याचेही नमूद केले.

### धाराशिव पोलिसांचा मध्यरात्री गुटखा तस्करीवर मोठा घाव...

## स्कॉर्पिओसह २५.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**




महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधित गुटखा व तंबाखूच्या बेकायदेशीर वाहतुकीविरोधात धाराशिव शहर पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई करत स्कॉर्पिओ वाहनासह २५ लाख ३६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सोलापूर, धाराशिव आणि कर्नाटकशी संबंधित पाच जणांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१२ जुलैच्या रात्री धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक कुमार दराडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक हद्दीत गस्त घालत होते. रात्री सुमारे ११.४५ वाजता तेरणा इंजिनिअरिंग कॉलेजसमोरील राष्ट्रीय महामार्गावर संशयास्पद एमएच-२५ बीएफ-३६९६ क्रमांकाची काळ्या रंगाची स्कॉर्पिओ थांबवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूची वाहतूक सुरू असल्याचे उघड झाले. पोलिसांनी वाहनातील दोन आरोपींना ताब्यात घेतले. कारवाईत पोलिसांनी ९.०७ लाख रुपयांचा 'डायरेक्टर स्पेशल पान मसाला', १.२९ लाख रुपयांची 'शॉट लक्झरी च्युइंग टोबॅको' तसेच १५ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ असा एकूण २५ लाख ३६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीत हा प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी आणल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी गणेश मारुतीराव धुमाळ (बार्शी), रोहन कदम (आळणी, धाराशिव), जाफर जमादार (कर्नाटक), अमोल गुंजाळ आणि पवन जीवन पौळ (आळणी, धाराशिव) यांच्याविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अंमलदार शशिकांत रामहरी जाधवर यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २७४, २७५, २२३ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डिघोळे करीत आहेत.

## मराठवाड्याच्या अनुशेषावर १९ जुलैला तुळजापूरात विभागीय बैठक

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जुलै -**

तुळजाभवानी महाविद्यालयात मराठवाडा जनता विकास परिषदेची आढावा बैठक सरचिटणीस प्रा. अर्जुन जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत रविवार, १९ जुलै रोजी याच ठिकाणी परिषदेची विभागीय बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीला दत्तात्रय पाटील, मार्गदर्शक प्रा. विलास जगदाळे, सुनील शेळके, तालुकाध्यक्ष धनंजय लोंढे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ बंद झाल्यानंतर वाढत चाललेल्या विकास अनुशेषावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी विभागीय बैठकीत पाणी, रस्ते, वीज, शेती, सिंचन, औद्योगिक प्रकल्प, वाढती बेरोजगारी आणि त्यावरील उपाययोजना या विषयांवर व्यापक मंथन होणार असल्याची माहिती देण्यात आली.

**विविध विकास प्रश्नांवर होणार मंथन...**

या बैठकीसाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष, सचिव तसेच धाराशिव जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. बैठकीत मांडण्यात येणाऱ्या मागण्या आणि सूचना शासनाकडे, विशेषतः मुख्यमंत्री यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याचे सरचिटणीस प्रा. अर्जुन जाधव यांनी सांगितले.

यावेळी मराठवाड्यातील महिला बचत गटांना उद्योग-व्यवसायासाठी शासनाकडून अधिक सहाय्य मिळावे यासाठी पाठपुरावा करण्याचा निर्णयही घेण्यात आला. यासाठी जिल्ह्यातील महिला बचत गटांची सविस्तर माहिती संकलित करण्याची जबाबदारी कार्यकारी सदस्य मीनाताई सोमाजी आणि रूपाली घाडगे यांच्यावर सोपविण्यात आली.

बैठकीत शहराध्यक्ष ॲड. अक्षय जाधव, कार्यकारिणी सदस्य उत्तम अमृतराव यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनीही आपली मते मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष धनंजय लोंढे यांनी केले, तर आभार नूतन कार्यकारिणी सदस्य गोविंद खुरूद यांनी मानले.

## भाई उद्धवराव पाटील पुण्यतिथीनिमित्त छत्रपती शिवाजी विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**

भाई उद्धवराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी माजी प्राचार्य डॉ. रमेश दापके यांनी, गुणवत्ता सिद्ध करणे ही दीर्घकालीन प्रक्रिया असून भाई उद्धवराव पाटील यांनी महाराष्ट्राला वैचारिक, नैतिक व आदर्श राजकीय वारसा दिला, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा शशिकलाताई घोगरे होत्या. यावेळी कार्याध्यक्ष एम. डी. देशमुख, उपाध्यक्ष ॲड. अविनाशराव देशमुख, सचिव भाई धनंजय पाटील, माजी मुख्याध्यापक बुवासाहेब देशमुख, प्राचार्य विक्रम सिंह देशमुख, उपप्राचार्य बालाजी कुंभार, मुख्याध्यापक के. बी. घोडके, पर्यवेक्षक अमोल दीक्षित आदी उपस्थित होते.

यावेळी दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, पाचवी व आठवी शिष्यवृत्तीधारक तसेच राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व गुलाबपुष्प देऊन पालकांसह मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल दीक्षित यांनी केले, सूत्रसंचालन आण्णासाहेब कुरुलकर यांनी केले.

## सामाजिक उपक्रमांनी साजरा केला वाढदिवस; विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ जुलै -**

बावची (ता. परंडा) येथील सामाजिक कार्यकर्ते तथा ग्राम पंचायत सदस्य कानिफनाथ सरपणे यांनी आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, गवारे वस्ती शाळा तसेच अंगणवाडी क्रमांक १ व २ मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप केले.

यावेळी विद्यार्थ्यांना वही, पेन, बिस्किटे आणि चॉकलेट यांचे वितरण करण्यात आले. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण करण्यात आले. यासोबतच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळांतर्गत एनएसडीएल (छडऊङ) सवलत कार्डांचेही वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक सरवदे, कदम, गाढवे, बोबे, अंगणवाडी सेविका पाटील, पोलीस पाटील विजय रोडगे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णू रोडगे, पांडुरंग शिवतारे, अजय सरपणे, तेजस सरपणे, अजित सरपणे, शंकर धोंगडे, बालू रोडगे, आदित्य सरपणे तसेच मित्रपरिवार उपस्थित होता.

## मोहेकर महाविद्यालयात 'कागदी पिशवी दिन' साजरा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ जुलै -**

प्लास्टिकच्या वापरावर नियंत्रण आणून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात 'कागदी पिशवी दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, लातूर, महाविद्यालयातील एनसीसी विभाग आणि विद्या भवन हायस्कूल, कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी महाविद्यालयातून कळंब शहरात जनजागृती रॅली काढून नागरिकांना कागदी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून डॉ. राघवेंद्र ताटीपामुल यांनी प्लास्टिकमुळे पर्यावरण व मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम स्पष्ट करत कागदी पिशव्यांचा वापर ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. हेमंत भगवान, उपप्राचार्य के.डी. जाधव, प्रबंधक हनुमंत जाधव, कार्यालयीन अधीक्षक अरविंद शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट डॉ. के.डब्ल्यू. पावडे व थर्ड ऑफिसर आप्पासाहेब वाघमोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उपसभापती सचिन अहिर यांचे तुळजाभवानी मातेचे सहकुटुंब दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जुलै -**



विधान परिषदेचे नूतन उपसभापती सचिन अहिर यांनी सोमवारी ऐतिहासिक तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मातेचे सहकुटुंब दर्शन घेतले. उपसभापतीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर आदिशक्तीच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी कुलधर्म व कुलाचार पार पाडला.

तुळजापूर नगरीत आगमन होताच मंदिर प्रशासन आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या वतीने सचिन अहिर यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी पत्नी व कुटुंबीयांसह श्री तुळजाभवानी मातेचे विधीवत दर्शन घेऊन पूजा-आरती केली.

दर्शनानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सचिन अहिर म्हणाले, महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी माता हे आमचे श्रद्धास्थान आहे. उपसभापतीपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर मातेचे आशीर्वाद घेण्यासाठी आणि कुटुंबाचा पारंपरिक कुलधर्म कुलाचार करण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. महाराष्ट्रातील जनतेला सुख, समृद्धी लाभो तसेच शेतकरी व कष्टकऱ्यांचे जीवन सुजलाम-सुफलाम होवो, अशी प्रार्थना मातेच्या चरणी केली आहे.

यावेळी नगराध्यक्ष विनोद गंगणे, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, शिवसेनेचे माजी जिल्हा सहसंपर्कप्रमुख अमरराजे कदम, तालुकाध्यक्ष अमोल जाधव, ऋषीकेश मगर, विजय कंदले, विशाल रोचकरी, औदुंबर कदम, मधुकर शेळके, शशिकांत पाटील, लखन पेंदे, शाहूराज मगर, नंदू गंगणे, मंदिर संस्थानचे अधिकारी, पोलीस प्रशासनाचे अधिकारी तसेच शिवसेना पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजय जाधव यांचा नळदुर्गमध्ये सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ जुलै -**



नळदुर्ग येथील सामाजिक कार्यकर्ते व भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव यांची भाजप ओबीसी सेलच्या धाराशिव जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराच्या वतीने स्वागत करत त्यांचा सत्कार करण्यात आला.

संजय जाधव हे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षांपासून भाजपमध्ये सक्रियपणे कार्यरत आहेत.

ओबीसी समाजाच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करण्याबरोबरच विविध सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांचा सहभाग राहिला आहे. त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेत भाजप ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष विजय शिंगाडे यांनी त्यांची धाराशिव जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी नियुक्ती केली.

या नियुक्तीबद्दल मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक तानाजी जाधव, मारुती खारवे, सुधीर हजारे, विनायक अहंकारी, संजय दशरथ जाधव, पद्माकर घोडके, नळदुर्ग सुहास येडगे, रघुनाथ नागणे, विलास येडगे, उत्तम बनजगोळे आदी उपस्थित होते.

## तलाव परिसरातून १.८६ लाखांची केबल चोरी

**धाराशिव, दि.१३ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील सिंदगाव येथील कृष्णा खोरे साठवण तलाव परिसरातून १ लाख ८६ हजार १० रुपयांची केबल चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विवेकानंद विठ्ठलराव मेलगिरी (वय ५१, रा. सिंदगाव, ता. तुळजापूर) यांच्या मालकीची ६ एमएम जाडीची सुमारे ५,५५० फूट लांबीची केबल ११ जुलै रोजी अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

## देशातील ११ राज्यांतील प्राध्यापकांची जकेकुरवाडीला अभ्यास भेट; आदर्श ग्रामविकास मॉडेलचा घेतला अनुभव



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जुलै -**

टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस), तुळजापूर कॅम्पस आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्राध्यापक विकास कार्यक्रम अंतर्गत देशातील ११ राज्यांतील प्राध्यापकांनी धाराशिव जिल्ह्यातील जकेकुरवाडी या आदर्श गावाला अभ्यास भेट देत ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

प्रा. बाळ राक्षसे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या अभ्यास दौऱ्यात केरळ, बिहार, दिल्ली, राजस्थान, आसाम, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि महाराष्ट्रातील प्राध्यापक सहभागी झाले होते. सरपंच अमर सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर प्राध्यापकांनी गावातील विकासकामे, सार्वजनिक सुविधा आणि शाळेची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी सरपंच अमर सूर्यवंशी यांनी सांगितले की, गावाचा विकास हा केवळ शासनाच्या निधीवर नव्हे, तर लोकसहभाग, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि ज्ञानाधारित नियोजनाच्या एकत्रित प्रयत्नातून घडतो. टीआयएसएसच्या सहकार्यामुळे जलसंधारण, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, शिक्षण, ग्राम शासन आणि शाश्वत विकासाच्या क्षेत्रात संशोधनाधारित मार्गदर्शन व तांत्रिक सहाय्य मिळाल्याने प्रभावी उपक्रम राबविता आले. ग्रामपंचायत आणि टीआयएसएस यांची भागीदारी जकेकुरवाडीला राष्ट्रीय स्तरावरील आदर्श ग्रामविकासाचे मॉडेल बनवत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. ईशान जनबंधू यांनीही ग्रामीण विकासात ज्ञानाधारित भागीदारी आणि लोकसहभागाची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाच्या शेवटी प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. सबलू खान यांनी आभार मानले. अभ्यास भेट यशस्वी करण्यासाठी महेश माने आणि जकेकुरवाडी ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

## राजर्षी शाहू महाराज मानधन योजनेच्या निवड प्रक्रियेला प्रतिसाद

### लोहारा, कळंबमधील २७७ कलावंतांचे कला सादरीकरण...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**



महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन योजनेअंतर्गत पात्र कलावंतांच्या अंतिम निवड प्रक्रियेला धाराशिव जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्हा परिषदेतील कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात सुरू असलेल्या जिल्हास्तरीय निवड प्रक्रियेत तिसऱ्या व चौथ्या दिवशी लोहारा व कळंब तालुक्यातील एकूण २७७ कलावंतांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले.

९ जुलै रोजी लोहारा तालुक्यातील १३६, तर १० जुलै रोजी कळंब तालुक्यातील १४१ अशा एकूण २७७ पात्र कलावंतांनी निवड समितीसमोर कला सादर केली. उत्कृष्ट सादरीकरणातून अनेक कलावंतांनी उपस्थित मान्यवरांची मने जिंकत आपल्या दीर्घकालीन कलासाधनेची प्रभावी छाप पाडली.

यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्षा उषा रवींद्र गायकवाड, समाज कल्याण सभापती विश्वास हनुमंत कोकणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अनंत कुंभार तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले उपस्थित होते. मान्यवरांनी कलावंतांशी संवाद साधून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

शासनाच्या या योजनेमुळे ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांच्या योगदानाचा सन्मान होत असून, त्यांच्या कार्याची योग्य दखल घेण्यासाठी ही योजना महत्त्वाची असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार अंतिम निवड प्रक्रिया पारदर्शक, वस्तुनिष्ठ आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने राबविण्यात येत असून, पात्र ठरणाऱ्या कलावंतांना मानधन योजनेचा लाभ दिला जाणार आहे.

दररोज सकाळी १० ते सायंकाळपर्यंत सुरू असलेल्या या प्रक्रियेला जिल्ह्यातील कलावंतांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. पुढील टप्प्यात भूम व धाराशिव तालुक्यातील पात्र कलावंतांच्या मुलाखती व कला सादरीकरण होणार असून, त्यानंतर जिल्ह्यातील अंतिम निवड प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तीर्थ बुद्रुक वैराग्यधामात १५ जुलैला पुण्यतिथी सोहळा

### आ. बसवराज पाटील यांचा होणार सत्कार...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथील वैराग्यधामात केदारपीठाचे लिंगायत जगद्गुरू श्री सिद्धेश्वरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवार, १५ जुलै रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला केदारपीठाचे विद्यमान जगद्गुरू श्री भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी, पंढरपूर मंदिर समितीचे सहअध्यक्ष

हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर, विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत.



याच प्रसंगी विधान परिषदेवर नवनिर्वाचित आमदार बसवराज पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

धार्मिक कार्यक्रमांसह आयोजित या सोहळ्यास भाविक व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वैराग्यधाम समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### जवाहर विद्यालय अणदूरच्या मुख्याध्यापकांसह विद्यार्थिनींचा गौरव

**अणदूर, दि.१३ जुलै -**

जवाहर विद्यालय, अणदूरचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी तसेच दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के गुण मिळविणाऱ्या भक्ती कबाडे आणि संस्कृती घोडके यांचा लातूर येथे गौरव करण्यात आला. उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आणि आ. विक्रम काळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांना 'आदर्श शाळा मुख्याध्यापक गौरवपत्र' व 'गुणवंत विद्यार्थी गौरवपत्र' प्रदान करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, विधान परिषद सदस्य बसवराज पाटील, श्रीगुरू औसेकर महाराज आणि आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. यावेळी लातूर, धाराशिव व नांदेड जिल्ह्यातील दहावी परीक्षेत पैकीच्या पैकी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसह त्यांच्या शाळांच्या मुख्याध्यापकांचाही गौरव करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, लक्ष्मीकांत पाटील, भालचंद्र बिराजदार, नागनाथ कानडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

### विजय शिंगाडे यांची भाजप ओबीसी मोर्च्याच्या जिल्हाध्यक्षपदी फेरनियुक्ती

**मंगरूळ, दि.१३ जुलै -**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी विजय शिंगाडे यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी नियुक्तीपत्र देऊन ही घोषणा केली.



विजय शिंगाडे हे विद्यार्थीदशेपासून भाजपचे सक्रिय कार्यकर्ते असून कसई गावाचे सरपंच म्हणून त्यांनी यशस्वी कारकीर्द गाजवली आहे. फेरनियुक्तीबद्दल जिल्हाभरातून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी मोर्चाचे संघटन अधिक सक्षम, सशक्त व जनाभिमुख होईल, असा विश्वास दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी व्यक्त केला. समाजहित, राष्ट्रहित आणि पक्षवाढीसाठी समर्पित भावनेने कार्य करून भाजपची विचारधारा अधिक व्यापकपणे जनतेपर्यंत पोहोचवावी, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

### पदोन्नतीने एएसआयपदी महादेव राऊत यांची निवड

**मंगरूळ, दि.१३ जुलै -**

तुळजापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले महादेव भगवान राऊत यांची सहायक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) पदावर पदोन्नती झाल्याबद्दल पोलीस ठाण्यात त्यांचा सत्कार करण्यात आला.



पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, फेटा व पेढा देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. महादेव राऊत यांनी पोलीस दलात ३० वर्षे प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सेवा बजावली आहे. गडचिरोली, वाशी, परांडा, कळंब आदी ठिकाणी सेवा केल्यानंतर ते सध्या तुळजापूर पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. यावेळी उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.



### हायस्कूल लोहारा येथे दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**लोहारा, दि.१३ जुलै -**

लोहारा शहरातील हायस्कूल लोहारा येथे सोमवारी (दि. १३) इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाला विस्तार अधिकारी रसुल शेख प्रमुख पाहुणे म्हणून, तर मुख्याध्यापक डी. एम. पोतदार अध्यक्षस्थानी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक पोतदार यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवकर यांनी केले. सूत्रसंचालन सतीश जट्टे यांनी, तर आभारप्रदर्शन सुतार यांनी केले. या प्रसंगी पालक, शिक्षकव विद्यार्थी उपस्थित होते.

### सव्वातीन लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.१३ जुलै -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा आणि संबंधित पोलीस ठाण्यांनी १२ जुलै रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष वाहतूक तपासणी मोहीम राबवून मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध ३६४ कारवाया केल्या. या कारवाईत नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून एकूण ३ लाख २४ हजार ४५० रुपये तडजोड शुल्क (दंड) वसूल करण्यात आला.

# आषाढी यात्रेसाठी धाराशिव एसटी सज्ज

## पांडूरंगाच्या वारकऱ्यांसाठी जिल्ह्यातून १७० एसटी बससेंची व्यवस्था...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**

आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात.राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



पंढरपूर येथे २५ जुलै रोजी होणाऱ्या आषाढी यात्रेनिमित्त धाराशिव विभागाच्या राज्य परिवहन महामंडळाने वारकऱ्यांच्या सोयीसाठी व्यापक नियोजन केले आहे. यात्रेसाठी धाराशिव जिल्ह्यातून एकूण १७० बसांची व्यवस्था करण्यात आली असून, चालक-वाहकांसह वाहतूक निरीक्षक, यांत्रिकी कर्मचारी, लिपिक आदी अधिकारी-कर्मचाऱ्यांचीही मोठ्या प्रमाणात नियुक्ती करण्यात आली आहे.

२० जुलैपासून राज्यासह परराज्यातील लाखो वारकरी विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करत आहेत. भाविकांना सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी धाराशिव विभागातील सहा आगारांकडून तीन टप्प्यांत बससेवा राबविण्यात येणार आहे.

धाराशिव विभागाकडे सध्या एकूण ४०६ बस उपलब्ध आहेत. त्यापैकी २० ते २४ जुलै या पहिल्या टप्प्यात ९५ बस, तर २५ व २६ जुलै रोजी दुसऱ्या टप्प्यात १७० बस यात्रेसाठी कार्यरत राहतील. तसेच २७ ते २९ जुलै या तिसऱ्या टप्प्यातही १७० बस वारकऱ्यांच्या परतीच्या प्रवासासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.




या सर्व बसफेऱ्या पंढरपूर येथे यात्रेनिमित्त उभारण्यात येणाऱ्या भीमा यात्रा बसस्थानकाच्या शेड क्रमांक ५ येथून नियोजित करण्यात येणार असून, भाविकांना वेळेत आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळावी यासाठी एसटी प्रशासनाने आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण केली आहे.

# महिलेवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**



तुळजापूर तालुक्यातील एका गावात शेतात काम करणाऱ्या २४ वर्षीय विवाहित महिलेवर धमकी देत जंगलात नेऊन लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात संबंधित तरुणाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विरोध करणाऱ्या पती व दिरालाही मारहाण...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला (नाव व गाव गोपनीय) ११ जुलै रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता शेतात काम करत असताना गावातील एका तरुणाने तिच्याकडे येऊन, तू मला आवडतेस, माझ्यासोबत जंगलात चल; नाही आलीस तर तुझ्या नवऱ्याला मारून टाकीन, अशी धमकी दिली. त्यानंतर तिला जबरदस्तीने जंगलात घेऊन जाऊन मारहाण करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर पीडितेचे पती व दिर यांनी संबंधित तरुणाला जाब विचारण्यासाठी गेल्यानंतर आरोपीने त्यांनाही काठीने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

पीडित महिलेने १२ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## कात्री येथे घरफोडी...

# सोन्याचे दागिने व मोटारसायकल असा १.३५ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील कात्री येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने आणि शेजारील घरासमोरील मोटारसायकल असा एकूण १ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शरद साहेबराव सोनवणे (वय ४०, रा. कात्री, ता. तुळजापूर) यांच्या घराचा कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने ११ जुलै रात्री १० ते १२ जुलै पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान घरात प्रवेश केला. घरातील १५ ग्रॅम वजनाचे सुमारे ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

याचवेळी चोरट्याने शेजारील शंभू कुंडलीक येल्लाळ यांच्या मालकीची एमएच-२५ बीई-७८२० क्रमांकाची सुमारे ६० हजार रुपये किमतीची मोटारसायकल देखील लंपास केली.



या प्रकरणी शरद सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अज्ञात चोरट्याचा शोध सुरू आहे.

# गोळीबार प्रकरणातील आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी शिंदे कुटुंबाचे उपोषण



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ जुलै -**

परंडा तालुक्यातील लोणी येथे २१ ऑक्टोबर २०२४ रोजी विठ्ठल सर्जेराव शिंदे यांच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याच्या निषेधार्थ शिंदे कुटुंबाने १३ जुलैपासून परंडा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

शिंदे कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणी २०२४ मध्ये परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मात्र, संबंधित आरोपींना पोलिसांकडून सहकार्य केले जात असून तपासात दिरंगाई आणि निष्काळजीपणा होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित काही व्यक्तींविरुद्ध १० जुलै २०२६ रोजी परंडा पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर संबंधित आरोपींनी आमच्या विरोधात अर्ज का दिला? असा जाब विचारत मध्यरात्री शिंदे यांच्या घरावर दगडफेक केल्याचा आरोपही कुटुंबीयांनी केला आहे. या घटनेमुळे आपल्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

गोळीबार प्रकरणातील सर्व आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच कुटुंबाला संरक्षण द्यावे, या मागण्यांसाठी विठ्ठल सर्जेराव शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांनी परंडा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

### मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**

बसस्थानकाच्या आउटगेटसमोर मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकास तानाजी रेडकर (वय ४६, रा. बेंबळी, ता. जि. धाराशिव) हे रविवारी (दि. १२) सायंकाळी ५.२२ वाजण्याच्या सुमारास एमएच-२५ एएम-६७९९ क्रमांकाची दुचाकी मद्यधुंद अवस्थेत चालविताना बसस्थानकाच्या आउटगेटसमोर आढळून आले.

याप्रकरणी मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अंतर्गत आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# मयत व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करून शेतजमिनीचा व्यवहार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**

मयत व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करून शेतजमिनीचा व्यवहार करत वारसाची फसवणूक केल्याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हमीद हारुण अरब (वय ४२, रा. जवळा (नि.), ता. परंडा, ह.मु. सत्याईनगर, दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी महंमद इसा हबीब (रा. ताडकळस, ता. भोकरदन, जि. जालना), अली सय्यद कादरी, भागवत नामदेव गवारे आणि अदील अली कादरी (रा. जवळा (नि.), ता. परंडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, फिर्यादीचे आजोबा हबीब अल्वीविन महम्मद अरब यांचे निधन झालेले असतानाही आरोपींनी ही बाब माहिती असताना मयत व्यक्ती आणि आरोपी महंमद इसा हबीब हे एकच व्यक्ती असल्याचा भास निर्माण केला.




## चौघांविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल...

त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नाव बदलल्याचा आधार घेत जवळा (नि.) शिवारातील गट क्रमांक १३०७ मधील सामाईक ८९ आर क्षेत्रापैकी फिर्यादीच्या आजोबांच्या वाट्याचे १४.८३ आर क्षेत्र इतर सहमालकांची संमती न घेता खरेदीखताद्वारे हस्तांतरित करून फिर्यादीची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

१२ जुलै रोजी दाखल झालेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# धाराशिव शहरालगत ट्रकची मोटारसायकलला धडक; वाशी तालुक्यातील व्यक्तीचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**

धाराशिव शहराजवळील उपळा पुलानजीक मधुबन हॉटेलसमोर भरधाव ट्रकने मोटारसायकलला समोरून धडक दिल्याने वाशी तालुक्यातील एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनायक काशिनाथ पवार (वय ५७, रा. घाटपिंप्री, ता. वाशी, जि. धाराशिव) हे ११ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास एमएच-१७ बीएफ-७७५० क्रमांकाच्या मोटारसायकलवरून जात होते. त्यावेळी उपळा पुलाच्या पुढे मधुबन हॉटेलजवळ एमएच-१० एक्यू-३००६ क्रमांकाच्या ट्रकच्या चालकाने ट्रक भरधाव व निष्काळजीपणे चुकीच्या दिशेने चालवत मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिली.




या भीषण अपघातात विनायक पवार गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी शिवाजी पंढरीनाथ पवार (रा. घाटपिंप्री, ता. वाशी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लोहारा येथे प्रतिबंधित गुटखा विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; साहित्य जप्त

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ जुलै -**

लोहारा तालुक्यात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत गुटख्यासह ११ हजार ५९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संबंधिताविरुद्ध लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पांडुरंग काशिनाथ कदम (वय ५९, रा. बंगले प्लॉटिंग, लोहारा) हे ११ जुलै रोजी रात्री सुमारे ९ वाजता लोहारा-जेवळी मार्गावरील जीवन पान स्टॉल येथे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी बाळगून असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. यानुसार पथकाने छापा टाकून गुटखा, विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू आदी प्रतिबंधित पदार्थ असा एकूण ११ हजार ५९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी पांडुरंग कदम यांच्याविरुद्ध लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# एनएच-६५ वर कार अडवून दरोडा; एकाला अटक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जुलै -**

हैदराबाद-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील फुलवाडी पाटीजवळ कारमध्ये विश्रांती घेत असलेल्या दोघांना चाकू व लोखंडी टॉमीचा धाक दाखवत मारहाण करून सुमारे १.६५ लाख रुपयांचा ऐवज लुटल्याची घटना घडली. या प्रकरणी नळदुर्ग पोलिसांनी एका संशयिताला अटक केली असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अभिजीत संजीव रेड्डी (वय ३०, रा. एलआयजी-२१, हाउसिंग बोर्ड कॉलनी, हुमनाबाद, जि. बिदर) हे मित्रासह ११ जुलै रोजी कारने हुमनाबादहून पुण्याकडे जात होते.

पहाटे सुमारे २.३० वाजता तुळजापूर तालुक्यातील फुलवाडी पाटीजवळील एनएच-६५वर रोडलगत विश्रांतीसाठी कार थांबवली असता चार अनोळखी इसमांनी त्यांना चाकू व लोखंडी टॉमीचा धाक दाखवून कारची काच उघडण्यास भाग पाडले.




त्यानंतर आरोपींनी लोखंडी टॉमीने मारहाण करून १५ हजार रुपये रोख, एक तोळ्याची सोन्याची चैन, दोन तोळ्यांचा चांदीचा कडा आणि मोबाईल फोन असा एकूण १ लाख ६५ हजार रुपयांचा ऐवज जबरीने लुटून नेला. या प्रकरणी अभिजीत रेड्डी यांनी १२ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान फिर्यादीने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी जाविद इमाम सय्यद (वय ३३, रा. मुस्ती, ता. दक्षिण सोलापूर) याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान त्याने सदर दरोड्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली असून, गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरू आहे.